**अध्यक्ष महोदय,**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १२५ आणि १२६ई अन्वये महापालिका आयुक्तांनी अर्थसंकल्प 'अ' (निधी संकेतांक-११, १२, ६०, ७०), अर्थसंकल्प 'ब' (निधी संकेतांक-२१, २२, २३) आणि अर्थसंकल्प 'ग' (निधी संकेतांक-४०) च्या बाबतीतील प्राप्ती, उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन दिनांक ५ फेब्रुवारी किंवा तत्पूर्वी प्रति वर्षी स्थायी समितीच्या विचारार्थ सादर करणे आवश्यक आहे.

फेब्रुवारी, २०१२ मध्ये झालेल्या महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आचार संहिता जारी करण्यात आली होती. त्यामुळे मावळत्या स्थायी समिती व महानगरपालिकेपुढे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात आले नाहीत.

माननीय राज्यपाल,महाराष्ट्र यांनी दिनांक १८ ऑगस्ट २०११ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ प्रख्यापित केला आहे. या सुधारणेनुसार आगामी वर्षाचे खर्च व प्राप्तीचे अंदाज हे मानीव अर्थसंकल्पीय अंदाज म्हणून समजण्यात यावेत अशा आशयाचे नवीन १२९अ (129A) हे कलम मुंबई महानगरपालिका अधिनियमात समाविष्ट करण्यात आले आहे. या नव्याने समाविष्ट केलेल्या कलम १२९ अ (129A) नुसार अर्थसंकल्पीय अंदाज ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असतील त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी महानगरपालिकेने ते अर्थसंकल्पीय अंदाज, कोणत्याही कारणास्तव अंतिमरीत्या स्वीकृत केलेले नसतील तर, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदीनुसार ते अर्थसंकल्पीय अंदाज महानगरपालिका रीतसर स्वीकृत करेपर्यंत, कलम

१२५ अन्वये आयुक्ताने तयार केलेले खर्च व प्राप्तीचे अंदाज, त्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज असल्याचे मानण्यात येईल.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये केलेल्या उपरोक्त सुधारणेच्या अनुषंगाने मी, सन २०१२-१३ करिताचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र तयार केले असून ते सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज मानण्यात येतील. दिनांक ०१ एप्रिल, २०१२ पासून सुरु होणाऱ्या वित्तीय वर्षातील आर्थिक व्यवहार सुरळीत चालू रहावेत यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेने प्राप्ती व खर्चाचे अंदाज स्वीकृत करेपर्यंत सदर अर्थसंकल्पीय अंदाज प्रभाव्य करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर मी, आता सन २०१२-१३ या वर्षाकरिता अर्थसंकल्प 'अ' (निधी संकेतांक-११, १२, ६०, ७०), अर्थसंकल्प 'ब' (निधी संकेतांक-२१, २२, २३) आणि अर्थसंकल्प 'ग' (निधी संकेतांक–४०) च्या बाबतीतील उत्पन्न आणि खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीस सादर करीत आहे.

सन २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीस सादर करताना केलेल्या निवेदनात मी दीर्घकाळ प्रलंबित असलेले महापालिकेचे सन २००७-०८ ते २००९-१० पर्यंतचे ताळेबंद अंतिम करुन अपेक्षित कालमर्यादेत महापालिकेला सादर करण्यात येतील असे नमूद केले होते. त्यानुसार हे सर्व प्रलंबित ताळेबंद अपेक्षित कालमर्यादेपूर्वीच अंतिम करुन महापालिका मुख्य लेखापरीक्षकांना सादर करण्यात आले असल्याचे नमूद करताना मला आनंद होत आहे. सन २००८-०९, २००९-१० आणि २०१०-११ या वर्षांची वित्तीय विवरणपत्रे अनुक्रमे दि.१५ मार्च, २०११, दि.१६ मे, २०११ व दि. ८ जुलै, २०११ रोजी महापालिका मुख्य लेखा परीक्षकांना सादर करण्यात आली आहेत. सन २००७-०८ ते २०१०-११ या वित्तीय

वर्षाची सर्व निधींची एकत्रित विवरणपत्रे म्हणजेच ताळेबंद, उत्पन्न व खर्च, प्राप्ती व अधिदान, तेरीजपत्रक (trial balance) मुंबई महापालिकेच्या संकेतस्थळावर (http://portal.mcgm.gov.in) प्रसिध्द करण्यात आली आहेत. सन २०११-१२ चे लेखे देखील विहीत कालमर्यादेत बंद केले जातील. त्यामुळे नागरीकांना आणि नगरसेवकांना महानगरपालिकेची वित्तीय स्थिती अधिक अचूकपणे समजण्यास सहाय्य होईल. तसेच या व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आल्यामुळे अधिक विश्वासार्हता निर्माण होईल.

२. **महापालिकेची आर्थिक स्थिती**

या शहराच्या मुलभूत सुविधांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करुन तिला आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्याचे आव्हान माझ्यासमोर होते.

सन २०११ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीसमोर सादर करताना केलेल्या निवेदनात मी महापालिकेच्या आर्थिक स्थितीचा सविस्तर उहापोह केला होता. त्यावेळी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १३४(१) अन्वये महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तुटीचा असता कामा नये व त्यामुळे महानगरपालिकेला आपला सर्व महसुली व भांडवली खर्च तिच्या महसुली प्राप्ती आणि पेलता येईल अशा कर्ज उभारणीद्वारे भागविणे आवश्यक आहे, हे मी स्पष्ट केले होते. त्याचवेळी मी महानगरपालिकेचा विशेषत: अर्थसंकल्प 'अ' अंतर्गतचा भांडवली खर्च हा बहुविध प्रकारे वाढला असल्याने महसुल संकलनामध्ये सुधारणा आणि महसुलाचे नवीन साधन स्त्रोत शोधून काढल्याशिवाय या खर्चाचा भार पेलणे अशक्य असल्याचे देखील निदर्शनास आणले होते. त्या अनुषंगाने महसूल वृध्दीची गरज अधोरेखित करुन मी महसुलाचे

काही नवीन साधनस्त्रोत शोधण्याचे आणि विद्यमान साधनस्त्रोतांपासूनच्या महसूल संकलनात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते.

महानगरपालिका पुरवित असलेल्या विविध सेवा व सोयींसाठी नागरिकांकडून काही प्रमाणात शुल्क व सेवा आकाराची आकारणी करते. चलनवाढीचे परिणाम विचारात घेता दीर्घकालीन आर्थिक दायित्वे पेलण्यासाठी ही शुल्के व आकार नियमितपणे सुधारित करणे गरजेचे आहे.

महापालिका पुरवित असलेल्या सेवासुविधांवर होणारा सततचा वाढता खर्च भागविण्यासाठी मी सर्व खातेप्रमुखांना त्यांच्या खात्यातर्फे आकारण्यात येणाऱ्या शुल्क व आकारांचा आढावा घेण्याचे तसेच उत्पन्नाचे / महसुलाचे नवनवीन साधनस्त्रोत शोधण्याचे निदेश दिले होते. महापालिका आयुक्तांच्या मंजुरीच्या कक्षेतील विद्यमान विविध शुल्कांच्या दरात प्रतिवर्षी १ एप्रिल या दिनांकापासून १० टक्के इतकी वाढ करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ज्या बाबींचे शुल्क जागेच्या भावाशी निगडीत आहेत अशा बाबी नोंदणी खात्याच्या विद्यमान ' Ready Reckoner' बरोबर Link करण्याचे देखील ठरविले आहे. शिवाय काही खात्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या आकारांमध्ये सुसूत्रता आणण्यात आली आहे, उदा. व्यवसाय कचरा निर्मूलन आकार (Trade refuse charges) घन कचरा व्यवस्थापन, अनुज्ञापन, दुकाने व आस्थापना, आरोग्य व बाजार अशा विविध खात्यांमार्फत वसूल करण्यात येत होते. सदर आकार एकाचवेळी विविध खात्यांमार्फत भिन्न भिन्न दराने वसूल करण्यात येत असल्याने व्यवसायिकांकडून तक्रारी व निवेदने प्राप्त झाली होती. या आकाराच्या वसुलीमध्ये समानता तसेच समन्वय आणण्यासाठी वसुलीच्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आल्या व सुधारित

निदेश जारी करण्यात आले. व्यावसायिकांकडे निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या निर्मितीच्या प्रमाणानुसार व्यवसाय कचरा निर्मूलन आकार सुधारित करण्यात आले आहेत. शिवाय, ज्या विशिष्ट व्यवसायांना यापूर्वीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व्यवसाय कचरा निर्मूलन आकार लागू नव्हता अशा व्यवसायांना हा आकार लागू करण्यात आला आहे. त्याशिवाय मुंबई महानगरपालिका अधिनियमाखालील कलम ३९३, ३९४ आणि ४१२(अ) अन्वये देण्यात येणाऱ्या अनुज्ञापनासाठीच्या शुल्कातही बऱ्याच कालावधीपासून सुधारणा करण्यात आली नव्हती म्हणून या अनुज्ञापन शुल्कामध्ये ७५ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे.

'विकास आकार' (Development Charges)देखील महापालिकेच्या महसुलाचा एक प्रमुख साधन स्त्रोत आहे. महानगरपालिका कोणत्याही नवीन बांधकामाकरिता किंवा वापरातील बदलाकरिता विकास आकार वसूल करते. विकास नियंत्रण नियमावली आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमात राज्य शासनाने अलिकडेच काही सुधारणा केल्या असून त्यामुळे महापालिकेच्या महसुलात भविष्यात मोठया प्रमाणावर भर पडेल असे मी नमूद करु इच्छितो. काही प्रमुख सुधारणा खालीलप्रमाणे आहेत :-

अ) अगदी अलिकडेच झालेल्या विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र.३५ मधील सुधारणांनुसार फंजीबल वैशिष्टये असणाऱ्या एलिव्हेशन फिचर्स, बाल्कनी आणि गच्चीचा भाग वगैरे याकरिता अधिमूल्य आकारुन फंजीबल एफ.एस.आय. निर्देशांक देण्याची नाविन्यपूर्ण संकल्पना उदयास आली आहे. या सुधारणेमुळे दरवर्षी ₹१५०० कोटीपर्यंत अतिरिक्त महसूल मिळण्याची शक्यता आहे.

त्यामुळे या महानगराच्या प्रमुख पायाभूत सुविधांमधील कमतरता महापालिकेला भरून काढता येईल व कोस्टल फ्री वे इत्यादीसारखे प्रकल्प राबविणे शक्य होईल.

ब) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १२४ अंतर्गत झालेल्या सुधारणांनुसार 'Ready Reckoner' च्या दराच्या काही ठराविक टक्केवारीच्या दराने 'विकास आकार', निश्चित करण्यात आले आहेत. परिणामी, ज्या विभागातील जमिनीचे दर हे उच्च आहेत अशा विभागातून वाढीव दराने विकास शुल्क वसुल करता येईल.

क) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ (MRTP Act, 1966)चे कलम २२(एम) मधील सुधारणांनुसार अधिमूल्य आकारुन स्वेच्छाधीन अधिकाराचा वापर करून विशेष परवानगी आणि अतिरिक्त चटई क्षेत्रफळ निर्देशांक देण्यास अनुमती देता येऊ शकेल.

ड) उपनगरामध्ये ०.३३ एवढा चटई क्षेत्रफळ निर्देशांक देण्याकरिता नियम क्र.३२ अंतर्गतच्या सुधारित मंजुरीमुळे पुढील काही वर्षे प्रतिवर्षी ₹३७५ कोटीपर्यंत वाढीव महसूल मिळण्याची अपेक्षा आहे.

इ) नागरी नुतनीकरण योजना आणि गृहसमूह पुनर्विकास योजना (क्लस्टर डेव्हलपमेंट स्किम) अंतर्गत पुनर्विकासाच्या संदर्भात नियम ३३(९) मध्ये झालेल्या सुधारणांनुसार सन १९६९पूर्वी बांधलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तथापि, पुरेशा पायाभूत सुविधांची तरतूद करणे शक्य व्हावे म्हणून, नियमित तरतुदींमध्ये, विकासकांकडून अनुज्ञेय चटई क्षेत्र

निर्देशांकापेक्षा अधिक असणा-या बिल्ट अप एरियाकरिता ''अतिरिक्त विकास उपकर'' म्हणून प्रति चौ.मी. करिता ₹५०००/- पर्यंत पायाभूत सुविधांसाठी आकार घेण्याची सुधारणा करण्यात आली आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम ३३(७) अंतर्गत पुनर्विकासाच्या योजनांकरितादेखील अशी तरतूद केली आहे. नियम ३३(५) च्या तरतुदीनुसार म्हाडा ले-आऊटच्या पुनर्विकासामधील पायाभूत सुविधांच्या खर्चाचे दायित्व भागविण्याकरितादेखील संकलित केलेल्या शुल्काच्या १२.५०% शुल्क हे मुंबई महानगरपालिकेसह विभागून घेण्याचे निश्चित झाले आहे.

या सुधारणांमुळे नागरी पायाभूत सुविधांसाठी सन २०११-१२ करिता केलेल्या ₹७६३७.६५ कोटी एवढया भांडवली खर्चासाठीच्या तरतुदीचे आकारमान, सन २०१२-१३ करिता ₹९३५९.७६ कोटी एवढे वाढविणे शक्य झाले आहे.

## ३. आर्थिक शिस्त

गतवर्षीच्या माझ्या अर्थसंकल्पीय निवेदनात कंत्राट दिल्यानंतरही तंत्रज्ञान इत्यादींमधील बदलांमुळे ज्या प्रमुख प्रकल्पांच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणावर फेरफार झाले अशा विशेष करुन ब्रिमस्टोवॅडसह पर्जन्य जल वाहिन्यांची कामे आणि मिठी नदीची कामे या भांडवली कामांच्या बाबतीतील मोठया प्रमाणावरील बांधील दायित्वाचा उल्लेख केला होता. कार्यादेश दिल्यानंतर अशाप्रकारचे फेरफार टाळणे गरजेचे असल्याचेही मी स्पष्ट केले होते कारण अशा फेरफारातून महापालिकेला स्पर्धात्मक निविदा प्रकियेचा लाभ होत नाही आणि बदललेल्या बाबी फेअर आयटम रेटने कार्यान्वित होतात. या संदर्भात जिथे शक्य होईल तिथे दोषनिरसन करण्याचे आश्वासन

देखील मी दिले होते. मी येथे असे नमूद करु इच्छितो की, अशा सर्व कंत्राटांचा आढावा घेण्यात आला आहे. कुठल्याही कारणासाठी विद्यमान कंत्राटामध्ये फेरफार करणे ही नियमित स्वरुपाची बाब होता कामा नये तसेच प्रकल्पाचा खर्च मूलत: मंजूर केलेल्या कंत्राट रक्कमेपर्यंतच सिमीत करण्याच्या स्पष्ट सूचना मी दिल्या आहेत. कंत्राटाच्या मूळ व्याप्तीमधील समाविष्ट कामे मंजूर केलेल्या कंत्राट किमंतीत पूर्ण झाली आणि एकूण खर्चात जरी बचत होत असली तरी अशी कंत्राटे बंद करण्यात येतील. जर काही अतिरिक्त कामे पार पाडणे गरजेचे असेल तर अशी कामे नव्याने निविदा मागवून हाती घेण्यात येतील. पर्जन्य जल वाहिन्यांची काही कंत्राटे अशा पध्दतीने या आधीच बंद करण्यात आली आहेत. यामुळे वित्तीय तसेच अर्थसंकल्पीय शिस्तीचे अनुपालन होईल आणि भविष्यात देखील या पध्दतीचे पालन केले जाईल अशी मला खात्री वाटते.

## ४. वेतन सुधारणा

दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवर १० वर्षाचा कालावधीकरिता वेतन सुधारणासाठीचा करार करणाऱ्या सहा महापालिका कर्मचारी संघटना प्रशंसेस पात्र आहेत हे मी विशेषतत्वाने नमूद करु इच्छितो. या ना त्या कारणामुळे सदर वेतन सुधारणा २००८ पासून प्रलंबित होती. न्यायालयाने प्रशासनाबरोबर वाटाघाटी करण्याचे आदेश दिलेले असताना देखील महापालिका मजदूर युनियन व तिच्या संलग्न संघटनांनी एक दिवसाचा संप पुकारला तसेच इतर संघटनांप्रमाणे करारावर सहया केल्या नाहीत. संपाच्या दिवशी कामावर हजर राहून प्रशासनास मुंबईतील नागरिकांना किमान मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य करणारा कर्मचारीवर्ग निश्चितच प्रशंसेस पात्र आहे. संपाच्या दिवशी कामावर उपस्थित नसलेल्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देण्यात आली नाही. प्रशासनाच्या या कृतीला महापालिका

मजदूर युनियनने आव्हान दिले होते. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाची बाजू उचलून धरली.

लेखा परिक्षणासह वेतन निश्चिती करण्याचे प्रचंड मोठे काम विक्रमी वेळात पूर्ण करुन दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी केलेल्या करारानुसार सुधारित वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी माहे डिसेंबर, २०११ पासून करण्यात आली आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांचे कौतुक मी करु इच्छितो. या वेतन सुधारणांमुळे कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या थकबाकीचे परिगणन करण्याचे काम प्रगतीपथावर असून ज्या कर्मचाऱ्यांचे थकबाकीचे परिगणन पूर्ण झाले आहे, त्यांना थकबाकीच्या रकमेचे अधिदान यावर्षी करण्यात येईल तर उर्वरित कर्मचाऱ्यांचे थकबाकीचे अधिदान माहे एप्रिल-मे २०१२ मध्ये करण्यात येईल. थकबाकीच्या अधिदानासाठी सन २०११-१२ च्या सुधारित अंदाजात ₹२२१ कोटी आणि २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ₹९०४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. म्युनिसीपल मजदूर युनियन व तिच्या संलग्न संघटनांच्या सभासद कर्मचाऱ्यांकडून दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी इतर ६ संघटनांबरोबर करण्यात आलेल्या करारानुसारची वेतन निश्चीती स्वीकारण्यासंदर्भात वैयक्तिक संमतीपत्र घेण्याचे ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाने अशा कर्मचाऱ्यांकडून संमती मिळविण्याच्या कामास पुढे चालू ठेवण्यास महापालिकेला परवानगी दिली आहे. असे निदर्शनास येते की, दिनांक १५ मार्च, २०१२ पर्यंत म्युनिसीपल मजदूर युनियन व तिच्या संलग्न संघटनांशी निष्ठा ठेवणाऱ्या सुमारे ८००० कर्मचाऱ्यांनी नवीन वेतन सुधारणा करारानुसारच्या वेतन निश्चितीला संमती दिली आहे व त्यानुसार त्यांना सुधारित वेतन श्रेणीनुसार वेतन आकारण्यात येत आहे.

५. <u>राज्य तसेच केंद्र शासनाकडून येणे असलेल्या रकमा</u>

महापालिकेचा महसूल वाढविण्यासाठी इतर उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करत असतानाच राज्य तसेच केंद्र शासनाच्या विविध खात्यांकडून महानगरपालिकेस देय असलेल्या रकमांची वसुली करण्याबाबत पावले उचलणे देखिल गरजेचे आहे. राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडून मालमत्ता कर, जल व मलनि:सारण आकार, शासनाकडून जमा करण्यात येणाऱ्या करातील हिस्सा, सहाय्यक अनुदान इत्यादीपोटी माहे नोव्हेंबर, २०११ च्या अखेरीस ₹१५९९.५५ कोटी इतकी रक्कम येणे आहे. दुसऱ्या बाजूस राज्य शासनाला महानगरपालिकेने ₹२८१.६७ कोटी इतकी रक्कम देणे आहे. महापालिका प्रशासनाकडून या प्रकरणी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्य शासनाकडे मोठया प्रमाणावर थकित असलेल्या रकमांचा ताळमेळ घालण्यासाठी महापालिकेच्या संबंधित खात्यातील पाच अधिकाऱ्यांची ''समन्वय अधिकारी'' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या संदर्भात राज्य शासनाने प्रधान सचिव/ २ (नगर विकास), प्रधान सचिव (वित्त) व संबंधित विभागाचे सचिव यांची समिती स्थापन केली आहे. ही समिती महापालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर विचारविमर्श करुन आपल्या शिफारशी सादर करेल. या प्रकरणास प्राधान्याने अंतिम रुप मिळेल व नजीकच्या काळात महापालिकेस शासनाकडून प्राप्त व्हावयाच्या प्रलंबित रकमा सत्वर मिळतील अशी मी आशा करतो.

शिक्षण खात्याकडून महापालिकेला अनुज्ञेय असलेले सहाय्यक अनुदान बरेचदा पूर्णपणे प्राप्त होत नाही असे लक्षात आले आहे. त्याशिवाय अनुज्ञेय वेतनश्रेण्या देखील विचारात घेतल्या गेलेल्या नाहीत. महापालिका प्रशासनाने परिगणीत केल्यानुसार जवळपास ₹८०८ कोटी इतक्या

रकमेचे सहाय्यक अनुदान शासनाकडून थकित आहे. सदर रक्कम तातडीने अदा करण्याबाबत राज्य शासनाला विनंती करण्यात आली आहे. जर दिनांक १ जानेवारी, २००६ च्या प्रभावाने ६वा वेतन आयोग लागू करण्यात आला तर त्यानुसार अनुदानाची रक्कम देण्यासंदर्भातदेखील शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. महापालिकेने दि.१९ सप्टेंबर २०११ रोजी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या धर्तीवर वेतन सुधारणा करण्यासाठी कर्मचारी संघटनांबरोबर करार केला आहे व वेतनश्रेण्या सुधारण्यात आल्या आहेत. कराराची पूर्णपणे अंमलबजावणी झाल्यावर राज्य शासनास सुधारित दावा सादर करण्यात येईल.

मी आता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांबाबत उहापोह करतो.

६. अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' (निधी संकेतांक -११,१२,६०,७०) , 'ब'(निधी संकेतांक -२१,२२,२३) , 'ई'(निधी संकेतांक -३०) , 'ग'(निधी संकेतांक -४०) आणि 'वृक्ष प्राधिकरण' (निधी संकेतांक -५०) यांचे आकारमान आणि त्यामधील महसुली लेखे आणि भांडवली लेखे यांचा गोषवारा पुढील तक्त्यात नमूद केला आहे. तसेच या बाबतची सविस्तर माहिती पृष्ठ क्र.१०८ ते १११ वरील परिशिष्ट १ ते ४ मध्ये देण्यात आली आहे.

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांचे एकूण आकारमान ₹२६५८१.०२ कोटी असून ते सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांच्या तुलनेत २६ टक्क्यांनी जास्त आहे. सन २०१२-१३ च्या महसुली उत्पन्नाचे ₹१९६८०.९५ कोटीचे अंदाज महसुली खर्चाच्या ₹१७११४.३४कोटी इतक्या अंदाजांपेक्षा जास्त आहे.

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत भांडवली खर्च ₹९३५९.७६कोटी इतका अंदाजिला असून तो सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांतील ₹७६३७.६५कोटीच्या तुलनेत २२.५५ टक्क्यांनी जास्त आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' (निधी संकेतांक -११,१२,६०,७०),**
**'ब' (निधी संकेतांक -२१,२२,२३), 'ई'(निधी संकेतांक -३०),**
**'ग' (निधी संकेतांक -४०) आणि**
**'वृक्ष प्राधिकरण' (निधी संकेतांक -५०) चे आकारमान**

(₹ कोटीत)

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ | | सुधारित अंदाज २०११-१२ | | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पन्न/प्राप्ती | खर्च | उत्पन्न/प्राप्ती | खर्च | उत्पन्न/प्राप्ती | खर्च |
| महसुली उत्पन्न | १५४२७.५५ | | १६२०५.०० | | १९६८०.९५ | |
| महसुली खर्च | | १३४१२.५४ | | १३२४८.१९ | | १७११४.३४ |
| भांडवली प्राप्ती | ५६६९.०१ | | २७०७.५४ | | ६९००.०७ | |
| भांडवली खर्च | | ७६३७.६५ | | ५५१६.२२ | | ९३५९.७६ |
| **एकूण** | २१०९६.५६ | २१०५०.१९ | १८९१२.५४ | १८७६४.४१ | २६५८१.०२ | २६४७४.१० |
| **खर्चापेक्षा जास्त प्राप्ती** | | ४६.३७ | | १४८.१३ | | १०६.९२ |
| **अर्थसंकल्पीय अंदाजांचे आकारमान** | २१०९६.५६ | २१०९६.५६ | १८९१२.५४ | १८९१२.५४ | २६५८१.०२ | २६५८१.०२ |

## महसुली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

(₹ कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ | |
|---|---|---|---|
| **महसुली उत्पन्न** | | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | १४४३०.६८ | |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | १८३.६६ | |
| २१ | सुधार योजना | ३२.७० | |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | १.३७ | |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १६.९० | |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | ५४७.८४ | |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ४४४६.१० | |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | २१.७० | |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | -- | |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | -- | |
| | नक्त उत्पन्न | **१९६८०.९५** | |
| **महसुली खर्च** | | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ७८२०.२९ | ★ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | १६९०.२३ | |
| २१ | सुधार योजना | १४९.५५ | |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ४.७६ | |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १५१.२६ | |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १३३०.८४ | |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | २४४२.६३ | |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ४०.१२ | |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ७.४८ | |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | ३४७७.१८ | |
| | **नक्त खर्च** | **१७११४.३४** | |
| | **वर्षभरातील महसुली वर्ताळा** | **२५६६.६१** | |
| **भांडवली लेख्यांकडे वर्ताळयाचे स्थानांतरण** | | **२५३३.७७** | |
| | **वर्ताळा** | **३२.८४** | |

★ इतर अर्थसंकल्पांना वर्ग केलेली रक्कम वगळून

## भांडवली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

(₹ कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|
| **भांडवली प्राप्ती** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ४५२७.३७ |
| २१ | सुधार योजना | १५०.१७ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १७.३८ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | ३६७.०२ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | १८३८.१३ |
| | **एकूण** | ६९००.०७ |
| | महसुली लेख्यांतून स्थानांतरण | २५३३.७७ |
| | **भांडवली खर्चाकरिता एकूण उपलब्ध निधी** | ९४३३.८४ |
| **भांडवली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ४८८३.९४ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ६५५.४५ |
| २१ | सुधार योजना | ९३.६० |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | -- |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | ३६७.०१ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ३३५८.६० |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | १.१६ |
| | **एकूण** | **९३५९.७६** |
| | **वर्ताळा** | ७४.०८ |

सन २०११-१२ चे सुधारित अंदाज व सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय महसुली लेख्यांचे अंदाज (अर्थसंकल्प अ, ब आणि ई) हे खालील तक्ता क्र.१ मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

**तक्ता क्र.१**

**महसुली लेखा**

(₹ कोटीत)

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ | सुधारित अंदाज २०११-१२ | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|---|
| महसुली उत्पन्न | ११५०१.८८ | १२२५३.६२ | १५२१३.१५ |
| महसुली खर्च | १०६९०.०२ | १०८७७.९३ | १४१९९.६६ |
| वर्षभरातील वर्ताळा / तूट | ८११.८६ (वर्ताळा) | १३७५.६९ (वर्ताळा) | १०१३.४९ (वर्ताळा) |
| भांडवली लेखेस अंशदान | ८११.०० | १३७५.०० | १०१२.५० |
| वर्ताळा | **०.८६** | **०.६९** | **०.९९** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील महसुली उत्पन्नाच्या तुलनेत चालू वर्षाचे महसुली उत्पन्नाचे सुधारित अंदाज ₹७५१.७४ कोटींनी जास्त आहेत. याचे मुख्य कारण जकात, विकास नियोजन खात्यापासून प्राप्ती, रस्ते खात्यापासून प्राप्ती आणि मुदत ठेवींवरील व्याज यामध्ये झालेली वाढ हे होय. जकात संकलनामध्ये झालेल्या सुधारणांमुळे सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात जकातीपासून अंदाजिलेले ₹५८००कोटी इतके उत्पन्न ₹६१०० कोटी एवढे सुधारित करण्यात आले. विकास

नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमात राज्य शासनाने केलेल्या विविध सुधारणांबाबत मी याआधीच सविस्तर भाष्य केले आहे. या सुधारणांमुळे महापालिकेच्या उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे उदा. अतिरिक्त ०.३३ एफएसआयसाठी आकारल्या जाणाऱ्या अधिमूल्य आकारात ₹५० कोटी वाढ झाली आहे तर विकास आकारापासून अंदाजिलेली ₹२३३ कोटी इतकी प्राप्ती ₹११४ कोटीने वाढली आहे.

सन २०११-१२ मध्ये महसुली खर्चाच्या ₹१०६९०.०२ कोटी अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत सुधारित अंदाज ₹१०८७७.९३ कोटी एवढे केले आहेत. परिणामी, महसुली खर्च ₹१८७.९१ कोटीने अधिक होणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, भांडवली खर्चाच्या ₹४३४५.६४ कोटी इतक्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत सुधारित भांडवली खर्च ₹३१०७.१८ कोटी होईल असा अंदाज आहे. भांडवली खर्च सुधारित केल्यामुळे कमी झालेले दायित्व व ₹१३७५ कोटी इतका महसुली वर्ताळा भांडवली खर्चासाठी उपलब्ध झाल्यामुळे सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अपेक्षिल्यानुसार ₹२००० कोटी इतके अंतर्गत कर्ज उभारण्याची यावर्षी गरज भासणार नाही.

सन २०१२-१३ चे महसुली उत्पन्नाचे ₹१५२१३.१५ कोटी इतके अर्थसंकल्पीय अंदाज, अंदाजित महसुली खर्चापेक्षा ₹१०१३.४९ कोटीनी जास्त असून त्यापैकी ₹१०१२.५० कोटी इतका निधी भांडवली लेख्यांकडे वर्ग करण्याचे प्रस्ताविले आहे.

खालील तक्ता २ मध्ये नमूद केलेले उत्पन्नाचे विविध साधनस्त्रोत आणि सन२०१०-११मधील प्रत्यक्ष प्राप्तीची तुलनात्मक स्थिती विचारात घेऊन मी सन २०११-१२ चे सुधारित अंदाज आणि सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज याखालील महसुली उत्पन्न अंदाजिले आहे.

**तक्ता २** (₹ कोटीत)

| क्र. | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ | सुधारित अंदाज २०१०-११ | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ | सुधारित अंदाज २०११-१२ | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जकात (नक्त) | ४६५०.२१ | ४९४५.०० | ५७००.०० | ६०००.०० | ६९००.०० |
| २. | मालमत्ता कर | १५४०.०० | १५४०.०० | २०००.०० | २०००.०० | २२००.०० |
| ३. | विकास नियोजन खात्यापासून प्राप्ती | १२७८.०० | १३११.७३ | १६३९.२८ | १७९८.०२ | ३४३५.४९ |
| ४. | व्याज | ७३२.८२ | ५५०.१२ | ५२१.५२ | १००५.१३ | १०३०.८४ |
| ५. | शासनाकडून सहाय्यक अनुदान | ४४६.५७ | १५९.०७ | २७१.९९ | ३१७.९३ | ३०४.०४ |
| ६. | रस्ते आणि पूल खात्यापासून प्राप्ती | २१९.२३ | १००.२५ | ११२.५९ | १५३.९५ | ११६.९७ |
| ७. | पर्यवेक्षण आकार | ३००.०० | २५०.०० | २५०.०० | २००.०० | २५०.०० |
| ८. | घन कचरा व्यवस्थापन | ११७.०० | ८६.५५ | ९०.५२ | ९२.४७ | ९९.९९ |
| ९. | रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांपासून प्राप्ती | ७६.९२ | ८५.६९ | ९३.६१ | १०८.५७ | ११०.४५ |
| १०. | अनुज्ञापन खात्यापासून प्राप्ती | १००.०० | १०६.०० | ११८.०४ | १२३.२८ | १४३.८२ |
| ११. | बाजार व देवनार पशुवधगृहापासून प्राप्ती | ८३.२६ | ४३.३३ | ६३.८४ | ६०.३४ | ७०.४५ |
| १२. | इतर प्राप्ती | ३२६.१६ | ३४५.२५ | ६४०.४९ | ३९३.९३ | ५५१.१० |
| | एकूण | ९८७०.१७ | ९५२२.९९ | ११५०१.८८ | १२२५३.६२ | १५२१३.१५ |

सन २०१२-१३ च्या अंदाजित महसुली उत्पन्नातील अपेक्षित वाढ ही प्रामुख्याने जकात, मालमत्ता कर आणि विकास नियोजन खात्याची प्राप्ती लक्षात घेऊन अंदाजिली आहे. ही वाढ अपेक्षित करताना मी, सध्याचा चलन वाढीचा तसेच विकास दर याबरोबरच सुयोग्य अंमलबजावणी आणि विकास नियोजन खात्याच्या उत्पन्नाचे काही नवीन साधनस्त्रोतही विचारात घेतले आहेत.

मी आता अर्थसंकल्प 'अ' व 'ब' बाबतचे काही महत्वाचे उपक्रम, सेवा आणि सुविधा यांच्याबद्दल भाष्य करु इच्छितो.

## ७. रस्ते, पूल आणि वाहतूक प्रचालन

### ७.१ रस्ते

रस्ते ही अतिमहत्त्वाची पायाभूत सुविधा आहे. सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात केलेली ₹७१३ कोटी एवढी तरतूद सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹१४६६ कोटीपर्यंत वाढविण्याचे प्रस्ताविले आहे.

मुंबई शहरातील रस्त्यांची एकूण लांबी १९४१.१६ कि.मी. आहे. मुसळधार पाऊस, सखल भागातील भरावक्षेत्रयुक्त भाग, विविध उपयोगिता संस्थांव्दारे सातत्याने होणारे खोदकाम / चर खणणे, विना उसंत सतत होणारी मोठया प्रमाणातील वाहतूक व परिरक्षणासाठी मिळणारा अपुरा कालावधी इत्यादी बाबींमुळे मुंबईतील रस्त्यांवर प्रचंड ताण असतो. चांगल्या रस्त्यांचे जाळे असण्याकरिता डांबरी रस्त्यांऐवजी अधिकाधिक रस्ते सिमेंट काँक्रिटने बांधणे आणि कमी वेळ लागणारे, तसेच पावसात टिकणारे असे दुरुस्ती आणि परिरक्षणाचे तंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे.

नवीन रस्ते तयार करण्यासाठी व रस्त्यांचे परिरक्षणासाठी योग्य तंत्रज्ञान निवडताना रस्त्याखालील उपयोगिता सेवांच्या योग्य व्यवस्थापनाकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

सन २०११-१२ मध्ये प्रथमच मुंबई महानगरपालिकेने रस्त्यांच्या संकल्पचित्रांचे आय.आय.टी, पवई, या नामांकित संस्थेकडून पीअर रिव्हयू करुन घेतले आहे आणि रस्त्यांची कामे चालू असताना मे. एस.जी.एस. या त्रयस्थ पक्षकारामार्फत त्यांच्यावर पर्यवेक्षण करण्यात येत आहे. सन २०१२-१३ मध्ये या सुधारणा सुरु ठेवण्याबरोबरच रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कार्यक्रमाला गती देणे, रस्त्यांवरील खड्डयांच्या दुरुस्तीसाठी ''कोल्ड मिक्स'' तंत्रज्ञान वापरणे आणि उपयोगिता सेवांसाठी डक्ट बनविण्याचा पायलट कार्यक्रम करण्याचे प्रस्ताविले आहे.

### ७.१.१ रस्ते काँक्रीटीकरण कार्यक्रम आणि डांबरी रस्त्यांची सुधारणा

कोणत्याही रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या मार्गिका उपयोगिता सेवांकरिता मोकळया ठेवणे गरजेचे असल्यामुळे १८ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त रुंदी असलेल्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे शक्य आहे. या कारणास्तव, मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील एकूण ५६३६ लेन कि.मी.पैकी फक्त ३७६५ लेन कि.मी.चे काँक्रीटीकरण करणे शक्य आहे. गत वर्षीपर्यंत २२२८ लेन कि.मी.चे काँक्रीटीकरण झालेले आहे. सन २०११-१२ मध्ये आणखी ८८.२० लेन कि.मी.चे काँक्रीटीकरणाचे काम हाती घेतले आहे.

१८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या सर्व रस्त्यांचे पुढील सहा वर्षात काँक्रिटीकरण करण्याकरीता प्रतिवर्षी २४१ लेन कि.मी. इतपत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे गरजेचे आहे.

त्यानुसार मी सन २०१२-१३मध्ये २४१ लेन कि.मी. रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याचे प्रस्ताविले आहे. रस्त्याच्या साईड लेनच्या डांबरीकरणासहित या काँक्रीटीकरणासाठी अंदाजे

₹८०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामे मे, २०१३ पर्यंत सुरु रहाणार असल्यामुळे सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात नवीन सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यांकरिता ₹३२० कोटी तरतूद प्रस्ताविली आहे.

सन २०११-१२ मध्ये ११८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे देण्यात आली आहेत. डांबरी रस्त्यांचे साधारणत: ७ वर्षाचे परिणामकारक आर्युमान असते हे लक्षात घेता, एकूण १८७०लेन कि.मी. रस्त्यांचे डांबरीकरण सातत्याने करावे लागेल म्हणजेच प्रतिवर्षी २६७लेन कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण करावे लागेल व त्यासाठी प्रतिवर्षी ₹२८० कोटी एवढा अंदाजित खर्च येईल. त्यानुसार फेब्रुवारी २०१३ पर्यंत ४०टक्के काम पूर्णत्वास जाईल असे गृहित धरुन या नवीन कामांसाठी ₹११२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

मरीन ड्राईव्हचे कॉंक्रिटीकरण १९४० साली करण्यात आले होते. वर्षानुवर्षे केवळ तात्पुरत्या स्वरुपाचे ''पॅचवर्क'' करण्यात आल्यामुळे वर्षागणिक सदर रस्त्याच्या राईडिंग क्वालिटीचा ऱ्हास झाला आहे. ४०एमएम जाडीच्या मेकॅनाईज्ड मास्टिकद्वारे ₹३६ कोटी इतक्या अंदाजित खर्चाने संपूर्ण पुर्नपृष्ठीकरणासहित मरिन ड्राईव्हच्या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम २०१२-१३ मध्ये हाती घेण्यात येईल. याकरिता सन २०१२-१३ मध्ये ₹१५ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

सन २०११-१२ मध्ये दिलेली कामे पूर्ण करण्याकरिता ₹६८७ कोटी, शिल्लक एम.यु.आय.पी. ची कामे पूर्ण करण्याकरिता ₹८० कोटी, ६३ (के) अंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी ₹८ कोटी, सागरीमार्गाचे संरक्षण करण्यासाठी ₹१९ कोटी आणि प्रगतीपथावरील इतर रस्त्यांच्या कामासाठी ₹८० कोटी एवढी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात करण्यात आलेला ₹७१३ कोटी आणि २०११-१२च्या सुधारित अंदाजातील ₹५०२ कोटी एवढया अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत सन २०१२-१३ मध्ये एकूण ₹१४६६ कोटी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

### ७.१.२ विशिष्ट ठिकाणच्या आणि खड्डुयांच्या दुरुस्त्या

मुंबई महानगरपालिकेने मागील ४ वर्षांमध्ये खड्डुयांच्या दुरुस्त्या आणि विशिष्ट ठिकाणच्या दुरुस्त्या करण्याच्या कामांवर प्रतिवर्षी ₹५० कोटी इतका लक्षणीय खर्च केला आहे. प्रतिवर्षी एवढा खर्च करुनही पावसाळयामध्ये रस्त्यांची फार दुरावस्था असते. त्यामुळे विशेषत: गणेशोत्सव आणि इतर सणांच्या काळात रस्त्यांच्या दयनीय अवस्थेवर सर्वसामान्य जनता आणि प्रसारमाध्यमांकडून सातत्याने टिका केली जाते. रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता वापरण्यात येणाऱ्या हॉट मिक्स तंत्रज्ञानाचा सतत कोसळणाऱ्या पावसाच्या काळात किंवा उघडीपीच्या थोडक्या कालावधीमध्ये मर्यादा येतात कारण सदर मिश्रण स्थिरस्थावर होण्यास वेळ लागतो. तसेच या सामग्रीला साठवण कालमर्यादा कमी असते. महानगरपालिकेने गेल्या काही वर्षात प्रायोगिक तत्वावर "कोल्ड मिक्स'' तंत्रज्ञानाचा वापर करुन पाहिला आणि सन २०११ मध्ये अशा ५ टेक्नॉलॉजीचे विशेष प्रयोगही करुन पाहिले. या ५ मटेरीअलपैकी, हिंद कोलाज कंपनीचे 'रोड बाँड',वंडर टेक्नॉलॉजीजचे 'वंडर पॅच, आणि शौनक इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीचे 'पॅचमेकर' या मटेरिअलचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. सन २०१२-१३ च्या पावसाळयामध्ये रस्त्यांवरील खड्डुयांच्या दुरुस्त्यांच्या कामात या टेक्नॉलॉजीचा वापर करण्याचे प्रस्ताविले आहे.

### ७.१.३ दर्जा संनियंत्रण आणि रस्त्यांचे गुणवत्ता परिक्षण

सिमेंट कॉंक्रीट तसेच डांबरी रस्त्यांची कामे चालू असताना कामाचा दर्जा राखण्यासाठी त्या कामांवर निकट पर्यवेक्षण ठेवणे गरजेचे असते. अतएव, सन २०११-१२ च्या रस्त्यांच्या कामामध्ये दैनंदिन तत्वावर दर्जा हमी व दर्जा नियंत्रण याकरिता मे. एस्.जी.एस्. इंडिया प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मे. एस्.जी.एस्. इंडिया प्रा.लि. यांना देण्यात आलेल्या कामाच्या व्याप्तीमध्ये वेंडरने सादर केलेला क्वॉलिटी अॅशुरन्स प्लॅन, कच्चा माल तयार करण्याच्या ठिकाणी आणि प्रत्यक्ष वापरावयाच्या कामाच्या जागेवर काटेकोर तपासणी, अलाईनमेंट लेव्हलवर पर्यवेक्षण व नियंत्रण आणि पेव्हमेंट लेअर्ससाठी आवश्यक असलेल्या पृष्ठभागाची पातळी, साप्ताहिक दर्जा नियंत्रण अहवाल आणि त्रैमासिक परिक्षण अहवाल महानगरपालिका प्रशासनाला सादर करणे या कामांचा समावेश आहे. सन २०१२-१३ मध्ये देखील प्रकल्प कामांवर ''त्रयस्थ पक्षकाराकडून'' तपासणी करुन घेण्यासाठी अशाच प्रकारच्या यंत्रणांची नियुक्ती करण्याचे प्रस्ताविले आहे.

### ७.१.४ दर्जात्मक हमी व नियंत्रणासाठी नवीन तंत्रज्ञानाची उपयुक्तता

#### १)रस्ते परिरक्षण व्यवस्थापन प्रणाली (आर्.एम्.एम्.एस्)

पध्दतशीर परिरक्षणाच्या अभावामुळे रस्त्याच्या दर्जाचा लवकर ऱ्हास होतो. जर रस्त्याचे नियमित परिरक्षण करण्यात आले तर लहान खळगे / भेगा, छिद्रे यांचे मोठया खड्डयात रुपांतर होण्यापूर्वीच उपाययोजना करण्यात येते. इतकेच नाही तर, कमीत कमी खर्चात रस्ते जास्त काळ टिकविता येऊ शकतात. या त्रुटींवर मात करण्यासाठी मुंबईतील रस्त्यांचे परिरक्षण आणि

व्यवस्थापनासाठी ''रस्ते परिरक्षण व्यवस्थापन प्रणाली (आर्.एम्.एम्.एस्)''चा अवलंब करण्यात येत आहे.

या प्रणाली अंतर्गत प्रत्येक रस्त्याला क्रमांक देऊन प्रत्येक रस्त्याचा लहान गटात समावेश करण्यात येतो आणि प्रत्येक गटाची जबाबदारी एका दुय्यम अभियंतावर सोपविण्यात येते. या दुय्यम अभियंत्याला रस्ते अभियंता (आर.ई.) असे संबोधण्यात येईल. या रस्ते अभियंत्याने कामाची अंदाज पत्रके तयार करणे आणि त्याच्या/तिच्या अधिपत्याखालील प्रत्येक रस्त्याच्या परिरक्षणाची कामे चालू असताना त्यावर देखरेख ठेवणे अपेक्षित आहे. त्यामुळे जबाबदारी निश्‍चित केली जाईल आणि नियमित परिरक्षणामुळे रस्त्यांच्या आर्युमानामध्ये वाढ होईल. या प्रणाली अंतर्गत रस्त्याच्या सद्य स्थितीबद्दल अहवाल तयार करण्यात येईल आणि ज्या रस्त्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे अशा रस्त्यांची यादी तयार करुन त्यांचा अग्रक्रम ठरविण्यात येईल.

२)<u>रस्त्याचे दर्जा नियंत्रण आणि उपयोगिता सेवांचे नकाशा चित्रण व व्यवस्थापनासाठी रोड स्कॅनर्स</u>

रोड स्कॅनरचा उपयोग करुन रस्त्याचे दर्जा नियंत्रण आणि उपयोगिता सेवाचे भौगोलिक नकाशा चित्रण, निम्न पृष्ठभागाचा थर/ बांधकाम, उपयोगिता सेवांचे नकाशा चित्रण व व्यवस्थापनासाठी, संस्थांची नियुक्ती करण्याचे प्रस्ताविले आहे. सदर बाबतीत चाचणी चालू आहे. या तंत्रज्ञानामुळे रस्त्यावरील भेगा तसेच रस्त्याच्या पृष्ठभागाखालील पोकळया/खळगे तसेच रस्त्याच्या पृष्ठभागाखालील धोकादायक अवस्थांबाबत माहिती प्राप्त होण्यास मदत होते. रस्ता खणण्यासाठी परवानगी देण्याअगोदर ''जीपीआर'' सर्वेक्षण करण्याचे प्रस्ताविले आहे. त्याशिवाय या तंत्रज्ञानाने, दोष निवारण कालावधीमध्ये असलेल्या रस्त्यांवरील खाच-खळगे, भेगा, रटींग

(वाहनांमुळे रस्त्यावर पडलेल्या चाकोऱ्या) तसेच या तंत्रज्ञानाने, नव्याने सुधारलेल्या रस्त्यांच्या थरांची रेखाचित्रे, खड्डे, भेगा इत्यादी बाबींचे परिक्षण करण्याचे योजिले आहे.

३) <u>सेंसॉर बेस्ड रोलर (Sensor Based Roller)</u>

कामांच्या निविदा मागविताना रस्त्यांचा कामांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून 'सेन्सॉर बेस्ड रोलर' चा वापर अनिवार्य करण्यासारख्या अटींचा समावेश करण्याचे प्रस्ताविले आहे.

४) <u>ट्रॅफिक सिम्युलेशन</u>

ज्या रस्त्यांच्या बाबतीत रस्ता रेषा निश्चित करावयाच्या आहेत अशा रस्त्यांवरिल वाहतूकीचे सुसंगतरित्या वहन होण्यासाठी, 'ट्रॅफीक सिम्युलेशन स्टडीज' करण्याचे प्रस्ताविले आहे. याकरिता या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विशेष यंत्रणाकडून स्वारस्य अभिव्यक्ती (E.O.I.) मागविण्यात येईल. या कामी स्वारस्य असलेल्या यंत्रणांपैकी सक्षम यंत्रणांची निवड महानगरपालिकेच्या पॅनलवर करण्यात येईल. रस्त्यांच्या रुंदीकरणाचे, वाहतूकीची दिशा (एक दिशा/व्दिदिशा मार्ग) ठरविण्याचे आणि ट्रॅफिक इंजिनिअरिंग इ.चे प्रस्ताव अंतिम करण्यापूर्वी या यंत्रणांकडून ट्रॅफिक आणि कंप्युटर सिम्युलेशन केले जाईल. याकरिता ₹५ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे.

## ७.२ <u>वाहतूक प्रचालन</u>

### ७.२.१ <u>एरिया ट्रॅफिक कंट्रोल (ए.टी.सी.)</u>

मुंबई शहरामधील वाहतूक सिग्नल्समध्ये सुधारणा करण्याकरिता जागतिक बँकेचे अर्थसहाय्य असलेला ''एरिया ट्रॅफिक कंट्रोल प्रकल्प'' या पूर्वीच कार्यान्वित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत २५३ ट्रॅफिक जंक्शनचा अंतर्भाव आहे. शहरातील वाहतूक नियंत्रित

करण्याकरिता तसेच पादचारी व वाहतूकदारांच्या सोयीसाठी नॉन एटीसी वाहतूक सिग्नल्स्वर टायमर्स बसविण्यात आले आहेत. भारत सरकारच्या नागरी विकास मंत्रालयाकडून सन २०११-१२चा भारतामधील सर्वोत्तम वाहतूक व्यवस्थेचा पुरस्कार या प्रकल्पास प्राप्त झाला आहे.

७.३ **पूल**

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २५३ पूल आहेत. स्थायी तांत्रिक सल्लागार समितीने अशी शिफारस केली आहे की प्रत्येक ५ वर्षातून अशा पूलांची पहाणी करण्यात यावी, जेणेकरुन योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे शक्य होईल. त्यानुसार यावर्षी तपशिलवार तपासणी करण्याचे प्रस्ताविले आहे. अशी पाहणी करीत असताना २५ वर्षांपेक्षा जुन्या आणि ज्या पुलांची मागिल ५ वर्षांत दुरुस्ती करण्यात आलेली नाही अशा सर्व पुलांची संरचनात्मक सुरक्षितता आणि लेन वाढविण्याची शक्यता पडताळण्यात येईल.

सन २००९-२०१० मध्ये अशा पूलांची दृष्य चाचणी/तपासणी केली असता असे आढळून आले की ३४ पुलांच्या बाबतीत, तपशिलवार तपासणी, चाचण्या करण्याची आवश्यकता आहे. या करिता तीन एजेन्सी नेमण्यात आल्या आहेत. हया ३४ पुलांपैकी २ पुलांच्या दुरुस्तीची कामे रेल्वेतर्फे हाती घेण्यात आली आहेत. मुंबई महानगरपालिकेतर्फे दोन पुलांची पुनर्बांधणी व दोन पुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. एक पूल पाडून तेथे एम.एम.आर.डी.ए.मार्फत सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्त्याचे (एस.सी.एल.आर.) बांधकाम प्रस्ताविले आहे. उर्वरित पूल सन २०१२-१३ मध्ये हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे.

₹४१ कोटी एवढया किंमतीच्या खर्चाने २० पुलांच्या पुर्नपृष्टीकरण करण्याचा सर्वसमावेशक कार्यक्रम आखण्यात आला आहे व त्याकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत. या पुर्नपृष्टीकरणासाठी तांत्रिक पध्दत स्थायी तांत्रिक सल्लागार समितीच्या सल्ल्याने अंतिम करण्यात आली.

जाहिरातींच्या अधिकाराच्या मोबदल्यात शहर, पश्चिम आणि पूर्व उपनगरांतील १५ पादचारी पूलांची ''संकल्पचित्रे बनविणे, बांधणे, उपयोगात आणणे आणि हस्तांतरीत करणे''(डीबीओटी) या तत्वावर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. याकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर बांधकाम कंत्राटदाराने पुलांचे बांधकाम करुन त्याचे १६ वर्षांकरिता परिरक्षण करणे तसेच महापालिकेला प्रती वर्षी ₹२.४० कोटी एवढी रक्कम अदा करावयाची आहे.

मुंबई महानगरपालिकेतर्फे जोगेश्वरी उत्तर आणि आणि जोगेश्वरी दक्षिण येथे दोन मोठे पूल बांधण्याचे काम चालू आहे. जोगेश्वरी (दक्षिण) येथील रस्तावर पूल बांधण्यासाठी ₹९० कोटी आणि जोगेश्वरी (उत्तर) येथील पूलासाठी ₹७५ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद सन २०१२-१३ मध्ये प्रस्ताविली आहे.

पुलांच्या बांधकामासाठी सन २०११-१२ मध्ये केलेला ₹१६५ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद जवळपास दुप्पटीने वाढवून सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹३२७ कोटी इतकी करण्यात आली आहे.

## ८. आरोग्य आणि वैद्यकीय सेवा

आरोग्य क्षेत्राला या अर्थसंकल्पात देखील प्राधान्य देण्यात आले असून विद्यमान आरोग्य सेवांमधील त्रुटी ओळखून त्यावर उपाययोजना करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न मी केलेला आहे. सन २०११-१२ मध्ये आरोग्य सेवांसाठी भांडवली अर्थसंकल्पात ₹५१० कोटी एवढी तरतूद करण्यात आली होती, ती २०१२-१३ मध्ये ₹६५५ कोटीपर्यंत वाढविण्यात आली आहे. नागरी रुग्णालयांमधील रुग्णशय्यांच्या संख्येत सन २०१२-१३ मध्ये ७८२ इतकी वाढ प्रस्ताविली असून सन २०१३-१५ मध्ये अतिरिक्त ६१५ रुग्णशय्या उपलब्ध करण्याचे प्रस्ताविले आहे.

(₹ कोटीत)

| | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|
| महसुली खर्च | १६७२.४७ | १६९०.२३ |
| भांडवली खर्च | ५१०.६३ | ६५५.४५ |
| एकूण | २१८३.१० | २३४५.६८ |

### ८.१ मुंबई आरोग्य अभियान

प्राथमिक, माध्यमिक आणि विशेष वैद्यकीय स्तरावर गुणात्मक दर्जाच्या आरोग्य सेवा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एप्रिल, २०१० मध्ये 'मुंबई आरोग्य अभियान' सुरु केले. सुरुवातीला झोपडपट्टीवासीयांना बाह्यद्वार सेवा पुरविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या मोहीमेला आता प्राथमिक, माध्यमिक आणि विशेष वैद्यकीय स्तरावर गुणात्मक आरोग्य सेवा पुरविण्याकरिताचा सर्वंकष कार्यक्रम असे व्यापक स्वरुप प्राप्त झाले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका १६२ दवाखाने आणि १८३ आरोग्य केंद्रांमार्फत प्राथमिक स्तरावरील आरोग्य सेवा पुरविते. मुंबई आरोग्य अभियानांतर्गत सन २०११ मध्ये प्रत्येक

दवाखाना एक किंवा अधिक आरोग्य केंद्रांशी जोडण्यात आला आहे. आरोग्य केंद्र व दवाखाने यांच्या या लिंकेज कार्यक्रमांतर्गत आरोग्य केंद्रांच्या बाह्यद्वार कर्मचारी वर्गाकडून घरोघरी जाऊन रोगांचे संनिरिक्षण केले जाते. रोगांची लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांना लवकरात लवकर दवाखान्यात पाठवून त्यांच्यावर योग्य ते उपचार तातडीने केल्यामुळे ''**लवकर निदान व योग्य उपचार**'', या संकल्पनेची पूर्तता केली जाते.

आरोग्य केंद्रे व दवाखाने यांचे 'लिंकेज' आणि घरोघरी जाऊन केले जाणारे रोगाचे संनिरिक्षण या दोन संकल्पनांसह प्रभावी किटकनियंत्रण उपाययोजनांमुळे मुंबईत मलेरियाचा प्रादुर्भाव रोखण्यात व त्यावर नियंत्रण मिळविण्यात महापालिका प्रशासनास लक्षणीय यश मिळाले आहे हे नमूद करताना मला आनंद होत आहे. वर्ष २०१० च्या तुलनेमध्ये २०११ मध्ये मलेरियाच्या रुग्ण संख्येत लक्षणीय घट झाली आहे ते पुढील तक्त्यावरुन दिसून येते.

| | २०१० | २०११ | % घट |
|---|---|---|---|
| केसेस | ७६७५५ | ३९८२२ | ४८ |
| एस.पी.आर. | ५.५ | २.४ | ५६ |
| इन डोअर पेशंट (रुग्णालयात भरती झालेल्या रुग्णांची संख्या) | २६६९४ | १९४०६ | २७ |
| मृत्यूचे प्रमाण | १४५ | ६९ | ५२ |

मलेरिया व पावसाळयात उदभवणाऱ्या इतर आजारांच्या बाबतीत प्रभावी ठरलेले हे मॉडेल अधिक कार्यक्षम करण्यात येईल व क्षय रोगांसारख्या सांसर्गीक व मधुमेहासारख्या असांसर्गीक आजारांचे लवकर निदान व्हावे याकरिता त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

## ८.२ आरोग्य शिबिरे

सन २०११ च्या पावसाळयात झोपडपट्टया व झोपडपट्टीसदृश्य वस्त्यांमध्ये बाहयद्वार (outreach) सेवा पुरविण्यासाठी सुरु केलेली आणखी एक अभिनव मोहीम म्हणजे 'आरोग्य शिबिरे'.

आरोग्य सेवा पुरविण्याच्या पारंपारिक पध्दतीनुसार दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांवर उपचार केले जातात. तर 'बाहय द्वार सेवा' या मोहिमेअंतर्गत रोगाचे लवकरात लवकर निदान व्हावे व त्यांवर योग्य उपचार मिळावेत याकरिता वस्त्यांमध्ये विशेष करुन झोपडपट्टया व झोपडपट्टीसदृश्य वस्त्यांमध्ये महापालिकेचे डॉक्टर्स नियमित भेटी देतात. ''आरोग्य शिबिरांचे'' आयोजन आणि ''दवाखाने – आरोग्य केंद्रे लिंकेज'' या कार्यक्रमाअंतर्गत घरोघरी जाऊन केलेले रोगाचे संनिरिक्षण यामुळे पावसाळयात उदभवणाऱ्या आजारांवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता आले.

समाजात मोठया प्रमाणावर आढळणाऱ्या क्षय, मधुमेह, कर्करोग आणि इतर आजारांचेही निदान लवकर व्हावे याकरिता अशा आरोग्य शिबिरांचे नियमित आयोजन करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

## ८.३ दवाखाने दर्जोन्नती कार्यक्रम

महापालिकेच्या २४ विभागांत उपयुक्त ठिकाणी असलेले १६२ दवाखाने हे आपल्या प्राथमिक आरोग्य सेवेचे मुख्य आधारस्तंभ आहेत. गतवर्षीच्या अर्थसंकल्पात या दवाखान्यांची दर्जोन्नती करुन ती उच्च दर्जाच्या सेवा देणारी प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रे बनविण्याचे योजिले होते. पहिल्या टप्प्याअतंर्गत ५४ दवाखान्यांचे आधुनिकीकरण मे, २०१२ पर्यंत पूर्ण होईल हे नमूद करताना मला आनंद होत आहे. या अर्थसंकल्पीय वर्षात या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत

आणखी ९७ दवाखान्यांचे आधुनिकीकरण व दर्जोन्नती करण्याचे प्रस्ताविले आहे. उर्वरित ११ दवाखान्यांचे दर्जोन्नतीचे काम तिसऱ्या टप्प्यांतर्गत सन २०१३-१४ मध्ये हाती घेण्यात येईल.

या सर्व दवाखान्यातील डॉक्टर्सचे रुग्णविषयक कौशल्य वृध्दींगत व्हावे याकरिता अनेक कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळांमध्ये वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभले. अशा अनेकविध उपक्रमांमुळे हे दवाखाने गुणात्मक दर्जाच्या आरोग्य सेवा पुरवतील असा मला विश्वास वाटतो.

गतवर्षीच्या अर्थसंकल्पीय निवदेनात मी अशीही घोषणा केली होती की ज्या वस्त्यांमध्ये दवाखान्यांच्या सेवांची आवश्यकता आहे अशा वस्त्या निश्चित केल्या जातील. त्यानुसार असे २७ परिसर/वस्त्या निश्चित करण्यात आल्या असून त्या ठिकाणी नवीन दवाखान्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ५ दवाखाने मे, २०१२ पासून व उर्वरित दवाखाने पुढील एका वर्षात कार्यरत होतील.

### ८.४ उपनगरीय रुग्णालये – लिंकेज सिस्टिम

मुंबईच्या पूर्व उपनगरातील ८ व पश्चिम उपनगरातील ८ अशा एकूण १६ उपनगरीय रुग्णालयांद्वारे जवळ-जवळ एक कोटी लोकसंख्येला मध्यम स्तरावरील आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

गतवर्षीच्या अर्थसंकल्पात मी उपनगरीय रुग्णालये व प्रमुख रुग्णालये यांच्यातील लिंकेज सिस्टिमची घोषणा केली होती. या लिंकेज सिस्टिमद्वारा के.ई.एम. रुग्णालय, नायर आणि सायन ही प्रमुख रुग्णालये उपनगरीय रुग्णालयांशी संलग्न करण्याचे तसेच उपनगरीय रुग्णालयांना आवश्यक असलेल्या विशेष सेवा निश्चित करुन त्या प्रमुख रुग्णालयांमधील तज्ञ डॉक्टर्सद्वारा पुरविण्याचे प्रस्ताविले होते.

सर्व १६ उपनगरीय रुग्णालये ३ प्रमुख रुग्णालयांशी संलग्न करण्यात आली असल्याचे व लिंकेज सिस्टीम झाल्याचे नमूद करताना मला आनंद होत आहे.

| प्रमुख रुग्णालये | उपनगरीय रुग्णालये |
|---|---|
| के.ई.एम. रुग्णालय | १. के.बी.भाभा रुग्णालय, वांद्रे (प)<br>२. डॉ.आर.एन.कूपर रुग्णालय, जुहू<br>३. के.बी.भाभा रुग्णालय, कुर्ला<br>४. वी.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ (पू)<br>५. शताब्दी रुग्णालय, गोवंडी |
| नायर रुग्णालय | १. हरीलाल भगवती रुग्णालय, बोरिवली<br>२. शताब्दी रुग्णालय, कांदिवली<br>३. एम.डब्लू.देसाई रुग्णालय, मालाड<br>४. एस.के.पाटील रुग्णालय, मालाड<br>५. सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगाव |
| सायन रुग्णालय | १. संत मुक्ताबाई रुग्णालय, बर्वेनगर<br>२. राजावाडी रुग्णालय, घाटकोपर<br>३. क्रां.म.ज्यो.फुले रुग्णालय, विक्रोळी<br>४. स्वा.वि.दा.सावरकर रुग्णालय, मुलुंड (पू)<br>५. म.तु.अगरवाल रुग्णालय, मुलुंड (प)<br>६. मॉ रुग्णालय, चेंबूर |

या लिंकेज योजनेला गती मिळेल व जगात इतरत्र आढळून येत असल्याप्रमाणे ती विशेष सेवा पुरविणारा दुवा म्हणून स्थापित होईल अशी मला आशा वाटते. या लिंकेज सिस्टिमचा विशेष फायदा उपनगरातील रहिवाश्यांना होईल कारण त्यामुळे त्यांच्या परिसरातील उपनगरीय रुग्णालयांत विशेष प्रकारच्या शस्त्रक्रिया व उपचार करता येतील.

## ८.५ उपनगरीय रुग्णालयातील रुग्णशय्या वाढविणे

महापालिका रुग्णालयातील रुग्णशय्यांची मागणी व पुरवठा यातील तफावत दूर करण्यासाठी विद्यमान रुग्णालयांचा विकास करणे व नवीन रुग्णालये बांधण्याचे प्रयत्न गतवर्षी पासून प्राधान्याने करण्यात आले.

उपनगरातील रुग्णालयातील सध्याची ३७८६ इतक्या रुग्णशय्या क्षमतेत आगामी २ वर्षात १०४७ रुग्णशय्यांची भर घालण्यात येईल. त्यापैकी ४३२ रुग्णशय्या २०१२-१३ मध्ये उपलब्ध होतील आणि उर्वरित रुग्णशय्या सन २०१३-१५ मध्ये उपलब्ध होतील.

| अनु क्र. | रुग्णालयाचे नांव | अर्थसंकल्पीय तरतूद (रुपये कोटीत) | रुग्णशय्यांमधील वाढ | |
|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | २०१३-१४ आणि २०१४-१५ |
| एक) १. | शताब्दी रुग्णालय, कांदिवलीचा पुनर्विकास | ४९ | - | १९५ |
| २. | कस्तुरबा क्रॉस रोड रुग्णालयाचा पुनर्विकास/पुनर्बांधणी | ३० | - | १५० |
| ३. | कूपर रुग्णालयाचे पुनर्बांधकाम. | ९० | ६० | - |
| ४. | जोगेश्वरी (पू) येथे ट्रॉमा रुग्णालयाची उभारणी | ५४.३५ | २६६ | |
| ५. | विक्रोळी येथील क्रां.म.ज्यो.फुले रुग्णालयाची दर्जोन्नती | १५ | - | १७० |
| ६. | गोवंडी शताब्दी रुग्णालयाची दर्जोन्नती | १० | - | १०० |
| दोन | विद्यमान उपनगरीय रुग्णालयांमधील आरोग्य सुविधा वाढविल्यामुळे रुग्णशय्यांमध्ये होणारी वाढ | -- | १०६ | - |
| | **एकूण** | | (अ) ४३२ | (ब) ६१५ |
| | **एकूण (अ) व (ब)** | | १०४७ | |

रुग्णालयांतील प्रस्तावित वाढीनंतर या उपनगरीय रुग्णालयांतील एकूण रुग्णशय्यांची संख्या खालीलप्रमाणे होईल :-

| | विद्यमान रुग्णशय्यांची संख्या | प्रस्तावित वाढ | वाढ झाल्यावर होणारी रुग्णशय्यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| पश्चिम उपनगरे | २०५२ | ७१३ | २७६५ |
| पूर्व उपनगरे | १७३४ | ३३४ | २०६८ |
| एकूण | ३७८६ | १०४७ | ४८३३ |

८.६ **उपनगरीय रुग्णालयांमधील आरोग्य सेवांमध्ये वाढ**

१)**डायग्नोस्टिक सेवा**

उपनगरातील सार्वजनिक क्षेत्रात एम.आर.आय.डायग्नोस्टिक सेवांची गरज लक्षात घेता मी पश्चिम उपनगरातील कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात व पूर्व उपनगरातील गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात अशा एकूण २ नवीन एम.आर.आय. सेंटर्ससाठी एकूण ₹ १४ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे. उपनगरातील सार्वजनिक क्षेत्रातील ही पहिलीच एम.आर.आय. सेंटर्स असून ती सप्टेंबर, २०१२ पर्यंत कार्यान्वित होतील. त्यामुळे उपनगरात अद्ययावत डायग्नोस्टिक सेवेची न्यूनता भरुन निघेल.

त्याचप्रमाणे भगवती रुग्णालय, वि.एन.देसाई रुग्णालय व राजावाडी रुग्णालयातील विद्यमान सी.टी. स्कॅन सेंटर्स शिवाय गोवंडी शताब्दी रुग्णालय येथे एक नवीन सी.टी. स्कॅन सेंटर प्रस्ताविले आहे. यासाठी ₹ ६ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**२)दंत शस्त्रक्रिया सुविधा**

याबरोबरच दंत शस्त्रक्रियांची गरज लक्षात घेऊन मी ११ उपनगरीय रुग्णालयात दंत शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्ताविले आहे.

**३)माता व बाल आरोग्य संगोपन**

सध्या महापालिकेकडे उपनगरात फक्त ५७ निओनेटल इंटेंसिव्ह केअर युनिट (एनआयसीयू) रुग्णशय्या उपलब्ध आहेत. महापालिकेच्या आरोग्य क्षेत्रात माता आणि नवजात बालके यांच्या आरोग्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे याकरिता मी उपनगरीय रुग्णालयांत ५० अतिरिक्त एन.आय.सी.यु. रुग्णशय्या उपलब्ध करुन देण्याचे आणि त्यासाठी यथोचित तरतूद करण्याचे प्रस्ताविले आहे. यामुळे माता आणि नवजात बालकांना आपल्या घरा जवळील रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध झाल्यामुळे मुख्य रुग्णालयांकडे पाठविण्यात येणाऱ्या अवघड प्रकरणांत घट होईल असा मला विश्वास वाटतो.

| तपशील | प्रस्तावित अतिरिक्त एन.आय.सी.यु. बेड्स | प्रस्तावित एन.आय.सी.यु. |
|---|---|---|
| एम.डब्ल्यू.देसाई रुग्णालय, मालाड | १० | नवीन |
| के.बी.भाभा रुग्णालय, कुर्ला | १० | नवीन |
| शताब्दी रुग्णालय, गोवंडी | १० | नवीन |
| व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ | ५ | विद्यमान १० एन.आय.सी.यु. रुग्णशय्यांमध्ये वाढ |
| भगवती रुग्णालय, बोरिवली | ५ | विद्यमान १० एन.आय.सी.यु. रुग्णशय्यांमध्ये वाढ |
| राजावाडी रुग्णालय, घाटकोपर | १० | विद्यमान १० एन.आय.सी.यु. रुग्णशय्यांमध्ये वाढ |
| **एकूण** | ५० | |

नायगाव, गोरेगाव आणि देवनार प्रसुतीगृहांच्या मुख्य दुरुस्त्यांसाठी प्रस्ताविलेल्या तरतुदीं व्यतिरिक्त प्रसुतीगृहांच्या दर्जोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या साधनसामग्रीच्या खरेदीसाठी ₹ ५ कोटी इतकी व विविध प्रसुतीगृहाच्या संरचनात्मक दुरुस्त्यांसाठी ₹ ६ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

दिंडोशी आणि मालाड (पू) परिसरातील नागरिकांसाठी मागच्या अर्थसंकल्पात प्रस्ताविलेले २० रुग्णशय्येचे रिध्दी प्रसुतीगृह सन २०११ मध्ये कार्यान्वित करण्यात आले आहे.

**४)डायलिसिस सेवा**

उपनगरात असलेली डायलिसिस सेवांची मुख्य गरज ओळखून मी उपनगरीय रुग्णालयांमध्ये २६ डायलिसिस युनिट्स उभारण्याचे प्रस्ताविले आहे. तसेच प्रमुख रुग्णालयांमध्ये अशी २५ युनिट उभारण्यात येतील. यामुळे उपनगरामध्ये १९५० आणि प्रमुख रुग्णालयांमध्ये १८७५ असे प्रतिमाह एकूण ३८२५ अतिरिक्त डायलिसिस स्लॉटस् निर्माण होतील.

| तपशील | डायलिसिस युनिट्स |
|---|---|
| व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ (पू) | ६ |
| एम.डब्ल्यू.देसाई रुग्णालय, मालाड | ६ |
| राजावाडी रुग्णालय, घाटकोपर | ८ |
| शताब्दी रुग्णालय, गोवंडी | ६ |
| प्रमुख रुग्णालये | २५ |
| एकूण | ५१ |

**५)तात्काळ वैद्यकीय सेवा**

रेल्वे व रस्ते अपघातग्रस्त अतिगंभीर अवस्थेतील रुग्णांना तातडीने आवश्यक असलेल्या उपचारांसाठी शहरातील प्रमुख रुग्णालयांकडे पाठविण्याचे प्रकार कमी करण्यासाठी सन २०११ मध्ये संत मुक्ताबाई रुग्णालय, सिध्दार्थ नगर रुग्णालय येथे अपघात सेवा विभाग व विक्रोळी येथील क्रां.म.ज्यो.फुले रुग्णालयातील अतिदक्षता विभाग कार्यान्वित करण्यात आले आहेत.

याशिवाय, खालील उपनगरीय रुग्णालयांमध्ये १० रुग्णशय्यांचे ट्रॉमा युनिट सुरु करण्यासाठी मी पुरेशी तरतूद प्रस्ताविली आहे.

| तपशील | ट्रॉमा बेड्स |
|---|---|
| के.बी.भाभा रुग्णालय, कुर्ला | १० |
| व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ | १० |
| शताब्दी रुग्णालय, गोवंडी | १० |

तसेच विक्रोळी येथील क्रां.म.ज्यो.फुले रुग्णालय व म.तु. अगरवाल रुग्णालय, मुलुंड येथील दुरुस्त्यांसाठी देखील मी यथोचित तरतूद प्रस्ताविली आहे.

याआधीच्या परिच्छेदात तपशीलवार दर्शविल्यानुसार विद्यमान रुग्णालयांचा पुनर्विकास, नवीन रुग्णालयांचा विकास तसेच विद्यमान रुग्णालयातील आरोग्य सेवांमध्ये वृध्दी याद्वारे उपनगरात उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवांची दर्जोन्नती करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत.

६)<u>उपनगरीय रुग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता</u>

या आधीच्या वर्षामध्ये उपनगरीय रुग्णालयांमध्ये सुपर स्पेशालिटी डॉक्टर्सच्या सेवा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. लिंकेज सिस्टिमचा अवलंब करुन व महापालिकेत प्रथमच पोस्ट ग्रॅज्युएटस् व सुपर स्पेशालिस्ट बंधपत्रधारक विद्यार्थी डॉक्टर्स यांची उपनगरीय रुग्णालयांत नियुक्ती करुन ही गरज भागविण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागात सध्या एकूण २३३ पोस्ट ग्रॅज्युएट्स व सुपर स्पेशालिस्ट बंधपत्रधारक विद्यार्थी डॉक्टर कार्यरत असून त्यापैकी १८८ डॉक्टर्स उपनगरीय रुग्णालयांमध्ये सेवा देत आहेत.

८.७ <u>प्रमुख रुग्णालये</u>

महापालिकेच्या तीन वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न तीन प्रमुख रुग्णालयांमध्ये एकत्रित ४,९३९ इतकी रुग्णशय्या क्षमता उपलब्ध असून दररोज सरासरी १२,६६० रुग्णांवर बाह्यरुग्ण कक्षात उपचार केले जातात.

<u>के.ई.एम. रुग्णालय व सेठ जी.एस.मेडीकल कॉलेज</u>

१. २२ मजली नवीन इमारतीचे बांधकाम जवळपास पूर्ण होत आले असून ती मे, २०१२ पर्यंत कार्यान्वित होईल. चालू वर्षी या इमारतीच्या उर्वरित बांधकामासाठी ₹ ८ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. या इमारतीमध्ये निवासी डॉक्टर्स आणि शिकाऊ डॉक्टर्स यांच्या राहण्याची सोय करण्यात येईल. त्यामुळे मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या निर्देशांची पूर्तता करणे शक्य होईल.

२. निवासी डॉक्टर्स व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी कमी खर्चाच्या डॉरमिटरीजकरिता नवीन २२ मजली इमारत बांधण्याकरिता त्याचे तपशिलवार अंदाज व आराखडे

तयार करण्याचे काम हाती घेण्यात येत असून त्यासाठी मी ₹ २ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

३. गतवर्षीच्या अर्थसंकल्पीय निवदेनात नमूद केल्यानुसार के.ई.एम. रुग्णालयाच्या पुर्नस्थापनेतील ₹ ३५ कोटी इतक्या खर्चाचे पहिल्या टप्प्यातील काम एप्रिल, २०११ मध्ये पूर्ण झाले आहे. वारसा वास्तूच्या पुर्नस्थापनेच्या टप्पा दोन मधील काम जवळपास पुर्णत्वास आले असून त्यासाठी ₹ २० कोटी इतकी पुरेशी तरतूद मी प्रस्ताविली आहे.

४. के.ई.एम. रुग्णालयातील विद्यमान एम.आर.आय. संयंत्र बदलण्यासाठी मी ₹ ७ कोटीची तरतूद केली आहे. या संयत्रांसह उपनगरातील २ नवीन एम.आर.आय. युनिटच्या उभारणीमुळे सध्याचा तीन महिने इतका प्रतिक्षेचा कालावधी जवळपास संपुष्टात येण्यास मदत होईल.

५. इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी आणि इंटरव्हेंशनल न्युरो रेडिओलॉजी सुविधा उपलब्ध असलेले के.ई.एम. रुग्णालय हे मुंबईतील सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव रुग्णालय आहे. या रेडिओलॉजीच्या विशेष उपशाखेद्वारे मेंदू, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंड तसेच आतडी यासारख्या प्रमुख इंद्रियांना जोडणाऱ्या नॉन-कोरोनरी व्हॅस्क्युलर स्ट्रक्चर्सवर उपचार करता येतील. त्यामुळे ज्या रुग्णांना जीवरक्षक उपायांची आवश्यकता आहे अशा रुग्णांना मदत होऊ शकेल. या सुविधेद्वारे प्रतिवर्षी जवळपास ३,५०० रुग्णांवर उपचार केले जातात. ही यंत्रणा बदलणे आवश्यक असल्याने त्यासाठी ₹ ७ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.

६. कार्डिओलॉजी विभागातील कॅथ लॅबद्वारे विविध हृदय विकारानी ग्रस्त असलेल्या व ॲन्जिओप्लास्टीची गरज असणाऱ्या जवळपास ४००० रुग्णांवर दरवर्षी उपचार

केले जातात. विद्यमान कॅथ लॅबचे आयुष्यमान संपत आल्याने ती बदलणे आवश्यक असल्याने त्यासाठी ₹ ६ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

२) **सायन रुग्णालय**

१. सायन रुग्णालय पश्चिम द्रुतगती मार्ग, पूर्व द्रुतगती मार्ग तसेच मध्य, हार्बर आणि पश्चिम या तीनही रेल्वे मार्गांच्या संगमस्थानी स्थित असल्याने त्याला रुग्णसेवेसाठी महत्व प्राप्त झालेले आहे.

२. गतवर्षीच्या अर्थसंकल्पीय निवेदनात नमूद केल्यानुसार या रुग्णालय संकुलातील टप्पा एक मधील नवीन इमारतीचे बांधकाम जून, २०११ मध्ये पूर्ण झाले असून त्यामध्ये सर्व बाह्य रुग्ण विभागांचे स्थानांतर करुन ती कार्यान्वित झाली आहे. नविन इमारतीत सर्व बाह्य रुग्ण विभाग स्थापित केल्यामुळे विद्यमान इमारतीतील उपलब्ध झालेल्या रिक्त जागेत अतिरिक्त २०० रुग्णशय्यांची सोय करता येईल.

३. सायन रुग्णालय हे या शहरातील सर्वांत मोठे ट्रॉमा सेंटर आहे. या सेंटरचा ''स्पेशलाइज्ड सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ट्रॉमा केअर ॲन्ड इमर्जन्सी सर्व्हिसेस'' म्हणून विकास करण्याचे मी नियोजिले आहे. या वर्षात उपलब्ध करुन द्यावयाच्या प्रस्तावित २०० रुग्णशय्यांपैकी, १४० रुग्णशय्या या केवळ ट्रॉमा केअर, इन्टेंसिव्ह केअर, इमर्जन्सी सर्व्हिसेस आणि आपत्कालीन व्यवस्थापनासाठी विशेषत्वाने उपलब्ध केल्या जातील. अपघातग्रस्त रुग्णांची शस्त्रक्रियेनंतरची देखभाल, प्लास्टिक सर्जरी, कार्डिओलॉजी इत्यादी शाखांच्या आयसीयु रुग्णशय्येमध्ये देखील वाढ व विस्तार करण्यात येईल.

३) <u>नायर रुग्णालय</u>

१. गतवर्षी घोषणा केल्यानुसार नायर रुग्णालयातील तात्काळ वैद्यकीय सेवा विभाग सप्टेंबर, २०११ पासून सुरु करण्यात आला आहे.

२. या रुग्णालयाच्या रुग्णशय्या क्षमतेमध्ये मी १५० रुग्णशय्यांची वाढ करण्याचे प्रस्ताविले आहे. त्यानुसार नायर रुग्णालयातील विद्यमान १,२२९ इतकी रुग्णशय्या क्षमता वाढून ती १,३७९ इतकी होईल.

८.८ <u>नवीन उपक्रम</u>

१) <u>असांसर्गिक आजार (एन.सी.डी.)</u>

संपूर्ण समाजात उच्च रक्तदाब व मधुमेह यासारख्या असांसर्गिक आजारांचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेऊन १४ नोव्हेंबर, २०११ या जागतिक मधुमेह दिनी एकूण २८ डायबिटिक क्लिनिक्स सुरु करण्यात आली आहेत. मधुमेहाचा सर्वत्र फैलावलेला प्रादुर्भाव ओळखून आरोग्य सेवेच्या प्राथमिक स्तरावर म्हणजे दवाखान्यात त्यावरील उपचार उपलब्ध करुन देणारी मुंबई महापालिका ही पहिलीच महापालिका ठरली आहे. या अर्थसंकल्पीय वर्षात सदर कार्यक्रमाला बळकटी देण्यासाठी यथोचित तरतुदी करण्यात आल्या आहेत.

२) <u>कॅन्सर केअर</u>

कॅन्सरवरील उपचारांसाठी सध्या उपलब्ध असलेल्या विद्यमान केमोथेरपी आणि रेडिओथेरपी या सुविधांमध्ये वाढ करुन व २० रुग्णशय्या असलेले 'डे केअर युनिट' स्थापन करुन नायर रुग्णालयाची ''सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ॲडव्हान्स्ड कॅन्सर ट्रिटमेंट'' म्हणून दर्जोन्नती करावयाचे प्रस्ताविले आहे.

सन २०१२ मध्ये के.ई.एम. व नायर रुग्णालय येथे व सन २०१३मध्ये पुनर्विकसित कूपर रुग्णालयात मेमोग्राफी सुविधा कार्यान्वित होतील. ब्रेस्ट कॅन्सरच्या पहिल्या स्तरावरील

चाचणीसाठी आवश्यक असलेले रुग्णचिकित्सांचे कौशल्य उपलब्ध होऊन या रुग्णांना तिथून पुढील उपचारांसाठी उच्चतम दर्जाच्या आरोग्य सेवा देणाऱ्या रुग्णालयांकडे निर्देशित करण्यात येईल.

**३)क्षयरोग घट आणि नियंत्रण यासाठी मुंबई आराखडा**

क्षयरोग (टीबी) आणि औषधांना दाद न देणारा क्षयरोग (डीआरटीबी) यांचे प्राबल्य ही एक गंभीर बाब झाली आहे याची नोंद घेऊन मुंबईतील क्षयरोगाचा फैलाव आटोक्यात आणण्यासाठी व हा रोग नियंत्रणात ठेवण्यासाठी महापालिकेने राज्य व केंद्र शासनाच्या समन्वयाने 'सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम' अंतर्गत एक व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे.

चुकीच्या, अयोग्य व अपूर्ण उपचारामुळे औषधांना दाद न देणाऱ्या प्रकारचा क्षयरोग वाढतो. शक्यतोवर टीबी आणि डीआरटीबीच्या सर्व रुग्णांना 'सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम'अंतर्गत योग्य उपचार मिळतील याची दक्षता घेण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. यामुळे पैशाअभावी गरीब रुग्ण औषधोपचारांपासून वंचित राहणार नाहीत.

या आराखडयाचे चार विभिन्न घटक असून त्यांच्या अंमलबजावणीकरिता पुरेशी तरतूद करण्याची मी दक्षता घेतली आहे.

**४)संस्थात्मक बळकटीकरण**

मुंबई क्षयरोग नियंत्रण अधिकारी नियुक्त करण्यात आला असून आर.एन. टी.सी.पी. कार्यक्रमाअंतर्गत महापालिकेच्या २४ विभागांपैकी प्रत्येक विभाग हा एक 'जिल्हा' म्हणून विचारात घेतला जाणार आहे. त्यानुसार २४ विभागीय क्षयरोग अधिकारी नियुक्त करण्यात आले असून त्यांनी कामाला सुरुवात केली आहे.

**८.९ जी.टी.बी.रुग्णालयाची दर्जोन्नती करणे**

सन १९४२ साली स्थापन झालेले १००० रुग्णशय्या असलेले महापालिकेचे जी.टी.बी. रुग्णालय (ग्रुप ऑफ टी.बी. हॉस्पिटल) हे क्षयरोगावरील विशेष उपचारांचे देशातील सर्वात मोठे

रुग्णालय आहे. या रुग्णालयाची दर्जोन्नती करण्याचे प्रस्ताविले आहे. त्यानुसार या रुग्णालयाच्या दुरुस्त्या आणि रुग्णालयाशी संलग्न बहाद्दुरजी ब्लॉकच्या व्यापक दुरुस्त्या करण्यासाठी अनुक्रमे ₹ ३ कोटी व ₹ ३.५० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे. बहाद्दुरजी ब्लॉकच्या दुरुस्त्या पूर्ण झाल्यावर तेथे क्षयरोग उपचारासाठी तिथे अतिरिक्त २०० रुग्णशय्या उपलब्ध करता येईल. या रुग्णालयातील प्रमुख ऑपरेशन थिएटर्स उच्च दर्जाच्या उपकरणांनी सुसज्ज करण्याचे व पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे नियोजिले आहे.

याच प्रमाणे जी.टी.बी.रुग्णालय समुहातील विद्यमान प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण आणि दर्जोन्नती करण्यासाठी पुरेशा तरतूदी प्रस्ताविण्यात आल्या आहेत. यामुळे ड्रग रेझिस्टंट टी.बी. चे (डी.आर.टी.बी.) निदान करण्यासाठी लिक्विड कल्चर व एल.पी.ए.(लाईन प्रोब अॅसे) यांच्या अद्ययावत निदानात्मक क्षमता उपलब्ध होतील. या आधुनिक निदानात्मक सुविधा जुलै, २०१२ मध्ये कार्यान्वित होतील.

जी.टी.बी. रुग्णालयातील डॉट प्लस साईटची विद्यमान ४० इतकी क्षमता ९० पर्यंत वाढविण्याचे प्रस्ताविले असून त्यामुळे डी.आर.टी.बी.रुग्णांवर सत्वर उपचार करणे शक्य होईल.

### ८.१० विशेष रुग्णालये

महापालिकेच्या आरोग्य विभागाअंतर्गत ५ विशेष रुग्णालये आहेत. जी.टी.बी. रुग्णालयांची सर्वंकष दर्जोन्नती करण्याचे यापूर्वीच प्रस्ताविले आहे.

गत अर्थसंकल्पात प्रस्तावित केल्यानुसार संसर्गजन्य रोगांच्या कस्तुरबा रुग्णालयातील १० रुग्णशय्यांचा अतिदक्षता विभाग जून, २०१२ मध्ये कार्यान्वित होईल. या अर्थसंकल्पात कस्तुरबा रुग्णालय संकुलातील बर्न वॉर्डची दहा रुग्णशय्यांचा अतिदक्षता विभाग, फिजिओथेरपी युनिट व ऑपरेशन थिएटर यासह दर्जोन्नती करण्याचे प्रस्ताविले आहे.

फोर्ट येथील सेठ अे.जे.बी. कान, नाक, घसा रुग्णालयाच्या वारसा वास्तूमधील पुर्नस्थापनेच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे. या रुग्णालयाकरिता मायक्रोस्कोपिक सर्जरी इक्विपमेंटस, सर्जिकल इन्टरव्हेनशनसाठी स्टरीलायझर्स पुरविण्याचे प्रस्ताविले आहे.

डोळयांवरील विशेष स्वरुपांच्या शस्त्रक्रियांसाठी ऑपरेटिंग मायक्रोस्कोप पूरवून आणि बाह्य रुग्ण विभागात ग्लॅकोमा स्क्रिनिंग सेंटर सुरु करुन महापालिकेच्या नेत्र रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरची दर्जोन्नती करण्याचे प्रस्ताविले आहे.

९. **शिक्षण :<u>महापालिका शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता/दर्जा यांमध्ये सुधारणा</u>**

आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात शिक्षण क्षेत्राला मी उचित प्राधान्य दिलेले आहे आणि विशेषत: शैक्षणिक मुलभूत सुविधा अधिक बळकट करण्याकरिता व शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी शिक्षणाशी संबंधित विविध महत्वाच्या बाबींसाठी भरीव तरतूदी प्रस्ताविल्या आहेत.

अर्थसंकल्प 'ई' साठी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील ₹१८००.५१ कोटी एवढी अर्थसंकल्पीय तरतूद सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२३४२.६३ कोटी पर्यंत वाढविण्यात आली आहे. काही महत्वाच्या प्रस्तावित योजना/उपक्रम खालीलप्रमाणे आहेत :-

**१)<u>व्हर्च्युअल क्लासरुम</u>**

सन २०११-१२ मध्ये ८० शाळांमध्ये व्हर्च्युअल क्लासरुम हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमाला विद्यार्थी तसेच शिक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. सन २०१२-१३ या वर्षात आणखी ४०० शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. याकरिता ₹२८ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

२)**महापालिका शालेय इमारतींची दुरुस्ती आणि दर्जोन्नती**

महापालिकेच्या एकूण ४५२ शालेय इमारती असून त्यातील १०३ इमारतींची दुरुस्ती/दर्जोन्नती करण्याची आवश्यकता नाही. शिवाय ४ इमारती पुनर्विकास योजनेअंतर्गत नव्याने बांधून मिळणार आहेत. उर्वरित ३४५ इमारतींपैकी ८३ इमारतींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत आणि १८६ शालेय इमारतींची कामे (१ नवीन इमारतीचे बांधकाम धरुन) प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ७७ शालेय इमारतींची कामे ही सन २०१२-१३ मध्ये हाती घेण्यात येणार आहेत. शालेय इमारतींची दुरुस्ती व दर्जोन्नतीसाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹३०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

३)**शुध्द पाणी पुरवठा**

महापालिकेच्या स्वत:च्या तसेच भाडेतत्वावरील सर्व शालेय इमारतींमध्ये विद्यार्थ्यांना शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचे प्रस्ताविले आहे. त्यापैकी ३२ इमारतींमध्ये 'बँक ऑफ बडोदा' जल शुध्दीकरण यंत्रे (Water Purifier) बसविणार आहे. उर्वरित ४२१ महापालिकेच्या आणि ६१ खाजगी शालेय इमारतींमध्ये एकूण १४१७ जल शुध्दीकरण यंत्रे महापालिकेतर्फे बसविण्यात येतील. याकरिता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹४.९८ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

४)**वाचनालये**

सन २०११-१२ या वर्षात 'रुम टू रिड इंडिया' या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने महापालिकेने मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या विविध माध्यमांच्या ७५ शाळांमध्ये वाचनालये सुरु केली आहेत. ही योजना प्रभावी ठरल्याने आगामी वर्षात या योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या सर्व शालेय इमारतींमध्ये वाचनालये सुरु करण्याचे प्रस्ताविले आहे. ही संस्था सन २०१२-१३ मध्ये

आणखी १०० वाचनालये सुरु करणार आहे. उर्वरित २७८ शालेय इमारतींमध्ये महानगरपालिका स्वखर्चाने वाचनालये सुरु करणार आहे. याकरिता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ₹४.९३ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

५)स्वच्छतागृहांची दुरुस्ती

महानगरपालिकेच्या सर्व शालेय इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीत असे आढळून आले की, 'सर्व शिक्षा अभियानाच्या' निकषांनुसार मुलांसाठी १४ शौचकूपांची आणि मुलींसाठी ७ शौचकूपांची, विकलांग विद्यार्थ्यांसाठी २१५ पाश्चिमात्य शौचकूपांची आणि ७५ मूतार्‍यांची कमतरता आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या निकषांनुसारची स्वच्छतागृहांची पूर्तता सन २०१२-१३ मध्ये करण्यात येईल. याकरिता ₹७० लाख एवढी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

६)शिक्षक प्रशिक्षण केंद्र

ज्ञान आणि अध्यापन पध्दती अद्ययावत करण्याच्या दृष्टीकोनातून प्राथमिक शिक्षकांचे ज्ञान, अध्यापन कौशल्य, कला, भाषा आणि शारिरीक शिक्षण यांची दर्जोन्नती करण्याकरिता त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. अतएव, प्राथमिक शिक्षकांसाठी 'एल' विभागातील चांदीवली येथे एक निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याचे प्रस्ताविले आहे. याकरिता ₹५ कोटी एवढी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

७)शाळा गुणवत्ता वाढ कार्यक्रम

सन २०११-१२ मध्ये सुरु करण्यात आलेल्या ''शााळा गुणवत्तावाढ कार्यक्रमाचा'' आणखी विस्तार करण्याचे प्रस्ताविले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत 'युनिसेफ' च्या सहाय्याने ४२

मराठी माध्यमाच्या आणि ३२ उर्दू माध्यमाच्या शाळांचा समावेश करण्यात आला आहे. आगामी वर्षात आणखी मराठी माध्यमाच्या ४२ व उर्दू माध्यमाच्या ३२ शाळांमधून सदर कार्यक्रम सुरु करण्याचे प्रस्ताविले आहे.

## १०. घन कचरा व्यवस्थापन

बृहन्मुंबई महानगरपलिकेला साफसफाई, कचऱ्याचे संकलन, वाहतूक व दररोज निर्माण होणाऱ्या ६,५०० मेट्रिक टन कचऱ्याची व २५०० मेट्रिक टन गाळ, दगड-विटा इत्यादींची विल्हेवाट लावण्याचे काम पार पाडावे लागते. महापालिका घन कचरा नियमावली २००० चे पालन करण्यासाठी मुंबई महापालिकेने कचऱ्याची साठवणूक व वाहतूक बंदिस्त वाहनांतून करण्याच्या पध्दतीचा अवलंब यापूर्वीच केला आहे. त्यासाठी वस्त्यावस्त्यांमधुन कचरा संकलन केंद्रांवर तात्पुरती साठवणूक करण्यासाठी बंदिस्त डबे पुरविण्यात आले आहेत. या उपक्रमांना अधिक बळकटी आणण्यासाठी तसेच हे उपक्रम अधिक स्वच्छ व आरोग्यपूर्ण वातावरणात पार पाडता यावेत याकरिता आगामी वर्षात काही महत्वाच्या उपाययोजना करण्याचे प्रस्ताविले असून त्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :-

### १. मोठया प्रमाणावर कच-याची साठवण होणारी संकलन केंद्रे

१)बृहन्मुंबईतील काही भागांचा झपाटयाने विकास होत असल्यामुळे काही ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होतो. अशा ठिकाणी १५मे.टन क्षमतेचे ४२ स्टेशनरी कॉम्पॅक्टर्स उभारण्यात आले असून ५ नवीन ठिकाणी अशा प्रकारचे स्टेशनरी कॉम्पॅक्टर्स उभारण्याचे प्रस्ताविले आहे. यासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹७.२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. बीएस-४ मानकांच्या वाहनांचे सांगाडे उपलब्ध नसल्याने सन २०११-१२मध्ये स्टेशनरी कॉम्पॅक्टर्स खरेदी करणे शक्य झाले नाही.

२) जुनी वाहने बदलण्याकरिता घ्यावयाच्या ३८ मिनी कॉम्पॅक्टर्स व ६९ नवीन कॉम्पॅक्टर्सची खरेदी देखील बीएस-४ मानकांच्या वाहनांचे सांगाडे बाजारात उपलब्ध नसल्याने करता आलेली नाही. कोर्टाच्या मध्यस्थीनंतर उत्पादकांनी जुलै २०१२ पासून या वाहनांचे उत्पादन करण्याचे मान्य केले आहे. या वाहनांच्या खरेदीसाठी सन २०१२-१३ साठी ₹२८.४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

२) **स्वच्छता मोहीम**

स्वच्छता मोहीमेअंर्तगत मुंबई शहरात शून्य कचरा स्थिती कायम ठेवण्याकरिता विविध योजना राबविण्यात येत आहेत. सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात दत्तक वस्ती योजनेकरिता ₹४२ कोटी, स्वच्छ परिसर योजनेकरिता ₹२९.०२ कोटी, मॅनिग मॉपिंग कार्यक्रमाकरिता ₹२६.६४ कोटी आणि कचरा हलविण्याकरिता ₹२०२.५६ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. समुद्र किनारे आणि मुंबईतील पर्यटनस्थळे म्हणून प्रसिध्द असलेल्या चौपाट्यांची स्वच्छताही अहोरात्र करण्यात येत आहे. त्यासाठी ₹६.१० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. उपरोल्लेखित विविध योजनांसाठी सन २०१२-१३ मध्ये सर्व मिळून एकूण ₹३०६.३२ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

महानगरपालिकेद्वारे नियमितरित्या रस्त्यांची सफाई केली जाते. परंतु रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांच्या खालच्या जागेची स्वच्छता करता येत नाही. या समस्येवर काही प्रमाणात मात करण्यासाठी सध्या घन कचरा व्यवस्थापन खात्याकडे उपलब्ध असलेले व पंपाची सुविधा असलेले ५ वॉटर टँकर्स (फायरेक्स) (खाजगी प्रचालक सध्या देवनार क्षेपणभूमीवर त्यांचे स्वत:चे पंप वापरत असल्याने अतिरिक्त असलेले) वापरुन सकाळच्या वेळी रस्त्यावर उभ्या केलेल्या वाहनांच्या खालच्या बाजूची स्वच्छता करण्याचे व रस्ता धुण्याचे प्रस्ताविले आहे. लवग्रोव्ह

सांडपाणी प्रक्रिया संयंत्रात प्रक्रिया केलेले पाणी हे रस्ते धुण्यासाठी वापरण्यात येईल. शहर विभागातील जवळपास २५ कि.मी. लांबीचे रस्ते या तऱ्हेने स्वच्छ केले जातील.

३) <u>लिटर बिन्स बसविणे</u>

सार्वजनिक ठिकाणे आणि महत्वाचे रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी १०,००० ठिकाणी ६.५ लिटर क्षमतेचे २०,००० कच-याचे नवे डबे बसविण्यासाठी ₹६.५ कोटीची तरतूद सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात केली आहे.

४) <u>नविन आधुनिक स्थानांतरण केंद्रे</u>

महालक्ष्मी स्थानांतरण केंद्राच्या धर्तीवर गोराई, वर्सोवा आणि कुर्ला स्थानांतरण केंद्रांचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यामुळे कचरा दाबून गच्च बसविणे व बंदिस्त वाहनातून क्षेपणभूमीपर्यंत वाहून नेणे शक्य होऊन कचरा स्थानांतरण केंद्र परिसरातील वातावरण दुर्गंधीमुक्त राहिल. ज्या प्लॅटफॉर्मवर कचरा गोळा केला जातो त्या सभोवतालची जागा बंदिस्त असल्याने नजरेस पडणारे गलिच्छ दृश्य टाळता येईल. सन २०१२-१३ मध्ये गोराई स्थानांतरण केंद्राच्या आधुनिकीकरणासाठी ₹१५कोटी एवढी तरतूद केली आहे.

५) <u>क्षेपणभूमींचा विकास</u>

प्रति दिन ६५००मे.टन एवढ्या तयार होणा-या कचऱ्याची समस्या सोडविण्याकरिता ''एकात्मिक घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत'' एक योजना आखण्यात आली आहे आणि या योजनेअंतर्गत देवनार क्षेपणभूमीवरील ६५हेक्टर जागा शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. २००९मध्ये सुरु झालेले देवनार क्षेपणभूमी अंशत: शास्त्रोवत पध्दतीने बंद करण्याचे काम पुढील वर्षी पूर्ण होणे अपेक्षित आहे.

प्रस्तावित प्रकल्पांतर्गत देवनार येथे प्रतिदिन २०००मे.टन, कांजूरमार्ग येथे ४०००मे.टन व मुलुंड येथे ५००मे.टन एवढ्या घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी संयंत्रे

उभारणे हे काम सार्वजनिक-खाजगी भागीदारी (Public Private Partnership) अंर्तगत खाजगी प्रचालकास देण्यात आलेल्या कंत्राटात अंर्तभूत करण्यात आले आहे. हे प्रकल्प जानेवारी २०१३ मध्ये कार्यान्वित होतील अशी अपेक्षा आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१२-१३च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ₹१०८ कोटींची तरतूद केली आहे. हे प्रकल्प JNNURM अंतर्गत मंजूर झाले आहेत.

६) **'आश्रय' प्रकल्प**

''आश्रय'' प्रकल्पांतर्गत सफाई कामगारांच्या शहर आणि उपनगरातील सेवा निवासस्थानांचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिका करणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रथमत: महापालिका अर्थसंकल्पात तरतूद करुन महानगरपालिकेच्या स्वनिधीमधून घन कचरा व्यवस्थापन खात्यातील सफाई कामगारांसाठी आश्रय प्रकल्पांतर्गत सेवा निवासस्थाने बांधण्याचे प्रस्ताविले होते. तथापि, आता हा प्रकल्प स्वयंपूर्ण व्हावा या दृष्टीकोनातून सदर आश्रय प्रकल्प सार्वजनिक-खाजगी (PPP) तत्वावर राबविण्याचे प्रस्ताविले आहे.

## ११. उद्याने

उद्यान खात्याने सन २०११-१२ या वर्षात २९ उद्यानांचा विकास / दर्जोन्नती केली आहे. सदर उद्यानांचा लँडस्केपिंग, पायवाटा, जॉगिंग ट्रॅक, प्रवेशद्वारे, जेष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था व मुलांसाठी खेळांची साधने इत्यादी सुविधांसह सर्वंकष विकास करण्यात आलेला आहे. पी/दक्षिण विभागामध्ये ५००० रोपांची लागवड करुन एक 'वनोद्यान" विकसित करण्यात आले आहे. गोरेगाव (पू) येथे वागेश्वरी मंदीराजवळ आणखी एक उद्यान वैशिष्टयपूर्णरित्या विकसित करण्यात आलेले असून त्याठिकाणी वन्य प्राण्यांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. कांदिवली

येथील सुमारे १०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आकारमानाच्या खजुरिया टँकचा विकास करण्यात आला असून या ठिकाणी तलावात कारंजे उभारण्यात आले आहे.

सन २०१२-१३ मध्ये १३ नवीन उद्यानांचा विकास करण्याचे व माहीम खाडीजवळ 'इस्चुरीयन पार्क" विकसित करण्याचे प्रस्ताविले आहे. २०१२-१३ मध्ये उद्यान विभागासाठी एकूण ₹४३ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

## ११.१ वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प

मुंबईचे हरित स्वरुप कायम ठेवण्यासाठी वृक्ष प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका विद्यमान वृक्षांचे जतन व परिरक्षण तसेच नवीन झाडे लावणे यासारखे विविध उपक्रम राबवित असते. तसेच पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने झाडे, फुले, फळे, भाज्या इत्यादींचे प्रदर्शन व 'उद्यान विज्ञान' विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. सन २०१२-१३च्या वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्पाचे आकारमान ₹४१.२८कोटी इतके आहे. शहर आणि उपनगरांमधील विद्यमान वृक्षांचे जतन करण्यासाठी आणि नवीन वृक्षांची लागवड व परिरक्षण करण्याकरिता सन २०१२-१३ च्या महसुली अर्थसंकल्पात ₹२२.३८ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. वृक्ष छाटणी वाहनांची खरेदी करण्यासाठी ₹७० लाखाची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या तरतुदींनुसार मुंबईच्या हद्दीतील खाजगी जमिनींसह सर्व जमिनींवरील विद्यमान झाडांची गणना दर ५ वर्षांनी करणे आवश्यक आहे. मागील वृक्षगणना सन २००७ साली करण्यात आली होती. या प्रयोजनासाठी सन २०१२-१३ च्या वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्पात ₹६ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आलेली आहे. वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प त्याप्रमाणात वाढविण्यात येईल.

## ११.२ वीरमाता जीजाबाई भोसले उद्यान प्राणीसंग्रहायलाचे आधुनिकीकरण

सन १८६२ मध्ये स्थापन झालेले वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान प्राणीसंग्रहालय हे देशातील जुन्या प्राणीसंग्रहालयापैकी एक असून त्याचे क्षेत्रफळ सुमारे ५३ एकर आहे. या उद्यान प्राणिसंग्रहालयास ''**पुरातन वास्तू श्रेणी -२ (ब)**'' म्हणून घोषित करण्यात आले असून सदर प्राणीसंग्रहालयाचे वर्गीकरण ''**मध्यम प्राणीसंग्रहालय**'' असे करण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये १६ लाख नागरिकांनी या प्राणीसंग्रहालयास भेट दिली. सदर प्राणीसंग्रहालयाचे आधुनिकीकरण करण्याचे प्रस्ताविले आहे. केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण यांनी प्राणीसंग्रहालय आधुनिकीकरणाचा प्रस्ताव संमत केला आहे.

प्राणीसंग्रहालयाचे आधुनिकीकरण ऑगस्ट २०१४ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. संपूर्ण प्रकल्पाचा खर्च अंदाजे ₹१५० कोटी इतका असेल.

प्राणीसंग्रहालयाच्या मान्यताप्राप्त बृहत आराखडयाची संकल्पना ''लिव्हिंग टुगेदर'' अशी असून प्राण्यांच्या नैसर्गिक वस्तीस्थानाशी मिळतेजुळते नैसर्गिक पिंजरे तयार करण्यावर भर देण्यात येईल. प्राण्यांच्या पिंजऱ्यामध्ये ''एन्व्हिरॉनमेंटल एनरिचमेंट'' करण्यात येईल ज्यामुळे प्राण्यांच्या जीवशास्त्रीय, फिजिऑलॉजिकल तसेच वर्तणूकीय इ.गरजा भागविल्या जातील.

प्राण्यांच्या पिंजऱ्याभोवती नव्या खंदकांचे बांधकाम न करता कोणत्याही मौल्यवान झाडांच्या मुळांना नुकसान पोहोचणार नाही याचीदेखिल काळजी घेण्यात येईल. सध्याच्या खंदकांमामध्ये गरजेनुसार केवळ काही सुधारणा करुन दर्शकांच्या सुरक्षित व सुलभ अवलोकनार्थ प्राण्यांच्या व दर्शकांच्या मध्ये अॅक्रेलिक / काचांचे पॅनेल्स लावण्यात येतील. प्राणीसंग्रहालयामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण सेन्ट्रल अॅक्सीस रचना तशीच ठेवण्यात येत आहे.

सन २०१२-१३ मध्ये सुरु होणाऱ्या टप्पा क्रमांक-१ मध्ये करावयाच्या विकास कामांमध्ये कॅट फॅमिलीतील विविध प्राणी जसे की, बंगाली वाघ, आशियाई सिंह, बिबळया, रानमांजर, सामान्य उदमांजर, पाम उदमांजर, मोठी भारतीय उदमांजर, लेपर्ड कॅट इ. तसेच लांडगा, देशी अस्वल, रानकुत्रे, तरस, कोल्हा, पाणमांजर, सर्पालय, मद्रास पॉड कासवे, मगर व घडियाल यांचा तलाव, साळींदर या प्राण्यांच्या पिंजऱ्यांची बांधकामे हाती घेण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे इतर विकासकामांतर्गत पुरातन वास्तुंचे जतन करणे, एन्ट्री प्लाझा विकसित करणे, माहिती केंद्रांची आंतररचना करुन त्यामध्ये हम्बोल्ट पेंग्वीन व समुद्री मासे यांच्याकरिता विशेष कक्ष विकसित करणे, अंतर्गत रस्ते व पायवाटा, सांडपाणी व इतर व्यवस्था, बागा व हिरवळी विकसित करणे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थानांचे बांधकाम आणि प्राणिसंग्रहालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या नियमित गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या कामांचा समावेश आहे. पवई येथील पक्षी व सरपटणाऱ्या प्राण्यांच्या उद्यानाचा बृहत आराखडा तयार करुन घेणे हे देखिल समाविष्ट असून उपरोक्त सर्व कामांकरिता सन २०१२-१३ मध्ये ₹७० कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान प्राणीसंग्रहालयाचे १५० वे वर्ष साजरा करावयाच्या विविध कार्यक्रमांतर्गत येथील जैवविविधता दर्शविणाऱ्या पुस्तिका प्रकाशित करणे इ. कामांसाठी सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकामध्ये ₹२५ लाखांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## १२. पर्जन्य जलवाहिन्या

बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्या संपूर्ण पर्जन्य जलवाहिन्या प्रणालीची सुधारणा सन १९९३ च्या "ब्रिमस्टोवॅड" अहवालानुसार ताशी २५ मि.मि. इतक्या तीव्रतेच्या पावसाला अनुसरुन, पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठीच्या ०.५० या एककासाठी करीत होती. तथापि, जुलै, २००५ च्या पूरपरिस्थितीनंतर महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीने(चितळे

समिती) पावसाच्या तीव्रतेमध्ये ताशी ५० मि.मि. एवढी व पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठीच्या क्षमतेमध्ये १.०० एककापर्यंत वाढ सुचवून त्यानुसार सुधारित मापदंडाची शिफारस केली.

सन २००७ मध्ये भारत सरकारने बृहन्मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या प्रणाली क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी एकरक्कमी ₹१२०० कोटीचे विशेष अनुदान मंजूर केले. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत एकुण ५८ कामांपैकी दिनांक १ एप्रिल, २०११ पर्यंत १४ कामे पूर्ण झाली असून, ३४ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित १० कामांच्या निविदा मागविण्यात यावयाच्या होत्या. त्यापैकी ६ कामे सन २०११-१२ मध्ये सुरु करण्यात आली आहेत.

ज्या ४ कामांच्या निविदा अद्याप मागवावयाच्या आहेत त्यापैकी १ काम म्हणजेच दादर-माहिम पर्जन्य जलवाहिनी वळविण्याचे काम ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या बृहत आराखडयामध्ये करण्यात येत असलेल्या सुधारणेमुळे सद्यस्थितीत वगळण्यात आले आहे. उर्वरित ३ कामे, ब्रिटानिया, माहूल आणि मोगरा-गझदरबंध येथील नियोजित उदंचन केंद्रांशी निगडीत असून या कामांच्या निविदा मागवून त्यांचे कार्यादेश सन २०१२-१३ मध्ये देण्यात येतील.

सन २००७ च्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने ₹१२०० कोटी इतके विशेष अर्थसहाय्य मंजूर केले आहे. त्यापैकी, आजमितिपर्यंत ₹१००० कोटी एवढा निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. आजमितीपर्यंत ₹१२१२ कोटी इतका खर्च झालेला आहे. तथापि, संकल्पचित्राच्या मानकांमध्ये झालेल्या बदलांमुळे जलवाहिन्यांच्या रुंदी व खोलीमध्ये झालेली वाढ, प्रामुख्याने भरती-ओहोटीच्या क्षेत्रातील जलवाहिन्यांचे काम करण्यासाठी अपारंपारीक तंत्रज्ञानाची आवश्यकता आणि कालाच्या ओघात विशेषकरुन अतिक्रमणांमुळे प्रकल्पाच्या एकुण आर्थिक गरजेमध्ये झालेली भरीव वाढ, यामुळे ₹२७०० कोटीच्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे ज्यासाठी सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल भारत सरकारकडे सादर करण्यात येत आहे.

परंतु, जुलै, २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या तीव्रतेइतका पाऊस झाल्यास त्या आपत्तीपासून शहराला वाचविण्याच्या दृष्टीकोनातून सदर कामे पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे, म्हणून महानगरपालिकेस हा प्रकल्प पूर्णपणे राबविणे गरजेचे आहे. त्या करीता सन २०१२-१३ मध्ये ₹७९४.१९ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या कामांचे दायित्व सन २०१४-१५ पर्यंत महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पावर राहणार आहे.

सन २०११-१२ मध्ये वरील नमुद केलेल्या ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत हाती घेण्यात आलेली काही वैशिष्ट्यपूर्ण कामे खालीलप्रमाणे आहेत.

१. गांजावाला लेन पासून हाजी अली उदंचन केंद्रापर्यंत बॉडीगार्ड लेनमधून ५ मि X ३.५ मि. आकाराची आर.सी.सी. पेटिका नलिका बांधण्याचे काम मार्च, २०१२ पर्यंत पूर्ण होईल. या कामामुळे गांजावाला लेनमध्ये लव्ह ग्रोव्ह नाल्याला जाणारी कमानी नलिका वळवून ती हाजी अली उदंचन केंद्रात नेता येईल. त्यामुळे पाणलोट क्षेत्र १३० मधील अनेक स्थानिक पूरग्रस्त क्षेत्रांसह प्रामुख्याने मुंबई सेंन्ट्रल स्थानक, अलंकार सिनेमा, नायर मार्ग या पूरग्रस्त क्षेत्रांना हाजी अली उदंचन केंद्राचा फायदा मिळेल व त्यामुळे पूरस्थिती कमी होण्यास मदत होईल. वरील कामामध्ये पाणलोट क्षेत्र क्र. १३२ मधील जावजी दादाजी मार्ग व मदनमोहन मालविय मार्गावरील आर्च ड्रेन, २.२ मि. व्यासाच्या दुहेरी आर.सी.सी. नलिकाद्वारे हाजी अली उदंचन केंद्रास जोडण्यात येईल. या कामामुळे नाना चौक, ग्रँन्ट रोड स्थानक, ताडदेव नाका, मदनमोहन मालविय मार्ग, या पूरग्रस्त क्षेत्रांना फायदा मिळेल व तेथील पूरस्थिती कमी होण्यास मदत होईल.

२. शहर विभागातील पठ्ठे बापुराव मार्ग, डॉ. ई.मोजेस रोड, रे रोड आणि ड्रेनेज चॅनेल रोडवरील पर्जन्य जलवाहिन्यांच्या पुनर्वसनाचे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

३. शहर विभागातील महालक्ष्मी रेल्वे स्टेशन येथील रेल्वे ट्रॅकपलिकडील विद्यमान पर्जन्य जलवाहिनीचे आवर्धन करणे आणि मादाम कामा मार्ग, पंडीत मदनमोहन मालविया मार्ग, जावजी दादाजी मार्ग, सेनापती बापट मार्गावरील जावळे मार्ग ते टेक्सटाईल मिल येथील पर्जन्य जलवाहिनी तसेच सेनापती बापट मार्गावरील माटुंगा रोड रेल्वे स्टेशन ते माहिम आऊटफॉल पर्जन्य जलवाहिनी आणि शहर विभागातील विद्यमान कमानी नलिका / आयताकृती पर्जन्य जलवाहिन्या यांचे मजबुतीकरण करणे, पुनर्वसन करणे आणि तदनंतर सात वर्षाकरीता त्यांचे सर्वंकष परिरक्षण करणे या कामांचे कंत्राट देण्यात आले आहे. सदर कामांअंतर्गत शहर विभागामध्ये १६८४१ मि. लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्यांचे पुनर्वसन व आवर्धन करण्याचे प्रस्तावित केले आहे. ही सर्व कामे सन २०१३-१४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

४. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत हाजी अली, ईर्ला, लव्ह ग्रोव्ह व क्लीव्ह लँड बंदर या ठिकाणी समुद्राच्या पातमुखावर यांत्रिकी, विद्युत, यंत्रचलित उपकरणे यांचा पुरवठा, उभारणी व प्रस्थापनेसह उदंचन केंद्राची संरचना व बांधकाम आणि सर्वंकष प्रचालन व परिरक्षण करण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत.

एकुण ८ उदंचन केंद्रांच्या कामांपैकी हाजी अली व ईर्ला येथील उदंचन केंद्रे माहे मे, २०११ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. आता लव्ह ग्रोव्ह व क्लिव्ह लँड बंदर येथील पर्जन्य जल उदंचन केंद्रांची कामे सुरु करण्यात आली आहेत. ब्रिटानिया उदंचन केंद्रासाठी निविदा मागविण्यात आल्या असून उर्वरित गझदरबंद, मोगरा आणि माहूल येथील पर्जन्य जल उदंचन केंद्रे उभारण्याच्या कामांच्या निविदा सन २०१२-१३ मध्ये मागविण्याचे प्रस्तावित आहे. उदंचन केंद्रांच्या कामासाठी ₹१७५.१० कोटी इतकी रक्कम सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात प्रस्ताविण्यात आली आहे.

भारत सरकारला सादर केलेल्या उपरोल्लेखित ब्रिमस्टोवॅड प्रकल्प कामांव्यतिरिक्त महानगरपालिकेने नाला प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी इतर कामे हाती घेतली आहेत. सन २०११-१२ मध्ये ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाव्यतिरिक्त ४५ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ४० कामे सन २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्यात येणार असून त्यासाठी ₹५२३.२८ कोटी एवढी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

## १२.१ कामांची सद्यस्थिती

बृहन्मुंबईमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या मोठया पर्जन्य जलवाहिन्या / नाल्यांची एकुण लांबी सुमारे ३८२ कि.मी. असून त्यापैकी ब्रिमस्टोवॅड आणि ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाव्यतिरिक्त कामांतर्गत एकूण ७५.५ कि.मी. लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्या /नाल्यांचे पुनर्वसन /सुधारणा/पुनर्बांधकाम दिनांक ३१.३.२०११ पर्यंत पूर्ण झालेले आहे. चालू आर्थिक वर्षात (३१.३.२०१२ पर्यंत) पुढील ३१.८ कि.मी.लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्या /नाल्यांचे पुनर्वसन /सुधारणा/पुनर्बांधकाम होणे अपेक्षित आहे.

पुढील आर्थिक वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अनुक्रमे ३३.९ कि.मी. व ६५.२ कि.मी. लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्या /नाल्यांचे पुनर्वसन /सुधारणा/पुनर्बांधकाम प्रस्तावित केले आहे. अशाप्रकारे, दिनांक ३१.३.२०१४ पर्यंत एकुण २०६.५ कि.मी.लांबीच्या पर्जन्य जलवाहिन्या / नाल्यांचे पुनर्वसन /सुधारणा/पुनर्बांधकाम होणे अपेक्षित आहे. उर्वरित कामांचा आढावा घेण्यात येईल व आर्थिक निधीची उपलब्धता आणि कामाच्या जागेची प्रत्यक्ष स्थिती यांचा विचार करुन ही कामे हाती घेण्यात येतील.

## १२.२ मिठी नदीचा विकास

महाराष्ट्र शासनाने मिठी नदीच्या विकासासाठी ''मिठी नदी संरक्षण व विकास प्राधिकरणाची'' स्थापना केली आहे. मिठी नदीच्या एकूण १७.८ कि.मी. लांबीपैकी

११.८ कि.मी. लांबीचा भाग महानगरपालिकेच्या अखत्यारित असून उर्वरित ६ कि.मी. लांबीचा भाग एम.एम.आर.डी.ए.च्या अखत्यारित आहे.

या प्रकल्पामध्ये दिनांक ३१.१०.२०११ पर्यंत ४३८००० घनमीटर इतका गाळ व ५३८००० घनमीटर इतका खडक काढण्यात आला आहे. महानगरपालिकेने बांधावयाच्या अंदाजित २० किमी लांबीच्या संरक्षक भिंतीपैकी ८.० किमी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे नदीच्या पात्राचे ९५ टक्के खोलीकरण पूर्ण झाले आहे. मिठी नदीच्या ट्रेनिंगची कामे (लांबी ४.२कि.मी.) देण्यात आली आहेत. कामांच्या जागेवरील अतिक्रमण हटविल्यानंतर मिठी नदीच्या ट्रेनिंगच्या उर्वरित कामाकरिता (लांबी ७.८कि.मी.) निविदा मागविण्यात येतील.

१२.३ <u>मिठी नदीवरील पूल</u>

मिठी नदी प्रणालीतून जाणा-या पर्जन्य जलवाहिनीच्या भागाचा व्यापक विकास करावयाच्या कामाअंतर्गत एकुण ११ पूल बांधावे लागतील. त्यापैकी, क्रांती नगर येथील पूलाचे बांधकाम पूर्ण झाले असून इतर ३ ठिकाणी म्हणजेच अशोक नगर, बामणदाया रोड, कुर्ला कालिना रोड येथील पुलांचे बांधकाम महापालिकेमार्फत करण्यात येत असून ते प्रगतीपथावर आहे. तसेच, बी.के.सी. येथील पुलाचे काम एमएमआरडीए तर्फे हाती घेण्यात आले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

मिठी नदीच्या विकासासाठी आजपर्यंत ₹५१६.१२ कोटी खर्च झाला आहे आणि सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये ₹५० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. तसेच, मिठी नदीच्या विकासासाठी आवश्यक निधीकरीता व्यापक सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत भारत सरकारला सादर केलेला आहे.

पर्जन्य जलवाहिन्या खात्याच्या प्रकल्प कामांसाठी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात केलेली ₹१२४० कोटी आणि सन २०११-१२ च्या सुधारित अंदाजाखाली केलेली ₹११८७ कोटी तरतूद सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ₹१३२५ कोटी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

१३. **अग्निशमन दल**

सन २०१२ मध्ये ''मुंबई अग्निशमन दल'', निस्वार्थ आणि समर्पित सेवेच्या १२५ व्या वर्षात पदार्पण करत आहे.

या स्मरणार्थ सन २०१२ हे वर्ष 'अग्नि सुरक्षा वर्ष' म्हणून पाळण्याचे ठरविले आहे. यामध्ये 'अग्नि सुरक्षा एक संयुक्त जबाबदारी' यावर भर देण्यात येईल.

सतत वाढणारी आव्हाने लक्षात घेता अग्निशमन दलाच्या अग्निशमन व विमोचन क्षमतेत नियमित वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून अद्ययावत अग्निशमन व विमोचन साधन सामग्री व वाहने यासाठी मी ₹५५.२० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे. मुंबई शहरात उंच व गगनचुंबी इमारतींची झपाटयाने होणारी वाढ लक्षात घेऊन ₹१५ कोटी इतक्या अंदाजित किमतीची ९० मीटर्स उंच क्षमतेची स्नॉरकेल खरेदी करण्याचे प्रस्ताविले आहे. आपल्या अग्निशमन सेवेत हे वाहन समाविष्ट करणारी मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिलीच महानगरपालिका असेल.

कुठल्याही अग्निशमन सेवेची कार्यक्षमता ही दुघर्टनास्थळी पोहोचण्याच्या वेळेवर मोजली जाते. हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या आधीच्या वर्षात महापालिकेने शहरात ६ रिजनल कमांड सेंटर्स स्थापन करायचे ठरविले. त्यापैकी वडाळा कमांड सेंटर नोव्हेंबर, २०११ मध्येच कार्यान्वित झाले असून भायखळा, विक्रोळी, मानखुर्द येथील कमांड सेंटर्स सन २०१२-१३ मध्ये कार्यान्वित करण्याचे प्रस्ताविले असून त्यासाठी ₹२८.५७ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई शहराला १७० कि.मि. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असून पश्चिम किनाऱ्यावर गिरगाव, दादर, जुहु, वर्सोवा, अक्सा आणि गोराई या ६ सुंदर चौपाटया आहेत. मुंबईच्या या समुद्र किनाऱ्यांचे तसेच अमूल्य जीविताचे संरक्षण करण्यासाठी महापालिकेने अग्निशमन दलांतर्गत ''बीच सेफ्टी युनिट्स'' स्थापन केली आहेत. या बीच सेफ्टी युनिट्सचे बळकटीकरण करण्याचे प्रस्ताविले असून त्या अनुषंगाने सेमी इनफ्लेटेबल रेस्क्यू बोटस, ट्रॉलीजसह जेट स्कीज् इत्यादी उपकरणे व बीच लाईफ गार्ड टॉवर्स इत्यादी साधनांसाठी ₹२.१ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

महिलांनी प्रथमच मुंबई अग्निशमन दलात प्रवेश केला आहे हे नमूद करताना मला आनंद होत असून आपल्या ताफ्यात महिला कर्मचारी असणारे मुंबई अग्निशमन दल हे देशातील एकमेव अग्निशमन दल आहे. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी अग्निशमनाचे विशेष स्वरुपाचे व कौशल्याचे काम करणे अपेक्षित आहे. त्यामुळे यथोचित पर्यायी व्यवस्था करुन पहाऱ्यावरील व रुग्णवाहिकेवरील अग्निशामक कर्मचाऱ्यांना मी या दुय्यम स्वरुपाच्या कामातून कार्यमुक्त केले आहे.

## १४. महापालिका मंडया

सार्वजनिक मंडया बांधणे आणि त्या सुस्थितीत ठेवणे हे महापालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे.

गतवर्षीच्या अर्थसंकल्पात घोषणा केलेला ५१ विद्यमान मंडयांच्या व्यापक दुरुस्तीचा कार्यक्रम जवळपास पूर्ण होत आला आहे. सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात बाजार खात्यासाठी भांडवली अर्थसंकल्पात ₹३६.९२ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

महानगरपालिकेने टप्याटप्याने मंडयांचा पुनर्विकास करण्याचे देखिल ठरविले आहे. महापालिका मंडयांच्या पुनर्विकासाच्या टप्पा - १ अंतर्गत १८ मंडयांच्या बाबतीत लेटर ऑफ इन्टेंट (Letter of intent) देण्यात आले आहे.

सिध्दगणक दरावर (Ready Reckoner - Rate) आधारित मंडया पुनर्विकासाचे धोरण सुधारित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून त्यामुळे महापालिकेच्या महसुलात भर पडेल.

## १५. देवनार पशुवधगृह

पशुवधगृह बांधणे व त्याचे विनियमन करणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका सन १९७१ पासून देवनार येथे पशुवधगृह चालवित आहे. देवनार पशुवधगृहाचे टप्प्याटप्प्याने आधुनिकीकरण व पुनर्रचना करण्याची गरज विचारात घेऊन महानगरपालिकेने आधुनिकीकरणाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे. प्रथमत: शेळया व मेंढया वधगृहाचे आधुनिकीकरण पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे. शेळया व मेंढयांसाठी शेड बांधण्यासह इतर संलग्न कामासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹११ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे. त्याचप्रमाणे कायमस्वरुपी शेड बांधण्यासाठी ₹५.८१ कोटीची तरतूद प्रस्ताविलेली आहे.

## १६. महापालिका मुख्यालयाच्या मुख्य इमारतीचे (वारसा वस्तू) जतन आणि अंतर्गत सजावट

मुंबई महानगरपालिका मुख्यालयाची मुख्य इमारत ही श्रेणी - २ अ दर्जाची सुचीबध्द पुरातन वास्तु आहे. नीओ-गॉथिक शैलीने बांधलेल्या १२० वर्ष जुन्या या ऐतिहासिक वास्तूमध्ये दगडी भिंती, लाकडाचे चक्राकार जिने, मंगलोरी कौलांचे छप्पर, दगडी कमानी, दरवाजे व

खिडक्यांवर रंगीत काचांचा सुंदर वापर, सोन्याचा मुलामा देऊन केलेले नक्षीकाम इत्यादी वैशिष्टयपूर्ण कामांचा अंतर्भाव आहे.

सदर पुरातन वास्तुची दुरुस्ती, पुनर्स्थापना व जतन करण्याची कामे मुंबई महानगरपालिकेने विविध टप्प्यात हाती घेतलेली आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यामध्ये दगडी भिंतीचे जतन, संरचनात्मक पुर्नस्थापन व छप्पराच्या दुरुस्तीची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत. दुसऱ्या टप्प्यातील रंगीत काचांच्या पुनर्स्थापनेची कामे प्रगतीपथावर असून तिसऱ्या टप्प्यातील कामांकरिता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत ज्यामध्ये नुतनीकरण, अंतर्गत कार्यालयांची पुनर्रचना, इमारतीतील व बाहेरील मोकळया जागांचे सौंदर्यीकरण इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. यामध्ये, मुंबईचे विहंगम दृश्य पाहण्याकरिता इमारतीच्या मुख्य घुमटाच्या बाजूची गच्ची नागरिकांना खुली करण्याचा देखिल प्रस्ताव आहे. ही कामे मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. सदर कामांकरिता, आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये ₹१५.२५ कोटी एवढी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

### १६.१ <u>अभियांत्रिकी वस्तुसंग्रहालय</u>

जी/दक्षिण विभागातील वरळी इंजिनिअरींग हबमधील भांडार इमारती अभियांत्रिकी वस्तुसंग्रहालय उभारण्याचे प्रस्ताविले आहे. या वस्तुसंग्रहालयासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात या वस्तुसंग्रहालयाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ₹१०लाख इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

## १७. माहिती तंत्रज्ञान

महापालिकेच्या प्रशासनात अधिक पारदर्शकता यावी व महापालिका सेवा सुलभतेने व अधिक जलद गतीने उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेने संगणकीकरणाचे अनेक महत्वाचे

प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांच्या सक्षमीकरणासाठी सन २०१२-१३ च्या महसुली अर्थसंकल्पात ₹८३.७२ कोटी तसेच भांडवली अर्थसंकल्पात ₹ १३०.७७ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**१७.१ माहिती तंत्रज्ञान - सन २०११-१२ मध्ये करण्यात आलेली महत्वाची कामे**

१. **एफएमएस** – महापालिकेतील संपूर्ण संगणक प्रणाली (हार्डवेअर मॅनेजमेंट) फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस या प्रकल्पाअंतर्गत निविदा प्रक्रियेतून यशस्वी ठरलेल्या मे. रिलायन्स कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्याकडे सोपविण्यात आली असून यात सर्व हार्डवेअर्स, ॲप्लिकेशन्स, लायसन्सेस यांचे परिरक्षण समाविष्ट आहे.

२. **प्रशिक्षण** – महापालिकेतील माहिती तंत्रज्ञान विभाग स्वतंत्रपणे चालविण्याकरिता २२४ महापालिका कर्मचाऱ्यांसाठी एसएपी सर्टिफिकेशन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून आजपर्यंत ८० कर्मचा-यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

३. **व्हेंडर एक्झिट पॉलिसी** - मे. टिसीएस आणि मे. एटीएस हे अनुक्रमे महापालिकेचे माहिती तंत्रज्ञान भागिदार व तांत्रिक बाबींचे सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांचा कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यावर, माहिती तंत्रज्ञान खात्याने त्यांचे काम पूर्णत: सांभाळले आहे.

४. **नवीन मनुष्यबळ** - सन २०११-१२ मध्ये माहिती तंत्रज्ञान खात्याची अंतर्गत कार्यक्षमता वाढविण्यासाठी संचालक, व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक तसेच वरिष्ठ व कनिष्ठ प्रणाली विश्लेषक (सिस्टिम ॲनलिस्ट) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

५. **नेटवर्क ॲक्सेस कंट्रोल** – संगणक प्रणालीच्या सुरक्षिततेकरिता नेटवर्क ॲक्सेस कंट्रोल सिस्टिमची तसेच मायक्रोसॉफ्ट एक्टिव्ह डिरेक्टरी सर्व्हिसेसची अंमलबजावणी करण्याचे नियोजिले असून सदर प्रणाल्या लवकरच कार्यान्वित होतील.

६. <u>**मानव संसाधन प्रणालीचे प्रशिक्षण (एचआर मोड्युल)**</u> - एसएपी प्रणालीअंतर्गत १९०० कर्मचाऱ्यांना मानव संसाधन प्रणालीचे प्रशिक्षण देण्याचे नियोजिले असून २०११-१२ मध्ये त्यापैकी ८०७ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना युजर आयडी देण्यात आले आहेत. एसएपी कार्यप्रणालीअंतर्गत एच आर मोड्यूलचाच (मानव संसाधन प्रणाली) एक भाग असलेली बायोमेट्रीक्स एक्सेस सिस्टिम दिनांक ०१.०१.२०१२ पासून महापालिका मुख्यालयात कार्यान्वित करण्यात आली आहे.

७. <u>**सॅप युझर आय डी –**</u> सॅप कार्य प्रणाली मध्ये २६५५ युजर आय डी नव्याने निर्माण करण्यात आले असून सन २०१२-१३ मध्ये किमान १०,००० नवीन युजर्स समाविष्ट करुन घेण्याचे प्रस्ताविले आहे.

८. <u>**ऑनलाइन टेंडरिंगची सुविधा -**</u> महानगरपालिकेने सॅप प्रणालीअंतर्गत ई-टेंडरिंगची सुविधा सुरु केली असून महापालिकेची सर्व खाती ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागवित असल्यामुळे महापालिकेच्या कारभारामध्ये पारदर्शकता आली आहे. अद्यापपर्यंत या प्रणाली अंतर्गत एकूण ११८८ निविदा मागविण्यात आल्या आहेत.(एकूण किंमत ₹४२१७ कोटी)

## १७.२ <u>माहिती तंत्रज्ञान - सन २०१२-१३ मध्ये प्रस्ताविलेली कामे</u>

१. **डिझास्टर रिकव्हरी साईट व माहिती तंत्रज्ञान सुरक्षा प्रणाली** – बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी डेटा सेंटरमध्ये कार्यान्वित केलेल्या सर्व संगणक प्रणालींकरिता डिझास्टर रिकव्हरी साइट मुंबई भूकंप प्रवण क्षेत्राबाहेर स्थापन करण्यात येणार आहे.

२. महानगरपालिकेची रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये तसेच आरोग्य सेवा यांची व्याप्ती वाढविण्यासाठी महानगरपालिकेची रुग्णालये, दवाखाने, प्रसुतीगृहे, वैद्यकीय महाविद्यालये, यांचे संगणकीकरण प्रस्ताविले आहे.

३. **जीओग्राफिकल इन्फॉर्मेशन सिस्टिम (जीआयएस)** – सदर प्रकल्पांतर्गत संपूर्ण महानगरपालिकेच्या विविध खात्यांसाठी एकात्मिक अशी जीआयएस विकसित करण्यात येत आहे. त्यासाठी महत्वाचा असलेला बेसमॅप उपलब्ध करण्याची कार्यवाही आगामी वर्षात पूर्ण होईल.

४. **डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टिम** – प्रत्येक कार्यालयात येणा-या आवक-जावक टपालाच्या नोंदी संगणकीय प्रणालीमार्फत केल्या जातील जेणेकरुन महापालिकेअंतर्गत सर्व कागदपत्रांची सद्यस्थिती प्रशासनाला ऑनलाईन पाहता येईल.

५. **सीपीडब्ल्युएम प्रणालीत एसएमएसचा वापर** – नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेण्याकरिता प्राप्त झालेली तक्रार संबंधित अधिका-यास एसएमएसद्वारे तात्काळ पाठविण्यात येईल तसेच तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देखील एसएमएसद्वारे तक्रारदाराला कळविला जाईल. सदर प्रणाली विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून आगामी वर्षात ते पूर्णत्वास जाईल.

६. महापालिकेची सर्व खाती, रुग्णालये, विविध खात्यांची कार्यालये यामध्ये बायोमेट्रीक्स एक्सेस कंट्रोल सिस्टिमची उभारणी व कार्यान्वयन करण्याचे काम येत्या वर्षात पूर्ण करण्याचे नियोजिले आहे.

१८. **मालमत्ता कर**

मालमत्ता कर व जकात हे महापालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहेत.

(₹ कोटीमध्ये)

| कराचे नाव | फेब्रुवारी २०१२ पर्यंतचे संकलन | मार्च २०१२ पर्यंत वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|
| मालमत्ता कर | २६७९.९७ | १६५७.०९ |
| जकात | ५४७८.४७ | ६२१.५३ |

३७५० कर्मचारीवर्गाची महापालिका निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती झाल्याने जानेवारी आणि फेब्रुवारी २०१२ मध्ये मालमत्ता कराच्या संकलनावर अंशत: परिणाम झाला. तथापि, मार्च २०१२ पर्यंत अंदाजित वसुलीचे (Projected recoveries) उद्दिष्ट गाठले जाईल.

## १८.१ करनिर्धारण व संकलन खात्याचे संगणकीकरण

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागीय कार्यालयात मालमत्ता कराचे संकलन प्रॉपर्टी टॅक्स इनफॉरमेशन सिस्टिम (PTIS) या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येते. संगणकीकरणासाठी आवश्यक असणा-या सर्व मूलभुत सुविधा सर्व विभागीय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. मालमत्ता कराच्या बाबतीत नवीन भांडवली मूल्याधारीत करप्रणाली अवलंबिण्यासाठी उपलब्ध डेटा मायग्रेट करण्यासाठी नवीन सॉफ्टवेअर पूर्णत: विकसित करण्यात आले आहे. त्यानुसार २.८०लाख मालमत्तांची माहिती नवीन संगणकीय प्रणालीत अद्ययावत करण्यात आलेली आहे. भांडवली मूल्याधारीत करप्रणालीत मालमत्तांचे करनिर्धारण व करसंकलन हे पूर्णत: संगणकीय प्रणालीद्वारे होणार आहे. परिणामत: करदात्यांना मालमत्तेची तसेच कराची अद्ययावत माहीती ऑनलाईन उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

## १८.२ आगामी आर्थिक वर्षात हाती घ्यावयाचे प्रकल्प

### १)शीघ्र अधिदान करणा-या करदात्यांस प्रोत्साहनपर योजना

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १९७ च्या तरतुदीनुसार मालमत्ता कर हा प्रत्येक वर्षात १ एप्रिल व १ ऑक्टोबर रोजी सहामाही हप्त्यांनी आगाऊ देणे आवश्यक आहे. देयक जारी केल्यापासून ३ महिन्यांच्या आत मालमत्ता कराचा भरणा न केल्यास न भरलेल्या रकमेवर देय दिनांकानंतर दर महिना २ टक्के या दराने दंड आकारला जातो. तथापि, करदात्यांना आगाऊ कर भरण्यासाठी प्रवृत्त व प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने आणि जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय

नागरी पुनर्निमाण अभियानाअंतर्गत करावयाच्या सुधारणांचा एक भाग म्हणून आगाऊ अधिदान करणाऱ्या करदात्यांना करामध्ये सवलत देण्याचे प्रस्ताविले आहे.

२) **<u>लघुवाद न्यायालयामध्ये अतिरिक्त कोर्ट रुमची स्थापना</u>**

मालमत्ता कराच्या लघुवाद न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या प्रकरणाचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी शासनाने लघुवाद न्यायालयात ३० नंबरचे अतिरिक्त न्यायालय स्थापन केले आहे. विविध न्यायालयात एकूण २३८६ प्रकरणे प्रलंबित आहेत.

३) **<u>भांडवलीमुल्य तत्वावर आधारित मालमत्ता कराच्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी</u>**

दि.०१.०४.२०१० पासून मुंबई महानगरपालिकेने भांडवली मूल्याधारित मालमत्ता कर प्रणाली अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. भांडवली मूल्याधारित करनिर्धारणाच्या पध्दतीसाठी आवश्यक असणाऱ्या माहितीच्या एकत्रीकरणाचे कार्य प्रगतीपथावर आहे. कामकाजाच्या प्रथम टप्प्यात सुमारे २.३० लाख मालमत्तांच्या माहितीची नोंद नवीन सीव्ही संगणकीय प्रणालीत घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत अंदाजे ५० हजार मालमत्तांची माहिती व्यक्तिश: भेट देऊन व आवश्यक असेल तेथे मालमत्तांचे मोजमाप करुन गोळा करण्यात आलेली आहे. सदर माहिती आवश्यकतेनुसार मूळ माहिती बरोबर एकत्र करण्यात आलेली आहे. सदर माहितीची सत्यता पडताळण्याकरिता अधिकारी व कर्मचारी वर्गाने अथक व अविरत परिश्रमाने वारंवार तपासणी फेऱ्या (व्हेरिफिकेशन राऊण्डस) केल्या आहेत. नवीन संगणकीय प्रणालीत नोंद न झालेल्या उर्वरित ५० हजार मालमत्ता या झोपडपट्टीतील आहेत. त्यातील अनेक मालमत्तांच्या स्वतंत्ररित्या कागदोपत्री नोंदी उपलब्ध नाहीत. या संदर्भात महापालिकेने शासनाच्या गृहनिर्माण

विभागास पत्र पाठविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून याबाबत अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर करनिर्धारित केलेल्या तसेच करनिर्धारित न केलेल्या झोपडपट्टयांमधील मोठया प्रमाणावरील मालमत्तांच्या कर आकारणीच्या बाबतीत धोरण ठरविण्यात येईल.

'भांडवली मुल्याधारीत करप्रणालीचे नियम व मालमत्तेच्या करआकारणीचे दर' याला स्थायी समिती व महानगरपालिका यांची मंजूरी मिळाल्यानंतर प्रशासन भांडवली मुल्याधारीत मालमत्ता कराच्या विशेष सूचना व अंतिम देयके निर्गमित करु शकेल. प्रशासनाने भांडवली मुल्याधारीत करप्रणालीचे नियम व मालमत्तेच्या करआकारणीच्या दराचा प्रस्ताव स्थायी समितीकडे मान्यतेसाठी यापूर्वीच सादर केलेला आहे'.

महानगरपालिकेचा महसूल खंडीत होऊ नये म्हणून सन २००९-१० मध्ये जो मालमत्ता कर आकारण्यात आला त्याच्या आधारे सन २०१०-११ व सन २०११-१२ या वर्षामध्ये मालमत्ता कराची तात्पुरती देयके वितरित करण्यात आलेली आहेत. तथापि, स्थायी समितीने अद्याप भांडवली मूल्याधारीत मालमत्ता कराबद्दल नियम व करआकारणीचे दर याना मंजूरी दिली नसल्यामुळे भांडवली मुल्य निश्चित करणे व देयके तयार करण्याचे काम पुढील वर्षीसुध्दा चालू राहण्याची शक्यता आहे. सन २०१२-१३ मध्ये अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महानगरपलिका अधिनियमातील संबंधित कलमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

करनिर्धारण व संकलन खात्याच्या बहुतांश विभाग कार्यालयात जुने फर्निचर व कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची सुव्यवस्थित व्यवस्था नसल्याने बऱ्याच गैरसोयी होत होत्या. करनिर्धारण व संकलन कार्यालयाच्या आधुनिकीकरणासाठी नुतनीकरण आराखडा संमत झालेला आहे. मुंबईच्या नागरिकांना अधिक चांगल्या प्रकारची सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी या कार्यालयांचे योग्य फर्निचर व फिक्सचर्स व बसण्याच्या व्यवस्थेसह नूतनीकरण करण्यात येईल.

**४)भौगोलिक माहितीप्रणालीची (जीआयएस सिस्टीम) अंमलबजावणी**

उपयुक्त नकाशा प्रकल्प (युटीलिटी मॅपिंग प्रोजेक्ट) अंतर्गत नॅशनल इन्फॉरमेटिकस् सेंटर, दिल्ली यांनी उपलब्ध करुन दिलेल्या भौगोलिक माहितीप्रणालीच्या नकाशा (जीआयएस बेस मॅप) अन्वये बृहन्मुंबई महानगरपलिका विविध खात्यांच्या माहितीच्या एकीकरणाची अंमलबजावणी करत आहे. भौगोलिक माहितीप्रणालीच्या एकीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे. एन.आय.आय.टी. जी.आय.एस. लि. यांची नेमणूक केलेली आहे. मे. एन.आय.आय.टी. जी.आय.एस. लि. हे विविध खात्यांना भौगोलिक माहितीप्रणालीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारी संगणकीय प्रणाली विविध एम.आय.एस. रिपोर्टसह विकसित करणार आहेत. ज्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत वाढ होईल. आय.आय.टी., पवई ही संस्था मुंबई प्रशासनास संगणक प्रणालीच्या विकासातील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन करीत आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील १००% मालमत्तांचे करनिर्धारण करणे शक्य होईल. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत करावयाची ही एक बंधनकारक सुधारणा आहे.

**५)स्वमुल्यांकन करप्रणालीची अंमलबजावणी**

पुढच्या टप्प्यात स्वमूल्यांकन करप्रणालीची सुरुवात करण्याचे नियोजले आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये करावयाच्या आवश्यक त्या सुधारणांचा मसुदा तयार करण्यात आला असून त्यास प्रशासकीय मंजुरी प्राप्त करण्यात येत आहे. स्वमूल्यांकन करप्रणाली अंतर्गत नागरिक बृहन्मुंबई महानगरपलिकेने प्रसिध्द केलेल्या मालमत्ता करप्रणाली मूल्यांकनाचे नियम व मार्गदर्शक तत्वांच्या मदतीने स्वत:च्या मालमत्तेचे मूल्यांकन स्वत: करुन कराचे परिगणन करु शकतील. नागरिकांना ही सुविधा महापालिकेच्या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईनदेखील उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६)मालमत्तेच्या भांडवली मूल्य व अधिदानायोग्य मालमत्ता करासह मालमत्तेचा सविस्तर तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे.**

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे झोपडपट्टी मालमत्ता वगळता सुमारे २ लाख ८० हजार मालमत्तांचा सविस्तर तपशील (भांडवली मुल्य व अधिदानायोग्य मालमत्ता करासह) स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावित नियम व करांच्या दरानुसार तयार आहे. उपरोक्त माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. भांडवली मूल्य निश्चितीसाठी मालमत्तेच्या ग्राहय धरण्यात आलेल्या माहितीची नागरिक पडताळणी करु शकतात व त्याबद्दल आक्षेप असल्यास तक्रारसुध्दा दाखल करु शकतात. तसेच भांडवलीमुल्य निश्चितीसाठी व त्यावर आकारल्या जाणाऱ्या मालमत्ता कराच्या परिगणनासाठी सुटसुटीत व कळण्यास सोपा असणारा करगणक (टॅक्स कॅलक्युलेटर)नागरिकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, ज्याच्या सहाय्याने मालमत्तेची करगणनासाठी आवश्यक असणारी माहिती करगणकात नोंद करुन नागरिक मालमत्तेचे भांडवली मूल्य व त्यावर आकारला जाणाऱ्या कराची माहिती करुन घेऊ शकतो.

## १९. जकात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत उपभोग, वापर किंवा विक्रीकरिता आयात होणाऱ्या मालावार अनुसूची 'एच' मध्ये नमूद केलेल्या दराने करनिर्धारण व संकलन खात्यातील जकात विभागामार्फत जकात आकारणी करण्यात येते. पाच प्रमुख जकात नाक्यांसहित अन्य जकात केंद्रांवर जकातीची वसुली केली जाते. दररोज सुमारे दहा हजार वाहने जकातपात्र मालासह बृहन्मुंबईच्या हद्दीत प्रवेश करतात. जकात नाक्यांवरील वाहनांची कोंडी टाळण्याकरिता विविध

उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. जकात भरणा करण्यासाठी लागणारा वेळ कमी व्हावा व वाहनांचा अडथळामुक्त निपटारा व्हावा या दृष्टीने विविध सुधारणादेखील करण्यात आल्या आहेत.

१)जकात नाक्याचे आधुनिकीकरण

जकात नाक्यांचे आधुनिकीकरण करण्याचे योजण्यात आले असून तेथे अद्ययावत उपकरणे/गॅजेटस् बसविण्यात येणार आहेत. याबाबत प्रशासनाने गेल्या वर्षभरात केलेल्या विविध उपाययोजनांना समाधानकारक यश प्राप्त झालेले आहे. पूर्व द्रुतगती महामार्ग जकात नाक्याचा विकास करण्यात आला असून ला.ब.शा.मार्ग व मुंबई पनवेल महामार्ग जकात नाक्यांच्या विकास करण्याकरिता कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. दहिसर जकात नाक्याच्या विकासाचे काम देखील सुरु करण्यात येईल.

२)जकात नाक्यांवर सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून जानेवारी २०१२ पासून २३५ सुरक्षा रक्षक/पर्यवेक्षक यांच्या सेवा उपलब्ध करणे प्रशासनास शक्य झाले आहे. सदर सुरक्षा रक्षक हे लोकसेवक असून त्यांना अपराध्यांना अटक करण्याचे अधिकारपण आहेत. सदर सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीमुळे आपले अधिकारी/कर्मचारी यांना जकात नाक्यांवर अधिक सुरक्षित वाटेल. २३५ सुरक्षा रक्षकांपैकी ५४ सुरक्षारक्षक हे सशस्त्र असतील व त्यांच्या सेवा लवकरच उपलब्ध होतील.

३)जकात नाक्यांवर अद्ययावत साधनसामुग्री बसविणेबाबत :

सर्व मुख्य जकात नाक्यांवर पहारा व देखरेखीकरिता तसेच व्यवहारांसाठी लागणारा वेळ वाचविण्यासाठी वजन काटे, स्कॅनर्स, कॅमेरा व सी.सी.टी.व्ही., वाहन क्रमांक ओळखण्याची पध्दत (एलपीआरएस) अशी अद्ययावत यंत्रे बसविण्याचे प्रस्ताविले आहे.

जकात नाक्यांवर स्कॅनर्स बसविण्याकरिता योग्य तंत्रज्ञानाची निवड करणे आवश्यक आहे. यास्तव, प्रशासनाने ॲटोमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड यांचा सल्ला घेतला असून त्यानुसार ई-निविदा मार्च २०१२ मध्ये मागविण्यात येत आहेत आणि त्यातील विशिष्ट तरतूदीनुसार वाहनांचे स्कॅनिंग मनुष्य विरहित पध्दतीने करण्याची परवानगी देण्यात येईल.

मार्च २०१२ मध्ये जकात नाक्यांवर सी.सी. कॅमेरा सर्व्हेलन्स सिस्टीम्स बसविण्याकरिता ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यामुळे मध्यवर्ती नियंत्रण कक्षातून जकात नाक्यांवर देखरेख करणे सुलभ होईल. तसेच मार्च २०१२ मध्ये जकात नाक्यांवर वाहनाचा नोंदणी क्रमांक ओळखणे (एलपीआरएससह) अशा यंत्रणेसह, वजनकाटे बसविण्याकरिता ई-निविदा मागविण्यात आली असल्यामुळे मालाचे वजन कमी दर्शवून होणाऱ्या जकात चोरीला आळा बसेल.

४)**<u>जकात खात्याचे संगणकीकरण :</u>**

जकात खात्याचे संपूर्णत: संगणकीकरण करण्यात आलेले आहेत हे नमूद करण्यास मला आनंद होत आहे. आय.आय.टी., मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आलेले नवीन जकात सॉफ्टवेअर दि.१.८.२०११ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. या संगणकीय प्रणालीची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत –

अ- जकात नाके व इतर कार्यकेंद्रांवर होणारे अधिदानाचे व्यवहार रियल टाईम डेटा ट्रान्सफरद्वारे वरळी डेटा सेंटर येथील मुख्य सर्व्हरवर अपलोड केले जातात.

ब - जकात नाक्यांवरील प्रत्येक ठिकाणी संगणकीय लॅन जोडणी उपलब्ध.

क - आयातदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे स्कॅनींग करण्याची व्यवस्था.

ड - ई-पेमेंटद्वारा आयातदारांना जकातीचा भरणा ऑनलाईन करण्याकरिता ई-पोर्टल विकसित करण्यात आले आहे. आयातदार मालाचे स्वयंमूल्यांकन करुन

महानगरपालिकेच्या खात्यात परस्पर जकातीचा भरणा करु शकतात. सदर ई-पेमेंट सुविधेमुळे जकातीचा भरणा करण्याकरिता कुठल्याही मध्यस्थाची गरज नसल्याने आयातदाराचे मध्यस्थानी नुकसान करण्याचे अथवा महानगरपालिकेचा महसूल बुडण्याची शक्यता संपुष्टात येईल.

ई - आयातदार महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणा करण्यात आलेली जकातीची रक्कम ई-पोर्टल मार्फत स्वत: तपासू शकतात. यामुळे आयातदारांना जकातीच्या अधिदानाच्या खरेपणाची खात्री करणे शक्य होईल.

फ - नवीन संगणकीय प्रणालीमध्ये जकात चुकवेगीरी रोखण्याकरिता तपासणी आणि सुरक्षा व्यवस्था सेक्युरीटी फीचर्स यांचा अंतर्भाव असून त्यातील माहिती, अधिकाराशिवाय आणि वैद्य परिक्षणाशिवाय बदलता येणे शक्य नाही. दैनंदिन माहिती सीडी रोममध्ये फक्त वाचण्यायोग्य नमुन्यात बॅकअपसाठी हस्तांतरीत करण्यात येईल. प्रपत्र 'ब' सह पावती महानगरपालिकेच्या मुद्रणालयात छापण्यात आल्या असून त्यामध्ये विविध सेक्युरीटी फीचर्स अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

घ - दक्षता अधिकारी यांना आगमन व निर्गमनद्वाराच्या ठिकाणी 'स्मार्ट हॅन्डल्ड डिवाईसेस पुरविण्यात आले आहेत. यामुळे वाहनांचा मागोवा घेणे व डेटा एन्ट्री मधील चुका कमी होण्यास मदत होईल.

ह - पावती आणि जकातीची माहिती याच्या खरेपणाची खात्री करण्यासाठी आणि डेटा सर्व्हरमधून एस एम एस द्वारे माहिती पुरविण्याकरिता 'इंटरऍक्टीव्ह व्हॉईस रिसपॉन्स सर्व्हिसेससाठी (आयव्हीआरएस) निविदा मागविण्यात आल्या आहेत.

**५)जकातीचा परतावा**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १९५(१) अन्वये महापालिकेच्या हद्दीबाहेर निर्यात होणाऱ्या जकातपात्र वस्तुंवर जकातीचा परतावा देण्यात येतो. सध्याच्या प्रणालीमधील काही त्रुटींमुळे जकातीचा परतावा देण्यास विलंब होत आहे. जकात परताव्याकरिता नवीन संगणकीय प्रणाली पूर्णपणे विकसित करण्यात आली आहे आणि या महिन्यापासून नवीन प्रणालीमध्ये डेटा एन्ट्रीचे काम सुरु करण्यात आले आहे. जकात परतावा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जकातीचा भरणा आणि स्कॅन करण्यात आलेली कागदपत्रे त्वरील उपलब्ध होणार असल्यामुळे जकातीचा परतावा त्वरेने मे, २०१२ पासून करणे शक्य होईल.

**६)हिऱ्यांवरील जकात**

हिऱ्यांवरील जकातीचा दर २% वरुन ०.०१% इतका कमी केल्याने अतिशय चांगले परिणाम दिसून येत आहेत. त्यामुळे हिऱ्यांवरील जकातीचे उत्पन्न गतवर्षीच्या ₹२.२५ कोटी वरुन फक्त ११ महिन्यात ₹१० कोटी पर्यंत वाढले आहे. यास्तव, हिऱ्यांच्या आयातीवर जकातीच्या दरातील कपात पुढे सुरु राहिल. यावर्षी, मी ₹६१०० कोटी इतके जकात संकलन प्रस्ताविले असून आगामी आर्थिक वर्षात ₹७०००कोटी इतके संकलन प्रस्ताविले आहे.

२०. **जेंडर बजेट**

महापालिका अर्थसंकल्पात महिला सक्षमिकरणाला नेहमीच प्राधान्य दिले जाते. महिलांचे आरोग्य सुधारावे यासाठी महापालिकेच्या प्रसुतीगृहे / दवाखाने रुग्णालये यामध्ये विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध केल्या जातात. आरोग्य अर्थसंकल्पातील जवळपास ५०% म्हणजे

₹१२०० कोटी इतकी रक्कम महिलांच्या आरोग्य सेवांवर खर्च केली जाते. याशिवाय महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील विद्यार्थिनींची उपस्थिती वाढावी यासाठी त्यांना प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते. शिक्षणाचे महत्व ओळखून विद्यार्थिनींना पाठयपुस्तके, गणवेश, दप्तरे, शैक्षणिक साहित्य मोफत पुरविणे तसेच सुंगधी दूध पुरविणे यांसारख्या सुविधा दिल्या जातात. महापालिका शाळांमधील मुलींची टक्केवारी ५१% इतकी आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण अर्थसंकल्पाचे आकारमान ₹२४६८ कोटी इतके असून यापैकी ५१% म्हणजेच ₹१२५८ कोटी इतकी रक्कम मुलींच्या शिक्षणावर खर्च केली जाते.

याव्यतिरिक्त, महिलांच्या सक्षमीकरणासाठी खाली दर्शविलेल्या विविध योजनांकरिता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत ₹१५.६९ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

१. पात्र महिलांसाठी स्वयंरोजगार
२. स्वसंरक्षण / कौशल्य दर्जोन्नतीसाठी प्रशिक्षण
३. क्षमता वाढीसाठी कार्यशाळा / प्रशिक्षण
४. अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार आणि वैद्यकीय सहाय्याकरिता मदत
५. आधार प्रकल्पांतर्गत विविध उपक्रम
६. राजकीय प्रतिनिधी आणि युपीईसीचे (Urban Poverty Eradication Cell) अधिकारी यांच्यासाठी अभ्यासदौरा
७. बचत गटांसाठी (एसएचजी) रिवॉलव्हींग फंड

२१. **शहरी गरीब जनतेला पुरवावयाच्या सेवांमध्ये वाढ**

शहरातील गरीब जनतेला विविध प्रकारच्या नागरी सेवा पुरविण्याच्या आणि या सेवांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये विविध सेवाशिर्षाखाली एकूण ₹६५५३.९१ कोटींची तरतूद पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

(₹ कोटीत)

| | |
|---|---|
| गावठाणे, कोळीवाडे आणि आदिवासी पाडे | २५.३६ |
| आधार केंद्रे | ५.०१ |
| गलिच्छ वस्त्यांची दर्जोन्नती | ३६४.०६ |
| गरीब वर्गासाठीच्या चाळींची सुधारणा, व्यवस्थापन व परिरक्षण | ३४९.७८ |
| प्राथमिक शिक्षण (अर्थसंकल्प 'ई') | २३४२.६३ |
| माध्यमिक शिक्षण | २२५.४५ |
| आरोग्य | २०७९.२० |
| सवलतीच्या दराने पाणी | १०५०.७२ |
| इतर | १११.७० |
| **एकूण** | ६५५३.९१ |

२२. **विकलांग व्यक्तींसाठी स्वतंत्र व्यवस्था**

अपंग व्यक्तींना शासकीय इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी अडथळामुक्त वावर करता यावा म्हणून सुविधा उपलब्ध करुन देणे ही शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. या अनुषंगाने अपंग व्यक्तींना अडथळामुक्त वावर करता यावा यासाठी महानगरपालिका कार्यालये, रुग्णालये, मनोरंजन केंद्रे, बाजार, शाळा अशा सर्व ठिकाणी हँडरेलसह रॅम्प (Ramp)

आणि लो-लेव्हल शौचालये इत्यादी सुविधा पुरविण्याकरिता सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये ₹१० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

२३. **<u>प्रशासकीय सुधारणा</u>**

१) **<u>लेखांकन पध्दतीत सुधारणा</u>**

अर्थसंकल्पीय तसेच लेखांकन पध्दतीत सुधारणा करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून महापालिका प्रशासनाने सर्व स्थावर व जंगम मालमत्तांची सूची, पडताळणी आणि मुल्यांकन करण्याचे काम हाती घेतले आहे. या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या ४ सल्लागारांच्या सहाय्याने आणि खाते प्रमुखांच्या सहकार्याने हे काम पार पाडण्यात येत आहे.

विविध खात्यांच्या अखत्यारित असलेल्या महापालिकेच्या मालमत्ता जसे की जमीन, इमारती, यंत्रे व संयंत्रे, वाहने इत्यादींचा समावेश असलेल्या मालमत्तांची सूची व वर्गवारी पूर्ण करण्यात येत आहे. के.ई.एम. रुग्णालय व दिवालीबेन मेहता (माँ) रुग्णालय, चेंबूर या रुग्णालयांशी संबंधित जमीन व इमारतींच्या बाबतीतील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. अन्य खात्यांच्या स्थावर मालमत्तांच्या बाबतीत सदर प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर नॅशनल म्युनिसिपल अकांऊट्स मॅन्युअलमध्ये विहित केलेल्या नमुन्यात असेट रजिस्टर्स प्राप्त करणे शक्य होईल आणि त्यामुळे महापालिकेच्या मालमत्तांच्या वापरावर लक्ष ठेवणे/माग काढणे सुलभ होईल. त्यामुळे मालमत्ता व्यवस्थापन कार्यात अधिक पारदर्शकता येईल.

सदर प्रकल्प राबवित असताना असे लक्षात आले की, बहुतांश जागा जरी महापालिकेच्या ताब्यात असल्या तरी त्यांचे टायटलस क्लिअर नाहीत. त्यामुळे प्रशासनाने महापालिकेच्या मालकीच्या सर्व मालमत्तांची प्रॉपर्टी कार्डस् प्राप्त करण्याचे काम हाती घेतले आहे. हे काम पूर्ण

झाल्यावर महापालिकेच्या मालकीच्या मालमत्तांची अचूक स्थिती महापालिकेला कळू शकेल. महापालिकेची पतयोग्यता ठरविण्याच्या कामी या माहितीचा महत्त्वपूर्ण उपयोग होईल.

२) वेंडर रजिस्ट्रेशन

सॅप सिस्टिमची अंमलबजावणी झाल्यापासून महापालिकेच्या सर्व खात्यांना, कामाचे / खरेदीचे कार्यादेश प्रोजेक्ट सिस्टिम मोडयूल, मटेरिअल मॅनेजमेंट मोडयूलमधूनच देण्याचे बंधनकारक केले आहे. सिस्टिमच्या सोयीसाठी प्रत्येक सेवा पुरवठाकार, पुरवठादार, कंत्राटदार इत्यादींनी वेंडर म्हणून नोंदणी करणे गरजेचे आहे. मागील ४ वर्षाच्या अनुभवावरुन महापालिका प्रशासनाने 'केवायसी' मार्गदर्शक तत्वावर आधारित वेंडर मास्टर अपडेट करण्याचे काम हाती घेतले आहे. ज्या वेंडर ने 'केवायसी' नॉर्मस्‌ची पूर्तता केली नसेल त्यांच्या बाबतीत पुढील अधिदान 'केवायसी' नॉर्मस्‌ची पूर्तता केल्यानंतरच करण्यात येईल. त्यामुळे वेंडरने रजिस्ट्रेशनकरिता सादर केलेली माहिती अद्ययावत होईल व अपुरी व खोटी माहिती दिलेल्या वेंडरचे रजिस्ट्रेशन रद्द होईल.

नोंदणीकृत वेंडर्सना कार्यादेश दिल्याबाबतची तसेच अधिदान अदा केल्याबाबतची माहिती ई-मेल द्वारा पाठविण्याची कार्यपध्दती सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वी ही माहिती कळविण्यासाठी येणाऱ्या टपाल खर्चामध्ये मोठी बचत झाली आहे. अशा प्रकारच्या सुधारणात्मक उपाययोजनांमुळे पारदर्शकता वाढून सॅप प्रणालीबद्दल सर्वसंबंधितांच्या मनात विश्वास निर्माण होण्यासही मदत झाली आहे.

महापालिका प्रशासनाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीकोनातून कंत्राटदार/पुरवठादार यांना देण्यात येणारे कार्यादेश/खरेदी आदेश, काम पूर्ण करण्यासाठीचा कालावधी, रक्कम व कामाचे स्थळ इ. तसेच अधिदानाचे तपशील इत्यादी संपूर्ण माहिती महापालिकेच्या पोर्टलवर उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना या

स्वरुपाची माहिती विनासायास व सहजगत्या उपलब्ध होऊ शकेल आणि त्यामुळे तक्रारींचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**3) <u>NEFT/RTGS द्वारे अधिदान</u>**

महापालिका प्रशासनाने वेंडर्सच्या अधिदानाचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी इसीएस ऐवजी NEFT/RTGS द्वारे अधिदान करण्याची अद्ययावत पध्दत स्वीकारली आहे. त्यामुळे धनादेश तयार करण्याचे काम कमी झाले आहे. आयएफएससी कोड च्या उपलब्धतेसापेक्ष NEFT/RTGS द्वारे देशातील कुठल्याही ठिकाणी, कोणत्याही बँकेत वेंडर्सना अधिदानाची रक्कम मिळू शकते. यासाठी महापालिका तसेच वेंडर्सना कुठल्याही प्रकारचा खर्च सोसावा लागणार नाही.

त्याचप्रमाणे, कोअर बँकिंग सिस्टिम अंतर्गत भारतीय स्टेट बँकेच्या कुठल्याही शाखेत खाते असलेल्या वेंडर्सना सी.बी.एस. मोड अंतर्गत अत्यंत अल्प अवधीत अधिदान मिळू शकते. यासाठीही महापालिकेला अथवा वेडंर्सना कोणताही खर्च करावा लागणार नाही.

**४)<u>मटेरिअल मॅनेजमेंट मोडयूल</u>**

मटेरिअल मॅनेजमेंट क्लीन्सींगसाठी एका स्पेशल टास्क फोर्सची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानी सध्या वापरात असलेल्या मटेरिअल कोड्समधून डुप्लिकेट मटेरिअल कोड्स शोधून ते काढून टाकण्यात आले आहेत. प्रत्येक मटेरिअलचे त्याच्या योग्य मटेरिअल ग्रुप व सब-ग्रुपमध्ये वर्गीकरण करुन मटेरिअल कोड्ससाठी योग्य लॉजिक दिले आहे. विविध प्रकारच्या मटेरिअलचे १७ गटांमध्ये वर्गीकरण करण्यात येऊन त्यांना नविन वॅल्युएशन क्लास कोड देण्यात आले आहेत. त्यामुळे सॅप प्रणालीतील मटेरिअल मॅनेजमेंट मोडयूलद्वारे मालाची/साधन सामग्रीची खरेदी करण्यात उदभवणाऱ्या अडचणींचे निराकरण होण्यास मदत झाली आहे. मटेरिअल मॅनेजमेंट टीमची पुनर्रचना करण्यात आली असून यूझर डिपार्टमेंटसच्या मटेरिअल मॅनेजमेंट मोडयूलशी संबंधित समस्या/बाबी

सोडविण्यासाठी नियमित व कायम स्वरुपी कोअर टीम स्थापन करण्यात आली आहे. सुधारित मटेरिअल मॅनेजमेंट मोडयूल दि.०१.०४.२०१२ पासून प्रभाव्य करण्यात येईल.

५) फेअर मार्केट शेडयुल

सध्या विविध प्रकारच्या कामांसाठी विविध खात्यांनी तयार केलेल्या वेगवेगळया रास्त बाजारभाव अनुसूच्या (फेअर मार्केट शेड्युल्स) वापरात आहेत, जसे रस्त्यांसाठी एफएमआर, इमारत बांधकामासाठी एफएमबी, पर्जन्य जलवाहिन्यांसाठी एफएमएसडब्ल्युडी इत्यादी. नवीन तंत्रज्ञान/कार्यप्रणालीमुळे काही नवीन बाबी उपयोगात आणाव्या लागतात व त्यासाठी ''फेअर मार्केट रेटस्'' तयार करावे लागतात. फेअर बाबी/दर परिगणन करण्याचे टाळण्याच्या दृष्टीकोनातून अशा बाबींचा समावेश अनूसूचींमध्ये करणे गरजेचे ठरते.

प्रशासनाने आता स्थापत्य तसेच यांत्रिकी इ. कामे पार पाडताना वापरावयाच्या सर्व संबंधित बाबी समाविष्ट असलेली एक सामाईक अनुसूची तयार करण्याचे ठरविले आहे. सॉफ्टवेअरवर आधारित सामाईक अनुसूची बनविण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्यामध्ये प्रत्येक बाबीच्या रास्त बाजार भाव दरांमध्ये, त्या बाबीसाठी लागणाऱ्या मटेरियलच्या किंमतीतील वाढीशी सुसंगत असेल, अशा रीतीने वेळोवेळी लगेच सुधारणा करणे शक्य होईल. रास्त बाजार भाव अनुसूची प्रचलित दरांवर आधारित असल्यामुळे निविदा दरांमध्ये जास्त तफावत असणार नाही अशी धारणा आहे. तसेच काम चालू असताना मोठया प्रमाणावर एक्स्ट्रा फेअर आयटम बनाविण्याच्या/तयार करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसू शकेल.

**आता मी अर्थसंकल्प 'ग' सादर करीत आहे.**

२४. <u>प्रस्तावना</u> : नागरिकांना उत्तम प्रतीचे व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविणे, शास्त्रोक्त पध्दतीने मलजलाची विल्हेवाट लावणे हे महानगरपालिकेच्या बंधनकारक कर्तव्य आहे. पाणी कमी येणे, दूषित पाणी मिळणे आणि पाण्याचा असमान पुरवठ्याच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. तथापि, शहरात यावर्षी अतिरिक्त ८० द.ल.लि. एवढे पाणी आणल्याने अपुरा पाणीपुरवठा होणाऱ्या विभागातील नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे. मलबार हिल-क्रॉस मैदान व वेरावली-यारी रोड येथील दोन बोगदे कार्यान्वित झाले आहेत. या बरोबरच कन्नमवार नगर ते अमर महल, चेंबूर येथील ३००० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंशत: कार्यान्वित झाल्याने, चेंबूर, एफ/दक्षिण, एफ/उत्तर, डी आणि ई विभागातील पाणी पुरवठयात सुधारणा झाली आहे. पाण्याच्या नमुन्यांच्या चाचणीची संख्या वाढविल्यामुळे पाण्याच्या दूषितीकरणाचे विभाग लवकर समजण्यास मदत झाली असून गळती कुठे होत आहे हे शोधता आल्याने वेळेवर दुरुस्त्या करता आल्या. तसेच भरलेल्या मलनि:सारण वाहिन्यांचा निचरा झाल्याने पाण्याच्या दूषितीकरणाचे प्रमाण कमी करता आले. टी विभाग, मुलुंड येथे गुरु गोविंदसिंग मार्गावरील उंच भाग वगळता संपूर्ण मुलुंड परिसरात २४ तास पाणी पुरवठा पध्दती सुरु केली आहे.

या उपाययोजनांमुळे पाणी पुरवठ्यासंबंधी तक्रारी कमी झाल्या असल्या तरी, पाणी पुरवठ्याच्या योजनांचे नियोजन, त्या कार्यान्वित करुन मागणी व पुरवठा यातील दरी भरुन काढणे हे एक आव्हान आहे. पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी पाणी पुरवठ्याच्या पायाभूत सुविधांचा दर्जा व पुरवठा वाढवून शहराच्या आरोग्याचा दर्जा हा जागतिक मानकाच्या स्तराबरोबर आणणे आवश्यक आहे. विकासाच्या गती बरोबर पाण्याच्या स्त्रोतांमध्ये वेळोवेळी वाढ करणे व नळाने अखंडित पाणीपुरवठा करणे हया कळीच्या मुद्यांवर नागरी प्रशासनाला उपाययोजना करणे आवश्यक आहे.

आतापर्यंत, पुढील १० वर्षांची पाण्याची गरज भागविण्यासाठी पाणीपुरवठा वाढविण्याचे नियोजन करुन तशा योजना कार्यरत केल्या होत्या. तथापि, योजना कार्यान्वित करेपर्यंत त्या दरम्यान पाण्याच्या मागणीत वाढ होते, ज्याचा परिणाम पुन्हा पाण्याच्या तुटवडयामध्ये होतो. मागणी इतका पाणीपुरवठा वाढविण्यासाठी मी आता नवीन स्त्रोत विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. पाणीपुरवठा वाढविण्याचे हे नियोजन फार दूरदृष्टीचे व मुंबईच्या पाणीपुरवठयाच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारे आहे. यामुळे महापालिकेला सध्याच्या खंडित पाणीपुरवठा योजनेऐवजी अखंडित पाणी पुरविता येईल. तसेच दूषितीकरण, असमान पाणीवाटप, पाण्याच्या गैरसोयीच्या वेळा आणि आरोग्यविषयक बाबीदेखील परिणामकारकरित्या सोडविता येतील.

दमणगंगा-पिंजाळ पाणी पुरवठा प्रकल्पापासून मिळणारा पाणी पुरवठा सन २०३१ पर्यंतच्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यास पुरेसा होईल.

मलजल गोळा करण्याच्या क्षमतेतही वाढ होण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात येत आहेत. तसेच समुद्रामध्ये किंवा खाडीमध्ये मलजल सोडण्यापूर्वी एसडब्लू-२ स्टँडर्डप्रमाणे त्यावर प्रक्रिया केल्यामुळे समुद्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या दर्जात सुधारणा झाली असून, प्रदुषणाची पातळी कमी करण्यासाठी पावले उचलली आहेत. यासाठी मुंबई मलनि:सारण प्रकल्पांतर्गत सात सांडपाणी प्रक्रिया सुविधा केंद्रे टप्प्या-टप्प्याने उभारावयाची असून तीन सांडपाणी प्रक्रिया सुविधा केंद्रे उभारण्याची कामे ऐरणीवर आहेत.

या आर्थिक वर्षात मी पाणी व मलनि:सारण या क्षेत्रांत पुढील २० वर्षातील सुधारणाच्या नियोजनाची संधी घेत आहे.

पाण्याचा उत्पादन खर्च व मलनि:सारणाच्या विल्हेवाटीसाठी करावयाच्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे. पाणी पुरवठा, त्याचे वितरण, मलनि:सारण जाळयांचे बळकटीकरण इत्यादीसाठी सन २०२५-२६ पर्यंत ₹४२,५८० कोटी इतका भांडवली खर्च येईल.

असे मोठे भांडवली प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण होण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानांतर्गतच्या अनुदानाशिवाय, स्थानिक अथवा आंतरराष्ट्रीय कर्जाचा अवलंब करावा लागेल. यासाठी धनको (Lenders), निश्चितपणे महापालिकेचे आर्थिक स्थैर्य पाहणारच. त्यामुळे मी माझ्या मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय निवेदनात म्हटल्याप्रमाणे, भविष्यात आवश्यक असणाऱ्या निधीचा आढावा घेतल्यावर पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवेच्या दरामध्ये तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे, या निष्कर्षाप्रत आलो आहे. पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांच्या दर आकारणीमध्ये सन २००८ मध्ये निवासी सदनिकाला टेलिस्कोपिक दर लावण्याव्यतिरिक्त सन २००२ पासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

२५. **पाणी पुरवठा**

सन २०११ च्या जनगणनेनुसार मुंबईची सध्याची लोकसंख्या १.२५ कोटी इतकी आहे व पाण्याची मागणी प्रतिदिनी ४२०० द.ल.लि. एवढी आहे. सध्याचा पाणी पुरवठा प्रतिदिनी ३४३० द.ल.लि. आहे. सन २०३१ पर्यंत लोकसंख्या १.५६ कोटी एवढी होईल. झोपडपट्टी पुनर्वसन योजना, शहरात होत असलेली विविध विकासात्मक कामे, जुन्या घरांचा पुनर्विकास आणि कापड गिरण्या बंद झाल्यामुळे होत असलेल्या जमिनींचा विकास तसेच या सर्व विकासासाठी चटई क्षेत्रफळात दिलेल्या सवलतींमुळे पाण्याच्या मागणीत जलद गतीने वाढ होणार आहे. २४ तास पाणी पुरवठा पध्दती, विकसित भागातील व झोपडपट्ट्यामधील पाण्याचा वाढता वापर यामुळे सन २०३१ पर्यंत पाण्याची मागणी प्रतिदिनी ६००० द.ल.लि. एवढी झालेली असेल. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानांतर्गत मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प जुलै २०१२ मध्ये कार्यान्वित होईल व या स्त्रोताद्वारे मुंबई शहरास प्रतिदिनी ४५५ द.ल.लि. एवढा अतिरिक्त पाणी पुरवठा उपलब्ध होईल. पाणी पुरवठयात आणखी वाढ करण्याच्या दृष्टीने ₹११४७० कोटीच्या अंदाजित खर्चाचा दमणगंगा-पिंजाळ हा प्रतिदिनी २४५१द.ल.लि.चा नवीन

स्त्रोत आहे. पिंजाळ प्रकल्प मुंबई महानगरपालिका करणार असून दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प हा केंद्र शासनाने हाती घेतला आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करावा म्हणून महापालिकेने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांमार्फत मा.पंतप्रधानांना विनंती केली आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठीचा कालावधी ७ वर्षे एवढा आहे.

दमणगंगा-पिंजाळ (२४५१ द.ल.लि. प्रतिदिनी पाणी मिळण्यासाठी ₹ ४.४५ कोटी प्रति द.ल.लि.) हा प्रकल्प आर्थिकदृष्टया फायदेशीर असल्याने गारगाई स्त्रोताचा विकास (४५५ द.ल.लि. पाणी प्रतिदिनी मिळण्यासाठी ₹ ६.४० कोटी प्रति द.ल.लि.) करणे आवश्यक नाही परंतु दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प प्रत्यक्षात न आल्यास गारगाई प्रकल्प हाती घेण्यात येईल.

मुंबईच्या पाणी पुरवठा व्यवस्थेअंतर्गत ६ हेड वर्कस असून त्यापैकी ४ मुंबई महानगरपालिका परिरक्षित करते. यात सुमारे ४०० कि.मी. पाणी पुरवठयाचे जाळे, ४ जलप्रक्रिया सुविधा केंद्रे, २ महासंतुलित जलाशय, २६ सेवा जलाशये, ५ मुख्य उदंचन केंद्रे आणि सुमारे ४००० कि.मी. वितरण व्यवस्थेचे जाळे यांचा समावेश आहे. बरीचशी पाणी पुरवठा करणारी केंद्रे ही ५० वर्षांपासून जुनी आहेत. टप्प्याटप्प्याने त्यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना केली जाईल.

पाण्याच्या वहनाच्या योजनेमध्ये पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठी जल बोगदे बांधण्यात आले असून, या जलबोगद्यातून बऱ्याच मोठया प्रमाणात पाणी वाहून नेता येते, पाण्याची गळती होत नाही तसेच बोगद्यांची आयुष्यमर्यादा बरीच असून रस्ते वाहतूकीतही अडथळा निर्माण होत नाही. मोठया व्यासांच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्त्यांच्या कडेला पुरेशी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे पाणी पुरवठयामध्ये वाढ होण्यासाठी मुलुंड ते कांदिवली, मलबार हिल जलाशय ते रुपारेल कॉलेज,

किंग्ज सर्कल ते शिवडी, भांडुप ते चारकोप आणि वेरावली जलाशय ते यारी रोड असे एकूण ३६ कि.मी. लांबीचे बोगदे यापूर्वीच कार्यान्वित झाले आहेत.

पाणी वहनाच्या व वितरण व्यवस्थेच्या बळकटीकरणासह नवीन बोगदे व प्रेषण वाहिन्यांचे बळकटीकरण करणेही सुरु आहे.

२५.१ **प्रगतीपथावरील बोगदे (३७.५५ कि.मी.)**

- नवीन स्त्रोतामधून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याच्या वहनासाठी गुंदवली ते भांडूप येथे ५.५ मी. व्यासाचा व १५.१ कि.मी. लांब बोगद्याचे काम हाती घेतले आहे. वेळापत्रकाप्रमाणे त्याचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- एच/पूर्व, जी/उत्तर, जी/दक्षिण विभागातील पाणीपुरवठयात सुधारणा होण्यासाठी व अे, सी, डी विभागांना पाणी पुरवठा करणाऱ्या वरळी व मलबार टेकडी जलाशयासाठी मरोशी ते वाकोला व माहिम ते रुपारेल कॉलेज असे १२.२५ कि.मी. लांबीचे बोगदे बांधण्यात येत आहेत. मरोशी ते वाकोला हा बोगदा डिसेंबर २०१२ पर्यंत कार्यान्वित करण्यात येणार असून उर्वरित बोगदा सप्टेंबर २०१३ पर्यंत कार्यान्वित होईल.
- वेरावली व घाटकोपर जलाशयात येणाऱ्या जलवाहिन्या लिंक रोडच्या खाली गेल्यामुळे त्यांच्या परिरक्षणात अडचणी येतात म्हणून पवई ते वेरावली (२.२ कि.मी.) आणि पवई ते घाटकोपर (४.४ कि.मी.) येथे दोन भूमिगत बोगदे बांधावयाचे आहेत. सदर कामे मे २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहेत.
- संपूर्ण ए विभागातील पाणीपुरवठयात सुधारणा होण्यासाठी मलबार हिल ते क्रॉस मैदान द्वारा स.का. पाटील उद्यान (३.६ कि.मी.) हा बोगदा मार्च २०१२ मध्ये पूर्णपणे कार्यान्वित होईल.

मलबार हिल ते स.का.पाटील उद्यान येथील बोगदा ०८.०२.२०११ रोजी कार्यान्वित करण्यात आला. त्यामुळे काळबादेवी, गिरगाव, ठाकूरद्वार येथील पाणीपुरवठयात वाढ होण्यास मदत झाली आहे.

या चारही बोगद्यांच्या कामाची एकूण किंमत ₹३८९३.४७ कोटी असून सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ९०५ कोटीची तरतूद केली आहे.

२५.२ **बोगद्यांची आवश्यकता व नियोजन (१४.१० कि.मी.)**

- चेंबूर ते ट्रॉम्बे जलाशय (५.१ कि.मी. लांब) - ट्रॉम्बे जलाशयाचे सध्याचे इनलेट फारच जुने असून सध्याची पाण्याची मागणी व भविष्यकालीन पाण्याची मागणी पुरविण्यास अपुरे आहे. यावर्षी याबाबत सुसाध्यता अभ्यास करुन एप्रिल २०१३ मध्ये काम सुरु होणे अपेक्षित आहे. या बोगदयाच्या बांधकामास ३ वर्षे लागतील. याचा अंदाजित खर्च ₹ २६५ कोटी इतका आहे.

- चेंबूर ते वडाळा व पुढे परेलपर्यंत (९ कि.मी. लांब) - एफ/दक्षिण, एफ/उत्तर, बी व ई विभागांच्या पाणी पुरवठयासाठी सध्या अमर महल, चेंबूर ते किंग्ज सर्कल येथे १८०० मि.मी. व्यासाची एकमेव वितरणवाहिनी आहे. या विभागांमध्ये रावळी जलाशय, गोलंजी हिल जलाशय, फॉसबेरी जलाशय व भंडारवाडा जलाशय अशी जलाशये येतात. सरासरी ६० द.ल.लि. पाण्याची मागणी असणारा वडाळा येथील बराच मोठा भाग एमएमआरडीए विकसित करीत आहे. याशिवाय १८०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिन्यांची दुरुस्ती करावयाची असेल तर शहराच्या पूर्वेकडील भागाचा पाणीपुरवठा बंद ठेवावा लागतो. अतएव पाण्याची वाढती मागणी भागविण्यासाठी व पाणी पुरवठयासाठी पर्यायी सुविधा म्हणून हा बोगदा प्रस्ताविला आहे. या बोगद्याच्या कामाचा अंदाजित खर्च ₹ ४६० कोटी असून यावर्षी

सुसाध्यता अभ्यास पूर्ण होईल. एप्रिल २०१३ मध्ये काम सुरु होणे अपेक्षित असून हे काम पूर्ण होण्यास साधारण ४ वर्षे लागतील.

- पाणीपुरवठयाच्या वहन योजनेच्या घेतलेल्या आढाव्यानुसार, भविष्यकाळात आणखी बोगदे बांधण्याची आवश्यकता नाही.

२५.३ <u>प्रेषणवाहिन्यांची पुनर्स्थापना व पुनर्वसन</u>

- ८० वर्षापेक्षा जुन्या असलेल्या तानसा जलवाहिनीच्या तानसा ते गुंदवली या भागातील जलवाहिन्यांच्या पुनर्स्थापनेचे ₹ १४३२ कोटीचे काम मे २०१३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ३०० कोटीची तरतूद केली आहे.
- मुंबईतील तानसा जलवाहिन्या खूप जुन्या झाल्यामुळे बऱ्याच वेळा विविध ठिकाणी फुटून गळती होऊन पाणीपुरवठयात अडथळा येतो. या जलवाहिन्या मुख्यत: मोठया रस्त्त्यांवर, उड्डाणपुलांच्या खाली किंवा रॅम्पच्या खाली आहेत. या सर्व जलवाहिन्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे, जेणेकरुन गळती होणे व फुटल्यामुळे वारंवार पाणीपुरवठयात अडथळा येणे कमी होईल. संपूर्ण ३२ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांच्या पुनर्स्थापनेचे काम सन २०१२-१३ साली हाती घेण्यात येईल.
- ८ कि.मी. लांबीच्या भांडूप ते मरोशी प्रेषणवाहिन्यांच्या पुनर्स्थापनेसाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ५ कोटीची तरतूद केली आहे.
- माहिम ते नाना चौक येथील १२ कि.मी. लांबीच्या प्रेषणवाहिन्यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ११ कोटीची तरतूद केली आहे.

- सायन ते काळाचौकी येथील १२ कि.मी. लांबीच्या प्रेषणवाहिन्यांच्या पुनर्स्थापना व पुनर्वसनासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ५ कोटीची तरतूद केली आहे.

  या सर्वांचा सुसाध्यता अभ्यास प्रगतीपथावर असून मे २०१२ पर्यंत निविदा मागविण्यात येऊन ही सर्व कामे मे २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. याचा अंदाजित खर्च ₹ १७६ कोटी इतका आहे.

- जुना भंडारवाडा जलवाहिनीच्या इनलेटपासून माहिम ते रे रोड पर्यंतच्या १० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांच्या पुनर्वसनाचा अंदाजित खर्च ₹ ७३.५० कोटी इतका आहे. या कामाचा खात्यामार्फत सुसाध्यता अभ्यास सुरु असून प्राधान्य विभाग शोधून टप्प्याटप्प्याने कामे करण्यात येतील. यासाठी अपेक्षित कालावधी ३ वर्षांचा असून सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ६ कोटीची तरतूद केली आहे.

ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर नवीन स्त्रोतातून होणारा अतिरिक्त पाणीपुरवठा वाहून नेण्यास व २४ x ७ पाणीपुरवठा पध्दती मुंबईमध्ये अंमलात आणण्यासाठी पाणीपुरवठयाचे जाळे अधिक बळकट व सक्षम होईल.

२५.४ <u>वितरण वाहिन्यांचे पुनर्वसन/पुनर्स्थापना</u>

- सन २०१२-१३ मध्ये ११८ कि.मी. जलवितरण वाहिन्यांचे व ३९ कि.मी. नवीन जलवाहिन्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ₹ २१८.९१ कोटीची तरतूद केली आहे.

२५.५ <u>जुन्या जलाशयांची पुनर्बांधणी व नवीन जलाशयांची बांधकामे</u>

- वरळी व भांडुप येथील जलाशयांची पुनर्बांधणी व मालाड येथे नवीन जलाशय बांधणे (एकूण ₹ १२५ कोटीच्या खर्चाची कामे) यासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ₹ ३५.०६ कोटीची तरतूद केली आहे.

## २५.६ डीएमझेड ची रचना व जल लेखा परीक्षण व जल वितरणाचे व्यवस्थापन :

जल वितरण व्यवस्थेमध्ये जलमापक परिमंडळाची निर्मिती करुन प्रत्येक परिमंडळात पाणी पुरवठा मोजण्यासाठी बल्क फ्लो मीटर्स बसविले जातील. पूर्व व पश्चिम उपनगरांमध्ये जलमापक परिमंडळाची निर्मिती करण्यात आली असून जून २०१२ पर्यंत प्रत्येक परिमंडळात बल्क फ्लो मीटर्स बसविण्याचे काम पूर्ण होईल. पाण्याच्या मोजणीमुळे जल लेखा परीक्षण करण्यास तसेच पाण्याचे समान वाटप होण्यास मदत होईल.

मे २०१२ पर्यंत शहर विभागातील जलमापक परिमंडळ निर्मितीचे काम पूर्ण होईल. तसेच नोव्हेंबर २०१२ पर्यंत या परिमंडळात फ्लो मीटर्स बसविण्यात येतील. प्रत्येक परिमंडळातील गळती अन्वेषण व गळती दुरुस्तींची कामे बाहेरील संस्थांकडून करुन घेण्याचे प्रस्ताविले आहे. ही कामे सन २०१२-१३ पासून ज्या परिमंडळामध्ये गळतीचे प्रमाण जास्त आहे, त्या परिमंडळापासून सुरुवात करुन टप्प्याटप्प्याने सर्व ठिकाणी अंमलात आणण्यात येतील. मुंबईत सर्व ठिकाणी हे काम करण्यासाठी ३ वर्षांचा कालावधी लागेल.

प्रत्येक जलमापक परिमंडळामध्ये जलमापक विभाग करणे, मोठे फ्लो मीटर्स बसविणे, जलदाब नियामक झडपा बसविणे आणि प्रत्येक जलमापक विभागात ग्राहकांच्या जलमापकांचे नियमन करणे, इत्यादी मूळ कामे सविस्तर जल लेखा परिक्षणासाठी हाती घ्यावयाची आहेत. जल वितरण व्यवस्थेचे जलमापन विभाग ठरविणे यासाठी या क्षेत्रातील बाहेरील तज्ञांची मदत घेऊन ही कामे हाती घेण्याचे प्रस्तविले आहे. सन २०१२-१३ मध्ये टी विभाग मार्गदर्शक विभाग म्हणून राबविण्यात येणार असून त्याच्यासह भांडूप, विक्रोळी, घाटकोपर व कुर्ला येथील काही भागात सन २०१२-१३ साली जलमापक परिमंडळाची निर्मिती करण्यात येईल. मुंबईच्या उर्वरित विभागात सन २०१३ ते २०१५ पर्यंत सदर कामे पूर्ण केली जातील.

२५.७ <u>एएमआर मीटर्स सुविधा</u>

सन २००९ पासून सर्व जलजोडण्यांवर एएमआर मीटर्स बसविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. कंत्राटदाराने कंत्राट कालावधीमध्ये १,२९,७७५ मीटर्सचा पुरवठा केला आहे. एएमआर मीटरला हानी पासून संरक्षणासाठी चेंबर बांधणे आवश्यक आहे अशी सुविधा झोपडपट्टयामध्ये नसते. या कारणास्तव झोपडपट्टयांमधील मीटर जोडण्यांवर एएमआर मीटर्स न बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुरवठा केलेल्या मीटर्सपैकी ६६,२०८ एएमआर मीटर्स आतापर्यंत जल जोडण्यांवर बसविण्यात आली आहेत. ऑक्टोबर २०१२ पर्यंत उर्वरित जोडण्यांवर एएमआर मीटर्स बसविणे अपेक्षित आहे.

पुढील दोन वर्षांत सर्व ग्राहक जलजोडण्यांना जलमापके पुरविण्यात येतील. उर्वरित जलजोडण्यांवर (मीटर आहेत व मीटर नाहीत) जलमापके बसविण्यासाठी नव्याने निविदा मागवून ऑक्टोबर २०१२ पर्यंत कार्यादेश देण्यात येतील. जवाहरलाल राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत सुधारणाच्या उद्दिष्टांपैकी जलजोडण्यांवर मीटर बसविणे हे एक उद्दिष्ट आहे.

२५.८ <u>२४ X ७ पाणी पुरवठा</u>

सदर योजना जानेवारी २०१२ पासून टी विभाग, मुलुंड येथे गुरु गोविंदसिंग मार्गावरील उंचावरील विभाग सोडून सुरु करण्यात आली आहे. यामध्ये क्षेत्रिय परिचालनासह प्रवाह नियमन व दाब नियमन करण्यात आले आहे. तसेच प्रवाह पध्दत, जोडणीधारकांची उपभोग पध्दत, स्थानिक परिस्थितीनुसार दाब व्यवस्था वगैरेचा अभ्यास करण्यात येत आहे. आतापर्यंतचे २४ X ७ पाणी पुरवठा व्यवस्थेचे निष्कर्ष पाहाता, सदर व्यवस्था सुरळीतपणे सुरु आहे. यापुढे अतिरिक्त फ्लो मीटर्स बसविणे व जल परीक्षण करणे याबाबत पावले उचलण्यात येत आहेत.

पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड पासून कन्नमवार नगर ते विक्रोळी पर्यंत ३००० मि.मी. व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित झाल्यावर, एप्रिल २०१२ पासून भांडूप (पूर्व), विक्रोळी (पूर्व) व पंतनगर येथे २४ तास पाणी पुरवठा करण्याचे प्रस्ताविले आहे.

२५.९ <u>मागणीच्या प्रमाणानुसार पाणी पुरवठा करणे</u>

माझ्या असे निदर्शनास आले आहे की, नव्याने विकसित झालेल्या विभागामध्ये सुधारणांचे क्षेत्र पाहून प्रतिदिन दरडोई ९० लिटर्स व प्रतिदिन दरडोई ४५ लिटर्स (जे प्रमाण प्रतिदिन दरडोई १३५ लिटर्स या मानकापेक्षा कमी आहे) एवढा पाणी पुरवठा करण्यासाठी वेळोवेळी प्रशासकीय निर्णय घेण्यात आले आहेत. पूर्वीचे हे सर्व प्रशासकीय निर्णय खंडित करण्यात येऊन येत्या आर्थिक वर्षापासून सर्व इमारतींना मागणीच्या प्रमाणानुसार पाणी पुरविले जाईल.

२५.१० <u>पाणी पुरवठयाच्या दर्जाचे नियंत्रण</u>

ज्या विभागात सतत दूषित पाणी प्राप्त होते असे विभाग शोधण्यात आले असून या विभागात पाण्याच्या वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार ८१०२ ठिकाणी नादुरुस्त व गळणाऱ्या जलजोडण्या दुरुस्त करण्यात आल्या आहेत. ३२ कि.मी. च्या वितरण वाहिन्या पुनर्वसित करण्यात आल्या आहेत व ३६ कि.मी. च्या वितरणवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत.

पाण्याची प्रतवारी चांगली राखण्यासाठी सर्व जलाशयांमध्ये क्लोरिनचा अतिरिक्त/वाढीव डोस दिला जातो. जलाशयातील पाण्याचा दर्जा तपासण्यासाठी उच्च दर्जाचे क्लोरीन कम्पॅरेटर्स मागविण्यात येत आहेत.

पाण्याच्या वितरण व्यवस्थेच्या विविध भागातून दररोज सरासरी २५० पाण्याचे नमुने तपासणीसाठी गोळा केले जातात व त्याची जी/उत्तर विभाग कार्यालयातील प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. जी/उत्तर विभाग कार्यालयातील प्रयोगशाळेत दररोज १००० पाण्याच्या नमुन्यांची व

भांडुप संकुल येथे २५० पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करता येईल इतकी सुधारणा केली जात आहे. पाण्याचे नमुने गोळा करण्याच्या पध्दतीत आणि त्यांच्या तपासणीत तसेच प्रयोगशाळेच्या क्षमतेत वाढ करण्याबाबतच्या सल्ल्यासाठी नीरी या संस्थेस नियुक्त करण्यात आले आहे. सन २०१२-१३ मध्ये दोन्ही प्रयोग शाळांच्या क्षमतेत वाढ करण्यात येईल. या योजनेमुळे लवकरात लवकर पाण्याच्या दूषितीकरणाचा शोध घेऊन दूषितीकरणाचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

२५.११ <u>मुंबईतील प्रेषणवाहिन्यांच्या लगतची अतिक्रमणे हटविणे</u>

मा. उच्च न्यायालयाने मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांच्या १० मी. परिसरातील अतिक्रमणे टप्प्याटप्याने हटविण्याचे आदेश दिले आहेत. सन २००९ मध्ये मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालानुसार प्रेषणवाहिन्यांच्या १० मी. परिसरात शहरामध्ये १५७८९ झोपडया आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये २०९० झोपडया हटवावयाच्या होत्या. जी/उत्तर व एस विभागांमध्ये २०६२ झोपडया निष्कासित करण्यात आल्या. त्यापैकी ७९८ पात्र कुटुंबे व ४२ व्यावसायिक गाळ्यांचे पुनर्वसन करण्यात आले. यावर्षी दुसऱ्या टप्प्यातील एन, टी व एम/पश्चिम विभागातील झोपड्या हटविण्यात येतील.

२५.१२ <u>जलविद्युत निर्माण</u>

मध्य वैतरणा धरणातून जलविद्युत निर्मितीसाठीचा सुसाध्यता अहवाल पूर्ण झाला असून, या कामासाठी राज्य शासनाकडे परवाना पत्रासाठी विंनती करण्यात आली आहे. सदर परवाना पत्र प्राप्त झाल्यावर विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) व निविदा दस्तऐवज तयार करण्यात येतील.

२५.१३ <u>धरणे व जलप्रक्रिया केंद्र येथे सुरक्षा उपाययोजना</u>

महत्वाच्या पाणी पुरवठा केंद्रांची सुरक्षितता वाढविण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची योजना हाती घेण्यात आली असून, विहार धरण व भांडुप जलप्रक्रिया केंद्रासाठी ₹६.०७ कोटी

आणि तानसा व मोडक सागर धरणासाठी ₹ ६.३३ कोटी खर्चाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. तसेच पिसे व पांजरापूर जलप्रक्रिया केंद्रात अंदाजित ₹ ६.८८ कोटीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत.

## २६. मलनि:सारण

### २६.१ मुंबईतील मलनि:सारण प्रणालीची सद्यस्थिती

मुंबईतील मलनि:सारणाची सर्वात जुनी व्यवस्था १३० वर्षांपूर्वीची असून, त्यातील बरीचशी मूळ व्यवस्था ही आजही कार्यरत आहे.

सध्या मुंबईतील मलनि:सारण व्यवस्थेमध्ये १५०० कि.मी. मलनि:सारणाचे जाळे असून ५० उदंचन केंद्रे, ५६०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची ७ प्रक्रिया केंद्रे, ५४६०० मनुष्य प्रवेशिका असून प्रतिदिनी १७०० द.ल.लि. मलजल गोळा होतो. अशा प्रकारे गोळा झालेले मलजल कुलाबा, वरळी व वांद्रे येथील ३ सागरी पातमुखाद्वारे समुद्रामध्ये सोडले जाते आणि वर्सोवा, घाटकोपर व भांडुप येथील तीन वातित तलावांद्वारे (Areated lagoons) खाडीमध्ये सोडले जाते. मालाड येथे गोळा होणाऱ्या मलजलावर प्राथमिक प्रक्रिया केल्यानंतर मालाड येथील खाडीमध्ये सोडले जाते. सन २००४ मध्ये मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-१ पूर्ण झाल्यामुळे मलनि:सारण प्रक्रियेची क्षमता वाढली असून सेवाक्षेत्रही वाढून मलनि:सारणाच्या टाक्या भरुन वाहण्याचे प्रमाण कमी होऊन झोपडपट्ट्यांमधील मलनि:सारणाचे जाळे तुलनात्मकदृष्टया सुधारले आहे. विकसनशील क्षेत्रापैकी जवळजवळ ६२% क्षेत्रामध्ये मलनि:सारण व्यवस्था आहे व त्यातून एकूण मलजलाच्या ६५% मलजल निर्माण होतो. सन २००२ मध्ये ₹१०,६०० कोटी खर्चासह

तयार केलेल्या बृहत आराखडयाप्रमाणे (सन २०१० ची आधारभूत किंमत) मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ हा प्रकल्प सन २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे.

२६.२ <u>मलजल गोळा करण्याच्या व वहन करण्याच्या पध्दतीत सुधारणा</u>

सन २०१५ पर्यंत मलजल गोळा करुन वाहून नेण्यांचे सध्याचे प्रमाण ६५ टक्क्यावरुन ८०टक्यापर्यंत नेण्याचे महापालिकेने निश्चित केले आहे.

- जेथे मलनि:सारण क्षेत्र उपलब्ध नाही अशा ठिकाणी ओपन कट पध्दतीने ५५.६४ कि.मी. प्रेषणवाहिन्या व मलनि:सारण वाहिन्या मोठ्या करण्याचे प्रस्ताविले होते. त्यापैकी २५ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे. सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात पूर्वनियोजित केलेले ३०.६४ कि.मी. चे काम व सूक्ष्म बोगदा पध्दतीने (Microtunneling) मलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठीची तरतूद धरुन ₹१७४ कोटीची तरतूद केली आहे. यापैकी १२ कि.मी. चे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण होईल. उर्वरित १८.६४ कि.मी. च्या मलवाहिनीचे काम सन २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- ज्या मलनि:सारण वाहिन्या रेल्वे/द्रुतगती मार्ग /मोठे नाले/नद्या याखालून टाकायच्या आहेत तेथे पारंपारिक ओपन कट पध्दती वापरणे शक्य होणार नसल्याने त्या सुक्ष्म बोगदा पध्दतीने टाकण्यात येतील. (Microtunneling) सन २००७ मध्ये ₹३९४.६५ कोटीच्या २५.०६ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या सुक्ष्म बोगदा पध्दतीने टाकण्याचे योजिले होते. त्यापैकी आतापर्यंत १२.४८ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे. मागील शिल्लक कामांसह ३०.१७ कि.मी. चे काम सन २०१२-१३ या वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे.

- झोपडपट्टयांमध्ये आणि जेथे मलनि:सारण क्षेत्र उपलब्ध नाही अशा ठिकाणी निर्माण झालेले मलजल हे उघडया गटारातून समुद्रामध्ये किंवा खाडीमध्ये सोडले जाते. हे मलजल पुढील ३ ते ४ वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने मलनि:सारण वाहिन्यांमध्ये वळवण्याच्या कामासाठी ₹५०० कोटी इतका अंदाजित खर्च येणार असून, सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात यासाठी ₹१० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

  शहर विभागातील मनुष्यप्रवेश शक्य नसलेल्या अंदाजे ३६० कि.मी. जुन्या मलनि:सारण वाहिन्यांच्या स्थितीच्या सर्वेक्षणापैकी (Condition Assessment) (₹२५ कोटी) १७६ कि.मी. चे सर्वेक्षण (₹ १३ कोटी) पूर्ण झाले असून उर्वरित १८४ कि.मी. चे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण होईल. मुंबईच्या उपनगरांमध्ये सन २०१२-१४ या कालावधीत मनुष्यप्रवेश शक्य नसलेल्या ८५५ कि.मी. मलनि:सारण वाहिन्यांच्या सर्वेक्षणाचे ₹५८ कोटीचे काम प्रस्ताविले असून त्यामुळे ३५ वर्षांपेक्षा जास्त जुन्या असलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या स्थिती सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईल. सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात मनुष्यप्रवेश शक्य नसलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या सर्वेक्षणासाठी ₹२० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

- मलनि:सारण वाहिन्यांच्या स्थितीचे सर्वेक्षण केल्यानंतर खराब झालेल्या मनुष्यप्रवेश शक्य नसलेल्या मलवाहिन्यांच्या पुनर्वसनास सुरुवात केली आहे. शहर विभागात १४ कि.मी. लांबीच्या मलवाहिनीचे पाईप बर्स्टिंग पध्दतीने पुनर्वसन केले आहे. ५.३ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्यांचे पाईप बर्स्टींग पध्दतीने आवर्धन केले आहे. १०.४३ कि.मी. मलवाहिन्यांचे पुनर्वसन (पाईप बर्स्टींग पध्दतीने ५ कि.मी. व सीआयपीपी पध्दतीने ५.४३ कि.मी. असे ₹२२.५ कोटीचे काम) सन २०१२-१३ मध्ये पूर्ण केले जाईल. अतिरिक्त १५ कि.मी.

लांबीच्या मलवाहिन्यांचे सीआयपीपी पध्दतीने पुनर्वसन करण्यासाठी (अंदाजित खर्च ₹२४ कोटी) निविदा मागविण्यात येऊन ही कामे सन २०१२-१३ मध्ये पूर्ण केली जातील. शहर विभागातील मनुष्यप्रवेश शक्य नसलेल्या १८४ कि.मी. व उपनगरातील ८५५ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्यांचे सर्वेक्षण झाल्यानंतर खराब झालेल्या मलनि:सारणवाहिन्यांच्या पुनर्वसनाचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येईल.

- शहर विभागामध्ये मनुष्य प्रवेश शक्य असलेल्या मलवाहिन्यांचे बांधकाम हे अंडाकृती व वर्तुळाकार स्वरुपातील विटांचे बांधकाम स्वातंत्र्यपूर्व काळातील असून अशा मलवाहिनींची एकूण लांबी ४५ कि.मी. आहे. शहर विभागात व उपनगरात जीआरपी पध्दतीने आतापर्यंत एकूण ३० कि.मी. मनुष्यप्रवेश शक्य असलेल्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. सद्य स्थितीत मनुष्यप्रवेश शक्य असलेल्या ५ कि.मी. मलवाहिन्यांच्या पुनर्वसनाचे अंदाजे ₹ २२ कोटी रकमेचे काम हाती घेतले असून २ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे. शहर विभागातील मनुष्यप्रवेश शक्य असलेल्या ५ कि.मी. लांबीच्या व उपनगरांमध्ये २५ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन करण्याचे काम यावर्षी सुरु करण्यात येऊन सन २०१४-१५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यासाठी एकूण ₹ १२० कोटी इतक्या रकमेची आवश्यकता असून सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात यासाठी ₹ २७ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.
- डॉन बॉस्को शाळेपासून गोरेगांव उदंचन केंद्र ते मार्वे मार्गापर्यंत लिंक रोड व पुढे मालाड मलप्रक्रिया सुविधा केंद्रापर्यंत १३ कि.मी. लांबीची व १.८ मीटर ते ३.५ मीटर व्यासाची प्राधान्य मलवाहिनी टाकण्याचे काम यावर्षी हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे. हया कामाची अंदाजित किंमत ₹ २७० कोटी असून, हे काम सन २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

यामुळे गोरेगांव ते दहिसर या विभागाला दिलासा मिळेल, एप्रिल २०१२ पर्यंत या कामाची मसुदा निविदा तयार करण्यात येईल. यासाठी मी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ ४० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

- सध्या अस्तित्वात असलेल्या (१) अफगाण चर्च, (२) नेपियन सी रोड, (३) हार्वे रोड, (४) चिंचपोकळी, (५) ब्राम्हणवाडी, (६) वल्लभ नगर, (७) कन्नमवार नगर या सात जुन्या उदंचन केंद्रांची दर्जोन्नती करण्याचे प्रस्ताविले आहे व त्यासाठी सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात ₹ १७.५० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

२६.३ <u>मलनि:सारण प्रक्रिया केंद्रामध्ये सुधारणा</u>

सध्याच्या मलनि:सारण सुविधा जरी एसडब्लू-II मानकानुसार किनाऱ्यापासून १ कि.मी. अंतरापर्यंत डिझॉल्वड ऑक्सिजन (डी.ओ.) व बी.ओ.डी.. संदर्भातील मानके (Standard) पूर्ण करीत असली तरी प्रति १०० मि.ली. ला १०० सीएफयु कोलीफॉर्म एवढी पातळी साध्य करीत नाहीत (सध्याचे प्रमाण ०.५ X १०$^{४}$ ते १ X १०$^{४}$ सीएफयू प्रति १०० मिली असे आहे). अतएव महापालिकेने सर्वच्या सर्व सात प्रक्रिया केंद्राची दर्जोन्नती व विस्तारीकरण करण्याचे काम हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे. त्यामुळे फिकल कोलीफॉर्मची पातळी १०० सीएफयु प्रति १०० मि.ली. पेक्षा कमी राखण्यास मदत होईल.

महापालिका सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने ठरवून दिलेल्या मानकाची (१०० मि.ग्रॅम बी.ओ.डी. व १०० मि.ग्रॅम सस्पेंडेड सॉलीड प्रति लिटर) वर्सोवा, भांडुप व घाटकोपर येथे जैविक प्रक्रियेसह पातमुखांमार्फत पूर्तता करीत आहे.

सध्या भांडुप व घाटकोपर येथे अस्तित्वात असलेल्या विद्यमान सुविधांची पुनर्रचना करुन प्रदूषण नियामक मंडळाने आग्रह केल्याप्रमाणे सन २०१४ पर्यंत २० बी.ओ.डी. प्रति लिटर व

३० मि.ग्रॅम सस्पेंडेड सॉलीड प्रतिलिटर दर्जाची प्रक्रिया करण्यात येईल. ज्यामुळे ९५ टक्के पर्सेंटाईलची पूर्तता होईल. यामुळे समुद्र किनाऱ्यावरील पाण्याचा दर्जा सुधारेल. उदंचन केंद्राच्या दर्जोन्नतीसह या कामाची किंमत ₹ ९२४ कोटी असून हे काम सन २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. घाटकोपर व भांडुप मल प्रक्रिया केंद्रासाठी पूर्व अर्हता देकार यापूर्वीच मागविण्यात आले आहेत. वर्सोवा तलावाची क्षमता वाढविण्यासाठी एरिएटरसह एक अतिरिक्त स्ट्रीम बांधावी लागेल. जेणेकरुन अतिरिक्त मलप्रवाहावर प्रक्रिया करणे शक्य होईल. यासाठी वन व पर्यावरण मंत्रालयाच्या परवानगीसाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे (यासाठी नीरी या संस्थेला आपत्कालीन व्यवस्था व जोखीम मूल्यमापनासाठी नियुक्त केले आहे). याबरोबरच निविदा दस्तऐवज तयार करण्याचे काम हाती घेतले असून ₹ १२८.७९ कोटीच्या अंदाजित खर्चाचे हे काम सन २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

कुलाबा, वरळी व वांद्रे येथील प्रक्रिया केंद्रातून सागरी पातमुखाद्वारे सोडलेले प्रक्रियापूर्व मलजल सागर किनाऱ्यालगत असणारे ३ मि.ग्रॅम बी.ओ.डी. प्रति लिटर असे मानक पूर्ण करते व किनाऱ्यापासून १ कि.मी. पर्यंत ४ मि.ग्रॅम डी.ओ. प्रति लिटर अशी एसडब्लू-II ची मानके पूर्ण करते. तथापि महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने वांद्रे व वरळी येथील पातमुखातून बाहेर पडणाऱ्या ५० मि.ग्रॅम बी.ओ.डी. प्रति लिटर व ५० मि.ग्रॅम एस.एस. प्रति लिटर अशी असावी असे आदेश दिले आहेत. यामुळे समुद्र किनाऱ्यावरील पाण्याचा दर्जा सुधारेल. वांद्रे व वरळी येथील जागेच्या अडचणींवर मात करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या सुधारित मानकांची पूर्तता करण्यासाठी सांडपाण्यावर उच्च दर्जाची प्राथमिक रासायनिक प्रक्रिया (सीईपीटी) व पुनर्प्रक्रिया करण्यात आली आहे. यामुळे अपेक्षित दर्जा मिळविण्यासाठी २०१४ ऐवजी २०१७ पर्यंत उशीर होईल. कुलाबा सांडपाणी प्रक्रिया केंद्राबाबतचे पूर्व अर्हतेचे काम संपले असून विनंती प्रस्ताव (आरएफपी) तयार करण्याचे काम सुरु आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या

किनाऱ्यालगतच्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीसाठी ठरविलेल्या मानकाप्रमाणे २० मि.ग्रॅम बी.ओ.डी. प्रति लिटर व ३० मि.ग्रॅम एस.एस. प्रति लिटर आणि दुसऱ्यांदा प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची सागरी पातमुखाद्वारे विल्हेवाट लावण्याच्या मानकाच्या अटींची पूर्तता करुन सांडपाणी प्रक्रिया केंद्र सन २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अंदाजित ₹ ७०० कोटीच्या खर्चाचे मालाड सांडपाणी प्रक्रिया केंद्र सन २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे. वर्सोवा वातित तलाव व मालाड सांडपाणी सुविधा केंद्र येथून दुसऱ्यांदा प्रक्रिया केलेले सांडपाणी बोगदयामार्फत भाती कॉमन पॉईंटपर्यंत वाहून नेले जाईल व पुढे एरंगळ सागरी पातमुखाद्वारे समुद्रात सोडले जाईल (४.५ कि.मी. लांब, ३.५ मी. व्यास व ६० मी. खोल).

अतएव मुंबई महानगरपालिका सन २०१७ पर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाची सुधारित मानके पूर्ण करण्याच्या स्थितीत असेल. मलजल प्रक्रिया व विल्हेवाट लावण्याच्या सुविधांची दर्जोन्नती करुन त्याचा विस्तार करणे यांचा अंदाजित खर्च ₹ २६४७ कोटी आहे.

२६.४ <u>पाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर</u>

सुधारित प्रक्रियेमुळे मलजलाचा दर्जा वाढल्याने मलजलाचे पुनर्चक्रिकरण/पुनर्वापर (Recycle/ Reused) करता येईल. सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून चांगल्या दर्जाचे मलजल बाहेर पडत असल्याने मलजलाच्या पुनर्चक्रीकरणाचे काम संकल्पचित्रे बनवा, बांधा, मालकीसह प्रचालन करा व हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर करता येईल. पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी अशा पाण्याचा उपयोग करुन पिण्याच्या पाण्याची मागणी कमी करण्यासाठी प्रक्रिया केलेले हे पाणी विकत घेणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

२६.५ झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रम

सन २०११ च्या जनगणनेनुसार मुंबईत झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांची लोकसंख्या ६५ लाख आहे. त्यापैकी ४५ लाख लोकांनाच सामुहिक शौचालयाची सेवा दिली आहे. तथापि, झोपडपट्टीतील सुमारे २० लाख लोकांना शौचालये न पुरविल्याने ते उघडया जागांचा वापर करतात. महापालिकेने सुरु केलेल्या झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रमात मुंबई पोर्ट ट्रस्ट, रेल्वे, विमानतळ, मीठ आयुक्त, वनखाते इत्यादींच्या शासकीय व खाजगी जागेवरील सर्व झोपडपट्टी धारकांना समाविष्ट करण्याचे ठरविले आहे. शौचालये बांधण्यासाठी या प्राधिकरणांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. परंतु त्यांचेकडून हवा तसा उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत नाही. झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रम हा मागणी तत्वावर आधारित असून यामध्ये प्रसाधनगृहांचे आराखडे करणे, संकल्पचित्रे बनविणे, प्रचालन व त्याची देखरेख, परिरक्षण करणे इत्यादी गोष्टींसाठी जनतेचा सहभाग अपेक्षित आहे.

सामुहिक तत्वावर आधारित, स्थानिक संस्थांकडून प्रचालन/परिरक्षण करण्यात येणाऱ्या प्रसाधनगृहांच्या बांधकामासाठी महापालिकेने आतापर्यंत ₹ १३१ कोटी खर्च केले आहेत. सन २०१२-१४ या कालावधीत अंदाजित ₹ १४० कोटीची ८४०० शौचकुपे बांधण्याचे योजिले आहे. जेथे शौचालये नाहीत अशा झोपडपट्टीवासियांसाठी सामुहिक शौचालये बांधण्यासाठी गेल्या वर्षी करण्यात आलेल्या विस्तृत मागणी सर्वेक्षणानुसार आणखी ₹ ३६० कोटीची

आवश्यकता आहे. सन २०११-१२ मध्ये ५१ शौचालये (१३९८ शौचकुपे) झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रमांतर्गत कार्यान्वित करण्यात आली.

२६.६ पाणी पुरवठा व मलनि:सारण उपयोगितांची भौगोलिक माहिती

पाणी पुरवठा व मलनि:सारण जाळयांचे नकाशे हे विकास आराखडयाच्या नकाशांवर आधारित आहेत. हे नकाशे हाताने अनुरेखित केले असल्याने त्यामध्ये प्रमाणबध्दता व संरेखन याबाबतीत चुका आहेत. जी.आय.एस. नकाशे हे आकाशातून घेतलेल्या छायाचित्रांवर आधारित असल्यामुळे व फार मोठे असल्यामुळे यापूर्वीच पर्जन्य जलवाहिन्यांच्या योजनांसाठी विकसित केले आहेत. पाणीपुरवठा व मलनि:सारणाच्या योजना यावर्षी जी.आय.एस. नकाशांच्या आधारे हाती घेण्यात येतील. यामुळे सध्याचे चित्र, आराखडा व भविष्यकालीन गरजा शोधणे, वाहिन्या फुटण्याचे पृथ:करण, गळतीचे पृथ:करण, जललेखा परीक्षण, महसूल न मिळणाऱ्या पाण्याची मोजणी करता येईल. जमिनीखालील उपयोगितांचे सर्वेक्षण करण्याकरीता बाहय संस्थेची नेमणूक करुन जी.आय.एस. नकाशांमध्ये सर्व माहिती संरेखित करील आणि ज्यांना पुरेसे प्रशिक्षण आहे अशा कर्मचाऱ्यांच्या गटाकडून नियमितपणे हे भौगोलिक नकाशे अद्ययावत ठेवण्याचे काम केले जाईल.

२७. पाणी पुरवठा व मलनि:सारण खात्यासाठीचे वित्तिय प्रक्षेपण

पाणी पुरवठा व मलनि:सारणाचे नवीन प्रकल्प तसेच जुन्या जलवाहिन्यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना, त्यांचे बळकटीकरणासह पुढील १४ वर्षांसाठी म्हणजे सन २०२५-२६ पर्यंत

करावयाच्या लागणाऱ्या निधीच्या कामांसाठी अंदाजानुसार ₹ ४२,५८० कोटी इतका भांडवली खर्च अंदाजिला आहे (तक्ता-अ). यामध्ये प्रस्तावित पाणी पुरवठा प्रकल्प व मुंबई मलनि:सारण प्रकल्पासाठी ₹ २२,०८० कोटीचे अंदाज समाविष्ट आहेत.

**तक्ता 'अ' - पाणी पुरवठा व मलनि:सारणाचे प्रकल्प :**

| अनु. क्र. | प्रकल्पाचे नाव | क्षमता द.ल.लि. प्रतिदिनी | प्रकल्पाची किंमत/खर्च (₹ कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | पिंजाळ प्रकल्प | ८६५ | ८१९५.०० |
| २. | दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प | १५८६ | ३२८५.०० |
| ३. | मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ (प्राधान्य कामे, घटक १) | | ५२५०.०० |
| ४. | मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ (प्राधान्य कामे, घटक २,३,४) | | ५३५०.०० |
| | **एकूण (अ) :** | | २२०८०.०० |
| | **प्रगतीपथावरील प्रकल्पांचा खर्च (ब) :** | | ३२४४.५३ |
| | **इतर (जल अभियंता, मलनि:सारण प्रचालन व मलनि:सारण प्रकल्प या खात्यातील अंतर्गत निधीमधून पार पाडावयाच्या कामाचा खर्च (क) :** | | १७२५५.५४ |
| | **एकूण (अ + ब + क) :** | | ४२५८०.०७ |

मी, सन २०२५-२६ पर्यंतच्या कालावधीसाठी तयार केलेल्या फंडफ्लो तक्त्यावरुन असे दिसून येते की, सन २०१२ नंतरही जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान

सुरु असल्यास व त्यातून शासनाकडून ५०% अनुदान गृहित धरुनही ₹ २६,०५० कोटी इतकी तूट येते. उर्वरित ५० टक्के खर्चाच्या हिश्श्यापैकी, ७० टक्के निधी म्हणजे ₹ ७,७२८ कोटी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून कर्ज घेऊन उभारला जाईल. या कर्जांचा व्याजदर द.सा.द.शे. १० टक्के व ५ वर्षे विलंबावधी गृहीत धरल्यास व्याजाची रक्कम ₹ ४,२६३ कोटी होते. सदर रक्कम मूळ मुद्दलात समाविष्ट करुन ती रक्कम कर्ज म्हणून धरण्यात येईल. त्यामुळे भांडवलावरील व्याजासह कर्जाची एकूण रक्कम ₹ ११,९९१ कोटी इतकी होईल. अनुदान, कर्जे त्याशिवाय विकास निधीद्वारे मिळणारे ₹ २४३१ कोटी विचारात घेऊनही ₹ २६,०४७ कोटी इतकी तूट राहील.

अशा प्रकारे प्रगतीपथावर असलेल्या व भविष्यकालीन हाती घ्यावयाच्या प्रकल्पांसाठी लागणाऱ्या निधीची आवश्यकता विचारात घेता, मी विद्यमान जल व मलनि:सारण सेवांच्या दरात विनाविलंब सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याच्या निर्णयाप्रत आलो आहे. याशिवाय, वित्तिय संस्थांकडून नवीन प्रकल्पांसाठी कर्ज उभारतेवेळी महापालिकेस अंतर्गत निधीतून करावी लागणारी भांडवली गुंतवणूक, वाढता प्रचालन व परिरक्षण खर्च, कर्जाची परतफेड व त्यावरील व्याज इ. लागणारे खर्च भागविण्याइतपत महापालिकेची आर्थिक स्थिती भक्कम आहे याची ग्वाही धनकोंना (Lenders) द्यावी लागेल. मी येथे नमूद करु इच्छितो की, आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च, प्रचालन व परिरक्षण खर्च, विद्युत शक्तीवरील वाढीव खर्च व शासनाकडून पुरविल्या जाणाऱ्या घाऊक पाण्याचे दर या खर्चाच्या बाबींमध्ये दरवर्षी सरासरी ८ टक्के वाढ होत आहे. तसेच पाण्याच्या उत्पादन खर्चात व मलनि:सारण सेवेच्या खर्चातही सातत्याने वाढ होत आहे. सन २००८ या वर्षात सहकारी सोसायटी / इमारती या फक्त एका प्रवर्गात दूरेक्ष पध्दतीने

(टेलिस्कोपिक) लागू केलेली दर आकारणी वगळता सन २००२ पासून पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांच्या दरामध्ये आजपर्यंत सुधारणा करण्यात आलेली नाही.

सन १९७४ ते १९९७ पर्यंत सर्व प्रकारच्या घरगुती वापरासाठीचे पाण्याचे दर समान होते. तद्नंतर १९९७ ते २००० पर्यंत घरगुती ग्राहक गावठाण, कोळीवाडा, चाळ आणि सहकारी सोसायटी अशा तीन प्रवर्गात विभागले गेले. दि.०१.०४.२००० पासून घरगुती ग्राहकांचे झोपडपट्टी व सहकारी सोसायटी/इमारती अशा दोन प्रवर्गात एकत्रीकरण केले गेले. सहकारी सोसायटया व इमारतींना विद्यमान स्थितीत ₹ ३.५० प्रति हजार लिटर असा दर आकारण्यात येत असला तरी दूरेक्ष आकारणी पध्दतीचा परिणाम म्हणून हा दर ₹ ५.३५ प्रति १००० लिटर एवढा होतो. म्हणून सदर प्रवर्गाचा विद्यमान दर ₹ ३.५० ऐवजी ₹ ४.०० प्रति १००० लिटर्स असा प्रस्तावित असला तरी प्रत्यक्षात त्यांना सरासरी ₹ ६.११ अशा दराने आकारणी होणार आहे.

गलिच्छ वस्त्या इत्यादिंसाठी आकारल्या जाणाऱ्या पाण्याचा सध्याचा दर ₹ २.२५ वरुन ₹ ३.५० प्रति १००० लिटर्स असा सुधारित करण्याचे प्रस्ताविले आहे. दोन्ही घरगुती ग्राहकांच्या प्रवर्गांना महापालिका सारख्याच प्रतीचे पाणी पुरवित असली तरी इतर घरगुती ग्राहकांना प्रस्ताविलेल्या दरांच्या तुलनेत झोपडपट्टी, गावठाण व कोळीवाडे, चाळीमध्ये राहणाऱ्या ग्राहकांना ₹ २.६१ प्रति १००० लिटर्स अशा कमी दरानेच आकारणी होत राहणार आहे.

अशा तऱ्हेने येणारी एकूण तूट काही प्रमाणात कमी करण्यासाठी बिगर घरगुती ग्राहकांच्या विद्यमान दरामध्ये खालील तक्ता-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**तक्ता - १ : पाण्याच्या दरातील प्रस्तावित वाढ आणि महसूलातील वाढ :**

| जल आकार नियम क्र. | तपशील | **विद्यमान दर प्रति १००० लिटर (₹)** | विद्यमान महसूल (₹ कोटीत) | **प्रस्तावित दर प्रति १००० लिटर (₹ )** | प्रस्तावित दरानुसार मिळणारा महसूल (₹ कोटीत) | महसूलातील वाढ (₹कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| | घरगुती | | | | | |
| १.०१ व १.०१अ | i) गलिच्छ वस्ती | २.२५ | १०३.३६ | ३.५० | १६०.७८ | ५७.४२ |
| १.१ | ii) गृहनिर्माण संस्था व इमारती | ३.५० | ३७६.१४ | ४.०० | ४२९.८८ | ५३.७४ |
| | बिगर-घरगुती | | | | | |
| १.२ | i) बिगर व्यावसायिक संस्था | १०.५० | २२.८६ | १६.०० | ३४.८४ | ११.९८ |
| १.४ | ii) व्यावसायिक संस्था | १८.०० | ३४.०५ | ३०.०० | ५६.७५ | २२.७० |
| १.५ | iii) उद्योगधंदे, कारखाने | २५.०० | २५९.१५ | ४०.०० | ४१४.६४ | १५५.४९ |
| १.६ | iv) रेसकोर्स व तीन व त्यावरील तारांकित हॉटेल्स | ३८.०० | २०.८५ | ६०.०० | ३२.९२ | १२.०७ |
| | एकूण : | | ८१६.४१ | | ११२९.८१ | ३१३.४० |

याच बरोबर मी स्थायी समितीस विनंती करतो की, प्रतिवर्षी आस्थापना, प्रशासकीय, प्रचालन व परिरक्षण, विद्युत शक्ती आणि शासकीय धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी यांच्या एकत्रित खर्चाच्या प्रत्यक्ष वाढीच्या प्रमाणात मात्र प्रतिवर्षी जास्तीत जास्त ८% इतक्या मर्यादेच्या अधीन राहून जलआकार दरात वाढ करण्यास व तद्अनुषंगाने प्रचलित नियमानुसार वाढीव जल आकारावर मलनि:सारण आकार वसुलीसाठीही स्थायी समितीने मान्यता द्यावी. या व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे जल आकारात ८% पेक्षा अधिक प्रमाणात दरवाढ करण्याची आवश्यकता असेल त्या वेळी यथायोग्य प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात येईल.

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजासह विद्यमान जल व मलनि:सारणाच्या दर/आकारामध्ये करावयाच्या दरवाढीचा प्रस्ताव मी स्थायी समितीच्या विचारार्थ स्वतंत्ररित्या सादर केला आहे. स्थायी समितीने जल व मलनि:सारणाच्या दर/आकारामध्ये करावयाच्या दरवाढीच्या प्रस्तावाचा विचार करुन या प्रस्तावास मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

## २७.१ सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्प 'ग' (निधी संकेतांक ४०) चे आकारमान

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात महसूली व भांडवली जमा मिळून ₹ ६२८४.२३ कोटी इतके उत्पन्न अंदाजिले असून महसूली व भांडवली खर्च मिळून ₹ ६२८३.४३ कोटी इतका खर्च अंदाजिला आहे.

**अर्थसंकल्पाचा समतोल**

सन २०११-१२ चा सुधारित अंदाज तयार करताना सुरुवातीला ₹ ४१०.२० कोटीची तूट येत होती. ही तूट घसारा निधीतून उचल घेऊन अर्थसंकल्प समतोल राखण्यात आला. तथापि, सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज करताना जल व मलनि:सारण आकाराच्या सुधारित दरांमुळे अपेक्षित असलेला वाढीव महसूल विचारात घेऊनही ₹ १७५१.२२ कोटीची तूट येत होती. ही तूट घसारा निधी संचित वर्ताळा आणि मालमत्ता पुनर्निर्माण व पुनर्स्थापना निधी या राखीव निधीतून भरुन काढून व ₹ ०.८० कोटी इतकी नाममात्र शिल्लक दाखवून सन २०१२-१३ चा अर्थसंकल्प समतोल केला आहे.

सन २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज, २०११-१२ चे सुधारित अंदाज व २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजातील जमा व खर्चाची तुलना खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता - २:** (₹ कोटीत)

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ | सुधारित अंदाज २०११-१२ | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|---|
| **निधीची मूलसाधने** | | | |
| अंदाजित महसूल | ३८६८.२८ | ३९३१.५९ | ४४४६.१० |
| शासकीय अनुदान | २६०.३८ | ३५४.५५ | ०.०० |
| विकास आकार | ५८.३८ | ८६.६६ | ८६.९१ |
| राखीव निधीतून उचल | १७३९.३२ | ४१०.२० | १७५१.२२ |
| **एकूण निधी (अ):** | **५९२६.३६** | **४७८३.००** | **६२८४.२३** |
| **विनियोग** | | | |
| महसूली खर्च | २५६४.६० | २३७४.७७ | २९२४.८३ |
| भांडवली खर्च | ३३६१.१५ | २४०७.९१ | ३३५८.६० |
| **एकूण विनीयोग (ब) :** | **५९२५.७५** | **४७८२.६८** | **६२८३.४३** |
| **शिल्लक/(तूट) (अ- ब)** | **०.६१** | **०.३२** | **०.८०** |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, सन २०१२-१३ च्या महसूलात जुलै २०१२ पासून होणाऱ्या पाण्याच्या दरवाढीतून मिळणाऱ्या ₹ २९३.९३ कोटी अतिरिक्त महसूलामुळे तसेच मध्य वैतरणातून मिळणाऱ्या पाण्यामुळे मिळणारे उत्पन्न, जल व मलनि:सारण लाभ करातील वाढीपासून मिळणारे ₹ १५०.०३ कोटी (करपात्र मूल्य वाढल्यामुळे) आणि इतर महसूलातील, व्याज, कंत्राट कामांवरील अतिरिक्त जल/मलनि:सारण आकार यातील ₹ १३३.८६ कोटीची वाढ अशी मिळून एकूण ₹ ५७७.८२ कोटीची वाढ दिसत आहे.

सन २०११-१२ चा अर्थसंकल्पीय अंदाज ₹ ५९२५.७५ कोटी वरुन ₹ ४७८२.६८ कोटी इतका सुधारित करण्यात आला आहे.

सन २०११-१२ मध्ये चार मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पाची कामे अंतिमत: पूर्णत्वाच्या टप्प्यावर असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च झालेला आहे.

मुख्यत: पाणी पुरवठा प्रकल्प व मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-दोन मध्ये नवी कामे योजिली असल्यामुळे पुढील काही वर्षात भांडवली खर्च मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित आहे.

मी येथे पुन्हा आग्रहाने सांगू इच्छितो की, नियोजित प्रकल्पांचा खर्च भागविण्यास व सन २०२५-२६ पर्यंतचे प्रकल्प पूर्ण करण्यास जल व मलनि:सारण दरांची सुधारणा करणे अनिवार्य असून या प्रकल्पांची योजना मुंबईतील नागरिकांना १०० टक्के जल व मलनि:सारण सेवांच्या सोयी उपलब्ध होण्यासाठीच केली आहे.

२८. आपला सहभाग व अंत:करणपूर्वक सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून आगामी वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज 'अ'(निधी संकेतांक - ११, १२, ६०, ७०), समतोल अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' (निधी संकेतांक-२१, २२, २३) आणि शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' (निधी संकेतांक-४०) स्थायी समितीच्या विचारविनिमयार्थ व मंजुरीसाठी सादर करीत आहे.

सस्नेह धन्यवाद !

**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०१२**

**सुबोध कुमार**
**महानगरपालिका आयुक्त**

# परिशिष्टे

## परिशिष्ट - एक

### महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(₹ कोटीत)

| अनु.क्र. | महसुली उत्पन्नाचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|
| १. | जकात (नक्त) | ६९००.०० |
| २. | मालमत्ता कर | ४३१३.३४ |
| ३. | जल आणि मलनि:सारण आकार | ११२१.०० |
| ४. | विकास नियोजन खात्यापासून प्राप्ती | ३४३५.४९ |
| ५. | शासनाकडून अनुदाने | ३०४.०४ |
| ६. | गुंतवणूकीपासून प्राप्ती | १५३३.७५ |
| ७. | पर्यवेक्षण आकार | ५०९.४९ |
| ८. | घनकचरा व्यवस्थापन | ९९.९९ |
| ९. | रस्ते व पूल यापासून प्राप्ती | ११६.९८ |
| १० | अनुज्ञापन खात्यापासून प्राप्ती | १४३.८२ |
| ११. | रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती. | ११०.४४ |
| १२. | बाजार आणि देवनार पशुवधगृह खात्यांपासून प्राप्ती | ७०.४४ |
| १३ | इतर प्राप्ती | १०२२.१७ |
| | **एकूण** | **१९६८०.९५** |

## परिशिष्ट -दोन

## महसुली खर्च - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(₹ कोटीत)

| अनु. क्र. | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|
| १. | आस्थापना खर्च | ९२८१.०० |
| २. | प्रशासकीय खर्च | ७४०.६४ |
| ३. | प्रचालन आणि परिरक्षण | २७४९.०२ |
| ४. | व्याज आणि वित्त आकार | ९७.४३ |
| ५. | कार्यक्रम खर्च | १०७.३५ |
| ६. | महसुली अनुदाने, अंशदाने आणि वित्तीय सूट | ३४५१.०३ |
| ७. | तरतुदी आणि निर्लेखन | ३६३.१३ |
| ८. | राखीव निधीला स्थानांतरण | --- |
| | इतर | ११२.७४ |
| ९ | करांचा परतावा | २१२.०० |
| | **एकूण महसुली खर्च** | १७११४.३४ |
| | भांडवली खात्यास स्थानांतरण | २५३३.७७ |
| | **एकूण** | १९६४८.११ |

# परिशिष्ट –तीन

## अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

## खातेनिहाय सारांश

(₹ कोटीत)

| खाते संकेतांक | खाते | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | महसुली खर्च | भांडवली खर्च | |
| १८ | माहिती तंत्रज्ञान खाते | ८३.७२ | १३०.७७ | २१४.४९ |
| २१ | आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष | ९.७६ | १२.२३ | २१.९९ |
| २४ | कर निर्धारक व संकलक खाते | ४९१.०६ | १७१.५२ | ६६२.५८ |
| ३० | शिक्षण खाते | १४१२.४५ | ३२३.२५ | १७३५.७० |
| ३१ | घनकचरा व्यवस्थापन खाते | १४४५.२७ | २३२.६३ | १६७७.९० |
| ३२ | परिवहन खाते | ३६९.८४ | ७५.७८ | ४४५.६२ |
| ३३ | पर्जन्य जलवाहिन्या खाते | ३००.५३ | १३२५.४७ | १६२६.०० |
| ३४ | यांत्रिकी व विद्युत खाते | ६०.७७ | ५३.२६ | ११४.०३ |
| ३५ | नगर अभियंता खाते | ३५८.२१ | २११.५९ | ५६९.८० |
| ३७ | विकास नियोजन खाते | ३७.४४ | ५३१.८२ | ५६९.२६ |
| ३८ | अग्निशमन दल | १४२.१२ | १२६.४९ | २६८.६१ |
| ४१ | उद्यान खाते | १६६.७१ | १५१.८६ | ३१८.५७ |
| ४२ | बाजार खाते | ६४.२४ | ३६.९३ | १०१.१७ |
| ४३ | देवनार पशुवधगृह | २९.०१ | १८.९९ | ४८.०० |
| ४४ | रस्ते आणि वाहतूक प्रचालन खाते | ५७५.४६ | १४८५.४७ | २०६०.९३ |
| ४५ | पूल खाते | ६.१९ | ३२७.०० | ३३३.१९ |
| ४६ | महानगरपालिका मुद्रणालय | ४०.८३ | ७.५० | ४८.३३ |
| ४७ | आरोग्य खाते | ५२३.०८ | १५१.९२ | ६७५.०० |
| | प्रमुख रुग्णालये | ५४७.५९ | १३४.७८ | ६८२.३७ |
| | वैद्यकीय महाविद्यालये | १९८.२३ | २४.७९ | २२३.०२ |
| | विशेष रुग्णालये | १०१.०५ | २२.२५ | १२३.३० |
| | उपनगरीय रुग्णालये | ३१०.४२ | २७९.८८ | ५९०.३० |
| ४९ | जल प्रचालन खाते | १३३२.०१ | ६८८.७० | २०२०.७१ |
| ५० | पाणी पुरवठा प्रकल्प खाते | ३१.१२ | १७९०.५७ | १८२१.६९ |
| ५१ | मलनि:सारण प्रचालन खाते | ६८४.२३ | २८२.८३ | ९६७.०६ |
| ५२ | मलनि:सारण प्रकल्प खाते | २५.५९ | १७४.२१ | १९९.८० |
| ५३ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | १४.७१ | ३९४.६३ | ४०९.३४ |
| | इतर खाती | ७७५२.७० | १९२.६४ | ७९४५.३४ |
| | एकूण | १७११४.३४ | ९३५९.७६ | २६४७४.१० |
| | भांडवली लेख्यास अंशदान | २५३३.७७ | .. | |
| | एकूण | १९६४८.११ | .. | |

## परिशिष्ट - चार

### भांडवली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(₹ कोटीत)


| अनु.क्र. | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-१३ |
|---|---|---|
| | **भांडवली प्राप्ती** | |
| १ | कर्ज | २५५७.०० |
| २ | अनुदाने | २१२.०० |
| ३ | विकास निधी कडून अंशदान | ३४७.६३ |
| ४ | जमीन आणि इमारतींची विक्री / अधिमूल्य | १५०.१७ |
| ५ | एकूण संचित वर्ताळा | ६९०.०० |
| ६ | खर्चासाठी खालील निधीतून काढावयाची रक्कम | |
| | मालमत्ता पुनर्स्थापना निधी | १४००.०० |
| | भूमी संपादन आणि विकास निधी | ४५०.०० |
| | प्राथमिक शालेय इमारत परिरक्षण निधी | १०२.७५ |
| | प्राथमिक शालेय इमारत बांधकाम निधी | ०.५० |
| | मालमत्ता पुनर्स्थापना आणि पुनर्वसन निधी | ५०४.२२ |
| | एकूण - ६ | **२४५७.४७** |
| ७ | इतर प्राप्ती | ४८५.८० |
| | एकूण - १ ते ७ | **६९००.०७** |
| ८ | महसुली लेख्यांतून अंशदान | २५३३.७७ |
| | एकूण - भांडवली प्राप्ती | **९४३३.८४** |
| ९ | भांडवली खर्च | ९३५९.७६ |
| | वर्षभरातील वर्ताळा | ७४.०८ |

# आलेखीय माहिती

## अर्थसंकल्पीय अंदाज अ.ब,ई,ग आणि वृक्षप्राधिकरण यांची एकत्रित आर्थिक स्थिती


(फंड कोड-११,१२,२१,२२,२३,३०,४०,५०,६०आणि ७०)

## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | उत्पन्न / प्राप्तीचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | | महसुली उत्पन्न | १९६८०.९५ | ७४ |
| २ | | कर्ज | २५५७.०० | १० |
| ३ | | अनुदाने | २१२.०० | १ |
| ४ | | विशेष निधीतून काढलेले पैसे | २४५७.४७ | ९ |
| ५ | | विकास निधीतून अंशदान | ३४७.६३ | १ |
| ६ | | संचित वर्ताळयातून अंशदान | ६९०.०० | ३ |
| ७ | | इतर प्राप्ती | ६३५.९७ | २ |
| | | एकूण | २६५८१.०२ | १०० |

## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | सर्वसाधारण अर्थसंकल्प | १२७०४.२३ | ४८ |
| २ | | आरोग्य अर्थसंकल्प | २३४५.६८ | ९ |
| ३ | | सुधार योजना | २४३.१५ | १ |
| ४ | | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ४.७६ | ... |
| ५ | | गलिच्छ वस्ती सुधारणा | १५१.२६ | १ |
| ६ | | शिक्षण निधी | १६९७.८५ | ६ |
| ७ | | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ५८०१.२३ | २२ |
| ८ | | वृक्ष प्राधिकरण | ४१.२८ | ... |
| ९ | | भविष्य निर्वाह निधी | ७.४८ | ... |
| १० | | निवृत्तीवेतन निधी | ३४७७.१८ | १३ |
| ११ | | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | १०६.९२ | ... |
| | | एकूण | २६५८१.०२ | १०० |

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’, ‘ब’, ‘ई’, ‘ग ’ आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | जकात (नक्त) | ६९००.०० | ३५ |
| २ | | मालमत्ता कर | ४३१३.३४ | २२ |
| ३ | | जल व मलनि:सारण आकार | ११२१.०० | ६ |
| ४ | | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | ३४३५.४९ | १७ |
| ५ | | शासनाकडून अनुदाने | ३०४.०४ | १ |
| ६ | | गुंतवणुकीवरील व्याज | १५३३.७५ | ८ |
| ७ | | पर्यवेक्षण आकार | ५०९.४९ | ३ |
| ८ | | घनकचरा व्यवस्थापन | ९९.९९ | … |
| ९ | | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | ११६.९८ | १ |
| १० | | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | १४३.८२ | १ |
| ११ | | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ११०.४४ | १ |
| १२ | | बाजार व देवनार पशुवधगृहापासून प्राप्ती | ७०.४४ | … |
| १३ | | इतर प्राप्ती | १०२२.१७ | ५ |
| | | एकूण | १९६८०.९५ | १०० |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ','ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | आस्थापना खर्च | ९२८१.०० | ४७ |
| २ | | प्रशासकीय खर्च | ७४०.६४ | ४ |
| ३ | | प्रचालन आणि परिरक्षण | २७४९.०२ | १४ |
| ४ | | व्याज आणि वित्त आकार | ९७.४३ | ... |
| ५ | | कार्यक्रम खर्च | १०७.३५ | १ |
| ६ | | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ३४५१.०३ | १७ |
| ७ | | तरतुदी आणि निर्लेखन | ३६३.१३ | २ |
| ८ | | भांडवली लेख्याला स्थानांतरण | २५३३.७७ | १३ |
| ९ | | इतर खर्च | ११२.७४ | १ |
| १० | | करांचा परतावा | २१२.०० | १ |
| ११ | | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | ३२.८४ | ... |
| | | एकूण | १९६८०.९५ | १०० |

**भांडवली प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण**




| अनुक्रमांक | | भांडवली प्राप्तीची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | | कर्जे | २५५७.०० | २७ |
| २ | | अनुदाने | २१२.०० | २ |
| ३ | | विकास निधीतून अंशदान | ३४७.६३ | ४ |
| ४ | | जमिनी व इमारती इ.च्या अधिमुल्यासूनची प्राप्ती | १५०.१७ | २ |
| ५ | | महसुली लेख्यातून अंशदान | २५३३.७७ | २७ |
| ६ | | संचित वर्ताळा | ६९०.०० | ७ |
| ७ | | विशेष निधीतून काढलेले पैसे | २४५७.४७ | २६ |
| ८ | | इतर प्राप्ती | ४८५.८० | ५ |
| | | एकूण | ९४३३.८४ | १०० |

**भांडवली खर्च अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि वृक्षप्राधिकरण**





| अनुक्रमांक | | भांडवली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | | रस्ते, पूल व वाहतुक प्रचालन | १८१२.४७ | १९ |
| २ | | पर्जन्य जलवाहिन्या | १३२५.४७ | १४ |
| ३ | | घन कचरा व्यवस्थापन व परिवहन | ३०८.४१ | ३ |
| ४ | | आरोग्य अर्थसंकल्प | ६५५.४५ | ७ |
| ५ | | पाणी पुरवठा | २४७९.२७ | २६ |
| ६ | | मलनि:सारण | ८५१.६७ | ९ |
| ७ | | अग्निशमन दल आणि आपत्कालिन व्यवस्थापन | १३८.७२ | २ |
| ८ | | माहिती तंत्रज्ञान खाते | १३०.७७ | १ |
| ९ | | बाजार व देवनार पशुवधगृह | ५५.९२ | १ |
| १० | | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या आणि गलिच्छ वस्ती सुधारणा (अर्थसंकल्प ब ) | ९३.६० | १ |
| ११ | | प्राथमिक शाळांच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई) | ३६७.०१ | ४ |
| १२ | | इतर | ११४१.०० | १२ |
| १३ | | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | ७४.०८ | १ |
| | | एकूण | ९४३३.८४ | १०० |

## अर्थसंकल्पीय अंदाज अ.ब आणि ई यांची एकत्रित आर्थिक स्थिती


(फंड कोड-११,१२,२१,२२,२३,३०,६०आणि ७०)

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जकात (नक्त) | ६९००.०० | ४५ |
| २ | मालमत्ता कर | २२००.०० | १४ |
| ३ | शासनाकडून अनुदाने | ३०४.०४ | २ |
| ४ | गुंतवणुकीवराल व्याज | १०३०.८४ | ७ |
| ५ | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | ३४३५.४९ | २२ |
| ६ | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | ११६.९८ | १ |
| ७ | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | १४३.८२ | १ |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन | ९९.९९ | १ |
| ९ | पर्यवेक्षण आकार | २५०.०० | २ |
| १० | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ११०.४४ | १ |
| ११ | बाजार व देवनार पशुवधगृहापासून प्राप्ती | ७०.४४ | ... |
| १२ | इतर प्राप्ती | ५५१.११ | ४ |
| | एकूण | १५२१३.१५ | १०० |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | ८३१७.१६ | ५५ |
| २ | प्रशासकीय खर्च | ४१६.९६ | ३ |
| ३ | प्रचालन आणि परिरक्षण | २१३९.८२ | १४ |
| ४ | व्याज आणि वित्त आकार | २३.१८ | ... |
| ५ | कार्यक्रम खर्च | १०५.८६ | १ |
| ६ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | २९६९.०९ | १९ |
| ७ | भांडवली लेख्याला स्थानांतरण | १०१२.५० | ७ |
| ८ | इतर खर्च | १५.६० | ... |
| ९ | मालमत्ता करांचा परतावा | २१२.०० | १ |
| १० | खर्चापेक्षा जास्त उत्पन्न | ०.९८ | ... |
| | एकूण | १५२१३.१५ | १०० |

## भांडवली प्राप्ती - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | अंतर्गत कर्ज | २०००.०० | ३३ |
| २ | | महसुली लेख्यांकडून अंशदान | १०१२.५० | १७ |
| ३ | | विशेष निधीमधून काढलेले पैसे | १९५३.२५ | ३२ |
| ४ | | अतिरिक्त ०.३३ एफ.एस.आय.पोटी प्राप्त झालेला अधिमूल्य आकार | ३७५.०० | ६ |
| ५ | | विकास निधीमधून अंशदान | २६०.७२ | ४ |
| ६ | | ब्रिमस्टोवॅड कामे//ज.ने.रा.ना.पु.अ. /घ.क.व्य. प्रकल्पांकरिता अनुदान | २१२.०० | ४ |
| ७ | | इतर प्राप्ती | २६०.९७ | ४ |
| | | एकूण | ६०७४.४४ | १०० |

## भांडवली खर्च - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | वाहतूक प्रचालन, रस्ते आणि पूल | १८१२.४७ | ३० |
| २ | पर्जन्य जलवाहिन्या | १३२५.४७ | २२ |
| ३ | माहिती व तंत्रज्ञान खाते | १३०.७७ | २ |
| ४ | बाजार व पशुवधगृह | ५५.९२ | १ |
| ५ | आरोग्य अर्थसंकल्प | ६५५.४५ | ११ |
| ६ | घनकचरा व्यवस्थापन आणि परिवहन | २८१.३० | ५ |
| ७ | अग्निशमन सेवा आणि आपत्कालिन व्यवस्थापन | १३८.७२ | २ |
| ८ | उद्याने,प्राणीसंहग्रहालय,जलतरण तलाव व नाटयगृहे | १५०.७० | २ |
| ९ | इतर (अर्थसंकल्प 'अ') | ९८८.५९ | १६ |
| १० | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या आणि गलिच्छ वस्ती सुधारणा (अर्थसंकल्प ब ) | ९३.६० | २ |
| ११ | प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई ) | ३६७.०१ | ६ |
| १२ | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | ७४.४४ | १ |
| | एकूण | ६०७४.४४ | १०० |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | ३९९.१२ | ३९७.४९ | ४७२.८४ | ४९५.७९ | ५८१.६५ |
| भांडवली खर्च | ९६५.५१ | ९३२.९० | ६२५.६५ | ६८२.३५ | १८१२.४७ |
| **एकूण** | **१३६४.६३** | **१३३०.३९** | **१०९८.४९** | **११७८.१४** | **२३९४.१२** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | ८५७.२४ | ९९०.९५ | १२१२.९७ | १३५५.९१ | १७३७.९४ |
| भांडवली खर्च | १०९.८८ | ८१.१९ | १०३.८५ | ८४.६८ | २८१.३० |
| **एकूण** | **९६७.१२** | **१०७२.१४** | **१३१६.८२** | **१४४०.५९** | **२०१९.२४** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | ७६९.२८ | ९१९.०९ | ११५६.७८ | १४१३.८३ | १६९०.२३ |
| भांडवली खर्च | १७५.४४ | २०६.०४ | ३२४.४५ | ३६४.२८ | ६५५.४५ |
| **एकूण** | **९४४.७२** | **११२५.१३** | **१४८१.२३** | **१७७८.११** | **२३४५.६८** |




(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | २३९.०५ | २२०.८८ | २४२.६५ | २४५.७० | ३००.५३ |
| भांडवली खर्च | ६५५.७९ | १०२४.०३ | ९६९.२९ | ११८७.०९ | १३२५.४७ |
| **एकूण** | **८९४.८४** | **१२४४.९१** | **१२११.९४** | **१४३२.७९** | **१६२६.००** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | ८५१.१९ | १०३६.०३ | १०१६.४५ | १२३७.४७ | १९७५.६२ |
| भांडवली खर्च | ६३.२१ | ७४.४८ | ४१.७६ | १७९.८७ | ३६७.०१ |
| **एकूण** | **९१४.४०** | **१११०.५१** | **१०५८.२१** | **१४१७.३४** | **२३४२.६३** |

# आर्थिक स्थिती
# अर्थसंकल्पीय अंदाज -ग


## (फंड कोड-४०)

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्प ‘ग’





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | जल आकार | ७३७.९० | १७ |
| २ | जल कर | २५६.१३ | ६ |
| ३ | जल लाभ कर | ८९८.८७ | २० |
| ४ | मलनि:सारण आकार | ३८३.१० | ९ |
| ५ | मलनि:सारण कर | ३७४.०३ | ८ |
| ६ | मलनि:सारण लाभ कर | ५६९.२८ | १३ |
| ७ | इतर महसूल | १२२६.७९ | २७ |
| | एकूण | ४४४६.१० | १०० |

## महसुली खर्च - अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | आस्थापना खर्च | ९४८.५४ | २१ |
| २ | | प्रशासकीय खर्च | ३२२.८३ | ७ |
| ३ | | प्रचालन आणि परिरक्षण | ५८६.८२ | १३ |
| ४ | | व्याज आणि वित्त आकार | ७४.२५ | २ |
| ५ | | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ६२३.३० | १४ |
| ६ | | तरतुदी आणि निर्लेखन | ३६३.०३ | ८ |
| ७ | | पूर्व कालावधीतील बाबी | ६.०६ | ... |
| ८ | | भांडवली लेख्यांकडे स्थानांतरण | १५२१.२७ | ३५ |
| | | एकूण | ४४४६.१० | १०० |

## भांडवली जमा - अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | अंतर्गत निधीमधून | १५२१.२७ | ४४ |
| २ | कर्जे | ५५७.०० | १७ |
| ३ | अंशदान / अनुदान | ५९१.१३ | १८ |
| ४ | संचित वर्ताळा | ६९०.०० | २१ |
| | एकूण | ३३५९.४० | १०० |

## भांडवली खर्च- अर्थसंकल्प 'ग'




| अनुक्रमांक | खातेनिहाय भांडवली खर्च | अर्थसंकल्पीय अंदाज २०१२-२०१३ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | सामायिक सेवा | २७.६६ | १ |
| २ | जल प्रचालन | ६८८.७० | २१ |
| ३ | पाणी पुरवठा प्रकल्प | १७९०.५७ | ५३ |
| ४ | मलनि:सारण प्रचालन | २८२.८३ | ८ |
| ५ | मलनि:सारण प्रकल्प | १७४.२१ | ५ |
| ६ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | ३९४.६३ | १२ |
| ७ | वर्षभरातील अंदाजित वर्ताळा | ०.८० | ... |
| | एकूण | ३३५९.४० | १०० |




(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| महसुली खर्च | १४६०.१५ | १६३१.७२ | १५१८.५५ | २३७४.७७ | २९२४.८३ |
| भांडवली खर्च | १०९७.३५ | १६७२.२६ | २२३३.०९ | २४०७.९१ | ३३५८.६० |
| **एकूण** | **२५५७.५०** | **३३०३.९८** | **३७५१.६४** | **४७८२.६८** | **६२८३.४३** |